
# पाप आणि विज्ञान

## डाईसन कार्टर



संक्षिप्त मराठी रुपांतर

# पाप आणि विज्ञान

## डाईसन कार्टर

संक्षिप्त मराठी रुपांतर

एल्गार

**पाप आणि विज्ञान**
**डाईसन कार्टर**
**संक्षिप्त मराठी रुपांतर**

**प्रकाशन :** ८ मार्च २०१३

प्रकाशक आणि मुद्रक :
अनघा लेले
ई ४/२३, सूर्यप्रभा गार्डन्स,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७

मुखपृष्ठ, ले आऊट आणि निर्मिती :
मिलिंद जोशी,
अनुपम क्रिएशन्स, पुणे

**किंमत ६० रुपये**

□

मुखपृष्ठावरील **In the salon at the rue des moulins** (c.1894; Oil on canvas) हे चित्र आंरी द तूलूझ–लोत्रेक (Henri de Toulouse-Lautrec) या प्रख्यात फ्रेंच चित्रकाराचे आहे. 19व्या शतकाच्या उत्तरार्धातील पॅरिसमधील निशाजीवन त्याने आपल्या अनेक चित्रांमधून रेखाटले. मुखपृष्ठावरील चित्रामध्ये एका वेश्यालयातील ग्राहकांची वाट पाहणाऱ्या स्त्रिया आणि त्यांच्यावर लक्ष ठेवणारी मालकीण यांचे रेखाटन केले आहे.

□



# भूमिका

आज वेश्याव्यापार आंतरराष्ट्रीय स्तरावरील अत्यंत संघटित व्यापारांपैकी एक गणला जातो. सेक्स टूरिझम ही संकल्पना रूढ म्हणावी इतकी मान्यताप्राप्त झाली आहे. जगातील काही देशांची तर संपूर्ण अर्थव्यवस्थाच सेक्स टूरिझमवर अवलंबून आहे. भारतातील काही पर्यटन स्थळांमध्ये देहव्यापारामुळे होणाऱ्या आर्थिक उलाढालींना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

जागतिकीकरणाच्या धोरणांमुळे शेती, लहान उद्योग, हस्तव्यवसाय यांची मुळेच उखडली गेली. यावर उपजीविका असलेली असंख्य कुटुंबे अक्षरशः रस्त्यावर आली. स्थलांतरित कुटुंबांची शहरांमधील दुर्गत सर्वज्ञात आहे. अशा गरजू, गरीब कुटुंबांमधल्या मुली वेश्याव्यापारासाठी मुबलक संख्येने उपलब्ध आहेत.

वेश्याव्यवसायाच्या विविध रूपांकडे पाहता त्याचा प्रचंड व्याप अचंबित करणारा आहे. जागतिकीकरणाच्या या काळात जेव्हा शोषणाची प्रत्येक शक्यता अधिकाधिक तीव्र आणि बहुआयामी बनली आहे, तेव्हा ते स्त्रियांवरील लैंगिक अत्याचाराच्या या रूपाला स्पर्श न करता कसे राहील? उलट, पूर्वीच्या गरीब, विकसनशील तिसऱ्या जगातील देशांमधून तर वेश्यांच्या व्यापाराला चांगलीच चालना मिळाली आहे.

भारतातील विशिष्ट परिस्थिती, उदा. जातीव्यवस्था, गरिबी, देवदासी सारख्या प्रथा, इत्यादिंमुळे वेश्याव्यापाराच्या प्रश्नाचे गांभीर्य आणि गुंतागुंत मोठी आहे. आजही दलित कुटुंबातील हजारो तरुण स्त्रिया देवदासी म्हणून सोडल्या जातात. गरीब कुटुंबातील मुलींचे पैशांअभावी लग्न जमत नसेल, तर तिचे आईवडील तिचे लग्न देवाशी लावून देतात.

वेश्याव्यापाराबरोबरच दारू, अवयव विक्री, भीक मागणे, आत्महत्या

यासारख्या मानवी समाजाला काळिमा फासणाऱ्या समस्यांचा विचार केला तर या प्रश्नांनी आज फार मोठ्या लोकसंख्येला ग्रासले असल्याचे दिसते. एक अशी व्यवस्था तयार झाली आहे, जिथे अगतिक, गरजू लोकांना अलगद जाळ्यात ओढून गुन्हेगारी, भीक मागणे, वेश्याव्यापार, दारूव्यापार, अवयव विक्रीच्या संघटित धंद्यात अडकवले जाते. हे धंदे पद्धतशीरपणे चालवणारे लोक आपल्या आजूबाजूला सन्मान्य प्रतिष्ठित जीवन जगत आहेत. या धंद्यातून मिळणारा नफा प्रचंड आहे. अनेकांचे हितसंबंध यात गुंतलेले आहेत. म्हणून तर महाराष्ट्र शासनाने डान्सबार वर बंदी घालण्याचा फतवा काढूनही हा व्यवसाय छुपेपणाने अजूनही फोफावतोच आहे.

समाजात आज अनेक सामाजिक कार्यकर्ते, संघटना या प्रश्नांची सोडवणूक करण्याकरिता आपापल्या विचारांनी, आपापल्या परीने अनेक प्रयत्न करत आहेत. परंतु एवढ्या मोठ्या प्रमाणावर चाललेल्या या संघटित कारभारापुढे त्यांचे प्रयत्न अत्यंत तोकडे पडतात. या संदर्भात कुणीतरी उद्धृत केलेली एक गोष्ट आठवते. एक संतपुरुष समुद्र किनाऱ्यावरून चालत होते. लाटांबरोबर शिंपल्या बाहेर फेकल्या जात होत्या. पाण्याबाहेर त्या मरून जाणार हे लक्षात आल्यावर त्यांनी एक एक शिंपली उचलून पाण्यात टाकायला सुरुवात केली. तिथून जाणाऱ्या एका माणसाने त्यांना विचारले, हजारो, लाखोंच्या संख्येने प्रत्येक लाटेबरोबर या शिंपल्या बाहेर फेकल्या जात आहेत, एक–एक शिंपली आत टाकून असा काय फरक पडणार आहे? त्यावर त्या महात्म्याने अजून एक शिंपली उचलून पाण्यात टाकली आणि ते म्हणाले, हिला तरी नक्की फरक पडला.

खरेच, तसाच विचार केला तर एकीला, दुसरीला, काहींना या प्रयत्नांमुळे फरक पडतही असेल. पण प्रत्येक सामाजिक संकटाच्या लाटेबरोबर बाहेर फेकल्या जाणाऱ्या अगणितांचे काय? एक सामाजिक रोग म्हणून पाहिले, तर तो तर तसाच राहिला ना? असे काही नाही का करता येणार ज्यामुळे त्यांचे असे बाहेर फेकले जाणेच थांबवता येईल? हे तर असेच चालू राहणार आहे असे गृहीत धरून वेश्याव्यवसायातील काहीजणींना मदतीचा हात देऊन वाचवण्यात आपले आयुष्य खर्ची घालवण्यापेक्षा, या व्यवसायाचा मागमूसही समाजात राहू नये यासाठी काय करता येईल याचा विचार का नाही करायचा? एवढ्या घृणित पातळीवरचे स्त्रीचे शोषण मानवी संस्कृतीच्या या टप्प्यावर सुद्धा इतके ठळकपणे समाजात असावे? इतके की, काही संस्था, संघटना वेश्याव्यवसायाला इतर व्यवसायांप्रमाणे कायदेशीर मान्यता मिळावी, प्रतिष्ठा मिळावी अशी जोरदार मागणी करत आहेत. समाजात वेश्या आहेत तोपर्यंत त्यांच्यावरील अत्याचार कमी व्हावेत, त्यांना काही



सोयी–सुविधा मिळाव्यात ही मागणी करणे वेगळे, परंतु त्यांच्या माणूसपणाला प्रतिष्ठा देण्याच्या सबबीखाली, त्यांच्या कामातला अमानवी शोषणाचा पैलू झाकून वेश्याव्यवसायालाच उघड मान्यता देण्याने या शोषणाचेच समर्थन होत नाही का? आणि यातून त्यांना प्रतिष्ठा मिळणे तर दूरच राहील, उलट त्यांना या व्यवसायात ढकलणारे मात्र सुरक्षित होतील हीच शक्यता अधिक आहे. वेश्येला सेक्स वर्कर म्हणण्याने तिच्यावरील लैंगिक अत्याचारांत, तिच्या शोषणात बदल होत नाही. उलट या मागणीतून त्या आहे त्याच परिस्थितीत कायम राहणार आहेत, वेश्या व्यवसाय समाजातून कधीही नष्ट होऊ शकत नाही, असाच पराजयवादी सूर निघतो.

या पार्श्वभूमीवर डॉ. डायसन कार्टर यांच्या 'Sin and science' या पुस्तकाचा मराठी भावानुवाद प्रकाशित करण्याचे आम्हाला विशेष महत्त्व वाटते. इतिहासात एका देशाने, एका समाजव्यवस्थेने आपल्या समाजातून वेश्या व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी एक प्रयोग केला आणि तो यशस्वीही झाला. सोविएत रशियामध्ये १९१७ साली समाजवादी क्रांती झाल्यानंतर समाज आणि मानवाला सुधारण्याचे अनेक प्रयोग केले गेले. हा त्यातलाच एक प्रयोग! राजकीय इच्छाशक्ती आणि लोकांचा सहभाग या दोन्ही गोष्टी एकत्र आल्यानंतर काय होऊ शकते हे हा प्रयोग ठळकपणे अधोरेखित करतो. सोविएतविरोधी प्रचारामध्ये या प्रयोगाचे महत्त्व अर्थातच नाकारले गेले. उलट सोविएत प्रचाराचा एक भाग म्हणून या अत्यंत महत्त्वाच्या प्रयोगाची संभावना झाली.

वैज्ञानिक पद्धती, वैज्ञानिक विचारसरणीचा वापर करून मोठ्यात मोठी सामाजिक, मानवी समस्याही सोडवता येऊ शकते हे या प्रयोगाने सिद्ध केले. इतिहासातील दुर्लक्षित अशा या महान प्रयोगाची उपेक्षा करून, आजच्या रशियातील सेक्स टूरिझमचे दाखले आणि आकडे देऊन क्रांतीकाळातील समाजपरिवर्तनाच्या प्रयत्नांकडे डोळेझाक करून आपण आपलेच नुकसान करून घेत आहोत. कोणत्याही समस्येचा विचार करताना, विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून आपण जगाच्या इतिहासाकडे पहायला हवे. विज्ञानवादी मार्गानीच कोणतीही समस्या सोडवता येऊ शकते, सामाजिक परिस्थितीही बदलता येते असा आमचा विश्वास आहे. आणि आमची खात्री आहे की, डॉ. डायसन कार्टर यांनी या पुस्तकात या ऐतिहासिक प्रयोगाचे जे तपशीलवार वर्णन केले आहे त्यातून वाचकांपर्यंत आमचा हा विश्वास आम्ही पोहोचवू शकू.

☐

# लेखकाची ओळख

आपल्या पन्नास वर्षांहून अधिक काळाच्या लेखन कारकीर्दीमध्ये डायसन कार्टर यांनी विविध मासिके आणि वर्तमानपत्रे यामध्ये शेकड्यांनी लेख लिहिले, डझनावर कथा, सतरा पुस्तके (ज्यात पाच कादंबऱ्या आहेत) लिहिली. त्यांच्या बहुतेक लिखाणाचा भर विज्ञान लोकप्रिय करणे, समाज व विज्ञान यांच्यातील संबंधांचे विविध पैलू उलगडणे, आणि आपल्या राजकीय मतांचा उच्चार करणे हाच होता. १९३० आणि १९४० च्या दशकांमध्ये त्यांचे लिखाण अमेरिका आणि कॅनडामधील प्रमुख वर्तमानपत्रे आणि मासिकांमध्ये छापले जात होते.

असे असूनही डायसन कार्टर यांचे नाव आज कॅनेडियन साहित्याच्या संदर्भ सूचीमध्ये सापडत नाही. त्याचे कारण म्हणजे आपल्या संपूर्ण वयस्क आयुष्यात ते कम्युनिस्ट पार्टी ऑफ कॅनडाचे सदस्य राहिले. त्यामुळे शीतयुद्धाच्या काळामध्ये कॅनडातील बहुसंख्य लोकांकडून नॉर्मन बेथ्यून प्रमाणेच कार्टर यांनासुद्धा सामूहिक तिरस्कार व उपेक्षा यांचा सामना करावा लागला.

सुदैवाने, १९८५ मध्ये नॅशनल आर्काइव्हज ऑफ कॅनडाने कार्टर यांच्या साहित्याची दखल घेतली, ज्यातून आपल्याला त्यांच्या शास्त्रज्ञ, लेखक, संपादक आणि राजकीय कार्यकर्ता म्हणून केलेल्या कामांची ओळख होते. त्यांच्यावर सोविएत रशियातील क्रांतीनंतरचा समाज आणि मानव सुधार कार्यक्रमांचा मोठा प्रभाव होता. त्यांनी आपल्या लिखाणात नेहमी पाश्चिमात्य देशांमधल्या भांडवलशाहीवर टीका केली. त्यांच्या मते विज्ञान आणि विज्ञानातील शोध यांना नफ्याच्या व्यवस्थेतून मुक्त करणे अत्यावश्यक आहे. तसे केले तरच मानवजातीला खऱ्या अर्थाने विज्ञानातील प्रगतीचा उपयोग होईल. तेव्हाच खरे स्वातंत्र्य, काबाडकष्टांपासून खरी सुटका आणि वर्गहीन समाज याकडे वाटचाल करता येऊ शकेल.



१९६६ मध्ये त्यांनी लिहिले, 'अजून अनेकांना हे मान्य नाही, परंतु विज्ञान हे महान सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांत्यांमध्ये निर्धारक शक्ती बनत चालले आहे.'

१९५० मध्ये डायसन कार्टर यांची नॅशनल कौन्सिल ऑफ द कनेडियन सोविएत फ्रेंडशिप सोसायटी या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली. कार्टर यांनी या संस्थेचा प्रमुख हेतू कॅनडातील लोकांना सोविएत युनियन संबंधी अचूक माहिती देणे हा मानला. १९५१ मध्ये ते पहिल्यांदा सोविएत युनियनला गेले. या प्रवासानंतर पत्नी शारलॉटसह त्यांनी वुई सॉ सोशालिझम हे २ खंडी पुस्तक लिहिले. यात सोविएत जीवनातील आरोग्य सेवा, शेती, उद्योग, कला यासंबंधी भरभरून लिहिले आहे.

१९६६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या सायन्स अँड रिव्होल्यूशन या पुस्तकात त्यांनी या पुस्तकाची ३ उद्दिष्टे सांगितली –

– आधुनिक विज्ञानाला रहस्यमयतेच्या धुक्यातून बाहेर काढणे, ज्यामुळे सामान्य वाचकाला तंत्रज्ञान आणि वैद्यकशास्त्रातील ताज्या घडामोडी समजतील.

– विज्ञान आणि राजकीय क्रांतीमधील संबंध उलगडणे.

– विज्ञान आणि नफ्याचे उद्दिष्ट यांचा एकमेकांशी संबंध जोडण्यातील निरर्थकता स्पष्ट करणे

सोविएत रशियाने समाजवादामध्ये विज्ञानाला अत्युच्च शिखरे गाठण्यापासून कोणीही रोखू शकत नाही हे सिद्ध केले आहे. पाश्चात्य देशांमध्ये विज्ञानाची प्रगती तर होत आहे, पण अनुत्पादक नफेखोरांमुळे त्याची किंमत सामान्यांना न परवडणारी होत चालली आहे. जर विज्ञान आणि तंत्रज्ञान नफ्याच्या हेतूपासून मुक्त केले, तर अमेरिकनांना यूएसएसआर बरोबर सहकार्य करण्यास उद्युक्त करून लोकसंख्येचा स्फोट, रोगराई, कुपोषण यासारख्या जगासमोरील समस्यांचे निवारण करणे शक्य होईल असे त्यांचे विचार होते.

सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून वेध घेणारे कार्टर यांचे सर्वच लिखाण जगभरात वाचकांपर्यंत पोहोचणे आजही गरजेचे आहे.

□

# भारतीय आवृत्तीची प्रस्तावना

## डी. डी. कोसंबी

कोणत्याही आधुनिक शहरात लहानाचा मोठा झालेल्या माणसाच्या दृष्टीने गुन्हा, पाप आणि विज्ञान यांचे अर्थ उघड असतात. तसेच पापाची व्याख्या ज्याच्या त्याच्या धर्मावर अवलंबून असते, हे सुद्धा किमान भारतात तरी बहुतेकांना माहीत असते. जसे, मुसलमानांसाठी दारू पिणे हे पाप आहे आणि हिंदूंसाठी गोमांस खाणे हे पाप आहे. पण ख्रिश्चनांना या दोन्ही गोष्टी करण्यात काहीही गैर वाटत नाही. पापाच्या या निरनिराळ्या कल्पना आधुनिक समाजाचे नियंत्रण करण्यासाठी पुऱ्या पडत नाहीत. म्हणून मग आता काही विशिष्ट कृतींना गुन्हा असे नाव देऊन त्यांच्यावर कायदेकानूंची बंधने लादली जातात आणि गुन्ह्याची शिक्षा पोलिस आणि न्यायालयांमार्फत दिली जाते. यासाठी गुन्हा आधी उघड करावा लागतो, तसेच अपराध्याला काही कायदेशीर प्रक्रियेमधून दोषी सिद्ध करावे लागते. त्यानंतरच प्रत्यक्ष शिक्षा होऊ शकते. पण बहुतेक वेळा त्यामुळे पापाचे परिमार्जन झाले हे सिद्ध करणे शक्य नसते, मग त्याचे परिमार्जन परलोकात किंवा पुनर्जन्मात होईल असे मानून या प्रश्नाचे समाधान केले जाते. विज्ञानाच्या दृष्टीने मात्र धार्मिक किंवा कायदेशीर नीतीनियमांच्या पलिकडे जाऊन कारण–परिणामांचा विचार करावा लागतो. त्याचा आधार हा काळजीपूर्वक केलेली निरीक्षणे अथवा प्रयोगांचा तर्कशुद्ध, भौतिकवादी पद्धतीने लावलेला अन्वयार्थ हा असतो. विषाची ठराविक मात्रा घेणारा मरणार हे निश्चित, मग त्याची ती कृती कायदेशीर असो किंवा नसो. तुमच्या शरीरात पुरेशा प्रमाणात विशिष्ट जंतूंचा शिरकाव होऊ दिलात, तर संबंधित रोगाला तुम्हा बळी पडण्याची शक्यता ठराविक प्रमाणात वाढते. मग ती देवाची करणी असो वा आणखी काही!

जर या तीनही, म्हणजेच धार्मिक, कायदेशीर आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून एकच निष्कर्ष निघत असेल, म्हणजेच एखादी गोष्ट पापकृत्यही आहे, ती गुन्हाही आहे आणि तिच्यातून रोगाचा प्रादुर्भावही होतो तर मग समाज अशा भयंकर



धोक्याचा नायनाट करण्याचा प्रयत्न करणारच. लैंगिक नियमनांच्या बाबतीत आणि त्याच्याशी संबंधित घटस्फोटाचा प्रश्न, गुप्तरोग आणि वेश्या व्यवसाय यांच्या बाबतीत तर निश्चितच असे म्हणता येईल. दारूबाजी आणि तिचे दारुड्यांवर, त्याच्या कुटुंबावर आणि आधुनिक यंत्रयुगात दारूच्या नशेत होणाऱ्या अपघातांमार्फत समाजावरही होणाऱ्या परिणामांच्या बाबतीतही ते म्हणता येईल.

आधुनिक काळात या अपप्रवृत्तींवर मात करण्याचे जे प्रयत्न झाले, ज्या पद्धती उपयोगात आणल्या गेल्या, त्यांचा डायसन कार्टर यांनी समतोल आणि तटस्थ मागोवा घेतला आहे. या मध्ये पुढारलेल्या आणि जगासमोर आपापले आदर्श ठेवणाऱ्या दोन पूर्णपणे वेगळ्या समकालीन समाजव्यवस्थांकडून दोन वेगवेगळ्या पद्धतींचा प्रयोग झाला. अमेरिकेमध्ये विज्ञानाचा झालेला सशक्त विकास आणि त्याचबरोबर पोलिस खात्याचाही अधिक सशक्त विकास या गोष्टी कोणीच नाकारू शकत नाही. अमेरिकेतील सर्व धार्मिक गटही अशा प्रश्नांवर उत्तर शोधण्याचा एकजुटीने प्रयत्न करतात. तरीसुद्धा, घटस्फोटांचे प्रमाण तिथे जगातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा अधिक आहे. 'सुधारणावादी' राजकीय चळवळी, पोलिसांच्या खास मोहिमा आणि धर्मगुरूंचे सततचे उपदेश हे सर्व चालू असूनही तिथे गुप्तरोग, वेश्याव्यवसाय आणि दारूबाजी या गोष्टी असाध्य रोगाप्रमाणे चिकटून आहेत. याउलट, नव्या प्रकारच्या समाजाचा पहिला आणि सर्वात मोठा प्रतिनिधी असलेल्या सोविएत रशियामध्ये आधुनिक समाजाचे हे सर्व घातक दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात दिसतील अशी सर्व कारणे अस्तित्वात होती. क्रांतीने संघटित धर्माचा नायनाट केला होता. पूर्वीचे बहुतेक सर्व प्रतिबंध काढून टाकले होते. वेश्येला गुन्हेगारांप्रमाणे शिक्षा करणे बंद केले होते. घटस्फोटाची प्रक्रिया अगदीच सोपी केली होती आणि सरकार स्वतःच स्वस्त दारू पुरवू लागले होते. याशिवाय, क्रांतीनंतरची परकीय हस्तक्षेपातून उद्भवलेली युद्धे आणि सततचा उत्पादनवाढीचा दबाव यामुळे होणारे हाल तर होतेच. तर मग, भांडवली तर्काप्रमाणे तिथे समाज नैतिक पतनाच्या मार्गाने रसातळाला पोचायला हवा होता. मात्र, आपल्याला तिथे वेश्याव्यवसाय संपूर्णपणे नष्ट झालेला दिसतो, घटस्फोटांचे प्रमाण दुर्लक्ष करता येण्याइतपत खाली आलेले दिसते, आणि एकेकाळी झिंगलेल्या शेतकऱ्यांसाठी आणि कामगारांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या देशात दारूबाजी आता जवळपास नामशेष झाली आहे.

हे परिणाम परस्पर विसंगत आणि अगदी चमत्कारिक वाटतील. वैज्ञानिक जिज्ञासेने प्रश्नांच्या मुळांचा शोध घेणे आणि त्यातील निष्कर्षांना त्यांच्या तार्किक

परिणतींपर्यत पोहोचवणे, यातूनच हे घडले. भांडवली देशात पोलिस जो प्रश्न विचारायचे धाडस करू शकत नाहीत, धर्मगुरू विचारू शकत नाहीत आणि शास्त्रज्ञ विचारत नाहीत, तो प्रश्न म्हणजे सामाजिक रोग मुळात अस्तित्वातच का येतात? समाजातील विशिष्ट वर्ग या रोगांमुळे प्रचंड नफा कमावतात, हे या सामाजिक रोगांच्या अस्तित्वामागचे कारण आहे, असे उत्तर सोविएत रशियातील प्रयोगांमधून मिळाले आहे. बहुसंख्य जनतेच्या सार्वत्रिक शोषणामुळेच खूप मोठी लोकसंख्या सामाजिक रोगांना बळी पडते. मग हे सामाजिक रोगसुद्धा नफा कमावण्याचे, पुन्हा जनतेच्या शोषणाचेच साधन बनतात. अशा रितीने हे रोग समाजभर पसरतात. जनतेच्या एकूणच शोषणाचा अंत झाल्यामुळेच सोविएत रशियामध्ये या रोगांच्या मूळ कारणांचाच अंत झाला. त्याच बरोबर त्या रोगांना बळी पडलेल्यांना नव्हे, तर या रोगांपासून नफा कमावणाऱ्यांना जबरदस्त शिक्षा करण्यात आल्या. जसे, घरवालीला आणि दलालांना शिक्षा झाल्या, वेश्यांना नव्हे. हातभट्टीवाल्यांना शिक्षा झाल्या, दारुड्यांना नव्हे. याच वेळी, प्रत्येक नागरिकाला रोजगाराचा अधिकार मिळाला. सर्वांना स्वाभिमानाने चांगले जीवन जगणे शक्य केले गेले. मग या नव्या स्वातंत्र्याचे परिणामही सहज दिसू लागले. कायदे करणे, पक्षप्रचार, आणि जनतेच्या वैज्ञानिक शिक्षणाचा आधार घेणे सोपे झाले. जनतेला पूर्णपणे शिक्षित करण्याच्या योजना बनल्या. सर्वांना मनोरंजन आणि विरंगुळ्याची नवी नवी साधने उपलब्ध करून देण्यात आली. स्वस्त आणि उत्तम वाचनीय साहित्य, दर्जेदार संगीत, चित्रपट, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उद्याने, इत्यादि गोष्टींची सर्वांसाठी व्यवस्था केली गेली. पूर्वीच्या अपप्रवृत्ती टिकून राहण्याचे कोणतेही कारण शिल्लकच न राहिल्याने त्या संपून गेल्या, एवढे हे सरळ, साधे आहे. इतिहासात प्रथमच माणसाचे जीवन जगण्यासाठी मौल्यवान बनले, सुखमय बनले. इतके, की त्यापासून पळून जायची आता कोणाला गरज उरली नाही.

भारतात याच समस्यांना आपण तोंड देत आहोत. उपाय म्हणून दारूबंदीसहित अशाच अमेरिकी पद्धतींचा अवलंब करत आहोत. मात्र, कुठल्याही नफेखोराला त्याच्या देशबांधवांना जगण्याची साधने नाकारून त्यांच्या जीवनाचा संकोच करण्याची इथे मोकळीक आहे. आणि तो हे उजळ माथ्याने प्रतिष्ठित वर्गाचा सदस्य म्हणून करू शकतो. पोलिस त्याचे आणि त्याच्या मालमत्तेचे त्याच्या बळींपासून संरक्षण करतात. ज्यांच्या जिवावर हा नफा निर्माण होतो, त्यांच्यावर उपासमार, गलिच्छ राहणी, अज्ञान यांच्या होणाऱ्या परिणामांकडे शास्त्रज्ञ दुर्लक्ष करतात आणि भांडवलदारांना मात्र तांत्रिक सल्ले, वैद्यकीय मदत आणि तोंडभर स्तुतीचा नजराणा देण्यासाठी धावतात. बरोबरच आहे! त्यांचे गलेलठ्ठ पगार हे धनिकच देणार



असतात ना! यांच्या संशोधनाला त्यातून भारी नफा कमावणारे सोडून इतर कोण प्रोत्साहन देणार? धर्माबद्दल बोलायचे, तर शोषितांना दुसऱ्या जन्मात कधीतरी न्याय मिळेल एवढे घोषित करून त्याचे काम संपते. किंवा तो त्यांच्या आत्ताच्या पीडेमागे त्यांचीच पूर्वजन्मीची पापे कारणीभूत आहेत असे सांगतो. शोषित दलितांची एकतर पूर्णपणे उपेक्षाच करायची, किंवा त्यांची आणखी पिळवणूक करायची हाच याचा थोडक्यात अर्थ. आणि समाजसुधारक? त्यांचे इरादे कितीही नेक असले, तरी ते क्रांती न करताच क्रांतीची फळे चाखण्याची इच्छा बाळगतात.

१०, सप्टेंबर १९५०.

□

# लेखकाची प्रस्तावना

या पुस्तकात जे प्रश्न मांडलेले आहेत, ते सर्वसाधारणपणे 'अनैतिकता', किंवा 'पाप', किंवा 'व्यभिचार' असे शब्द वापरून दाबून टाकले जातात, किंवा त्यांच्याबद्दल बोलणे टाळले जाते. या पुस्तकात मांडलेले प्रश्नांचे मुख्य विषय आहेतः वेश्याव्यवसाय, स्त्रियांचा व्यापार, गुप्तरोग वगैरे वगैरे.

या पुस्तकात अनैतिकतेबद्दल थोडी वेगळ्या पद्धतीने मांडणी केली आहे. अनैतिकतेशी संबंधित समस्यांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहून एक समजायला सोपा, संपूर्ण आणि यशस्वी उपाय यात सांगितला आहे.

हा दावा वाचकाला हास्यास्पद वाटू शकेल. कारण मानव समाज युगानुयुगे अनैतिकतेच्या प्रश्नाने पीडित आहे हे आपण जाणतो. आजवर यावर भरपूर प्रमाणात अभ्यास, उपदेश, लिखाण तसेच असंख्य कायदे केले गेले आहेत. आणि हे सगळे प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. महायुद्धकाळात विकसित देशांमध्ये नैतिकतेचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला, युद्धानंतरच्या काळात तर हा धोका अजूनच वाढला आहे. या पुस्तकात सामाजिक नैतिकतेसंबंधी केल्या गेलेल्या एका प्रयोगाचा प्रामाणिक अहवाल दिला आहे. हा प्रयोग असामान्यरित्या सफल झाला. अजून तरी आपल्या देशातील सर्वसामान्य जनतेपर्यंत या प्रयोगाबद्दलची माहिती पोचवली गेलेली नाही. ज्या लोकांकडे ही माहिती आहे, त्यांनी ती सर्वसामान्य जनतेपर्यंत सोडाच, पण वैद्यकीय क्षेत्रातील व्यावसायिकांपासून आणि समाजसेवकांपासूनही जाणीवपूर्वक दूर ठेवली.

आपल्यापैकी काहीजण गुप्तरोगांचा नायनाट करण्यासाठी वैज्ञानिक कार्यक्रम स्वीकारण्यास तयार असतात, पण घटस्फोट, स्त्री–पुरुष संबंधातील नैतिकता, वेश्याव्यवसाय, व्यसन इ. समस्यांवर आध्यात्मिक उपायच उपयुक्त आहेत असे मानतात. अनेकांच्या मते अनैतिक या शब्दाचा अर्थच माणसाची आध्यात्मिक बाजू



दुबळी असणे असा आहे. त्यामुळे तर्क वापरून त्याचा ऊहापोह करणे शक्य नाही. दुसरीकडे असेही अनेकजण आहेत ज्यांना अनैतिकतेसंबंधीचे प्रश्न फक्त वैद्यकीय उपायांनीच सुटतील असे वाटते. जणू काही समाजाचे नैतिक अधःपतन हा एखादा रोग आहे आणि वैद्यकीय संशोधनातून जालीम उपाय शोधून त्याचा नायनाट करता येईल. जसे परमासाठी पेनिसिलिनचे इंजेक्शन!

एक गोष्ट तर सर्व जाणत्या आणि प्रामाणिक लोकांना मान्य करावी लागेल, की वैद्यकीय वा आध्यात्मिक यापैकी कोणत्याही मार्गाने व्यभिचाराचा प्रश्न आपले देश सोडवू शकलेले नाहीत. लोकशाहीने पूर्वी कधीही न पाहिलेल्या वेगाने नैतिकतेचा ऱ्हास होत आहे. गेल्या काही वर्षांमधील घडामोडी पाहता समाजाचे सुंदर, मनोहारी चित्र रंगवणे कठीण आहे.

**– डायसन कार्टर**

☐

## पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीला लेखकाची प्रस्तावना

पहिल्यांदा जेव्हा हे पुस्तक प्रकाशित झाले, तेव्हा कॅनडातील एका प्रमुख वर्तमानपत्रातील परीक्षणामध्ये लिहिले होते, आजपर्यंत कॅनडामध्ये प्रकाशित झालेल्यांपैकी हे सर्वात महत्त्वाचे पुस्तक असू शकते! हे फारच अतिरंजित वाक्य आहे, आणि लेखक नक्कीच त्याच्याशी सहमत नाही.

माझ्या मते या पुस्तकाची दोन बलस्थाने आहेत.

एकः हे एकमेव पुस्तक असे आहे, ज्यामध्ये दारूबाजी, गुप्तरोग व वेश्याव्यवसाय या जगातील अनेक महत्त्वाच्या देशांना ग्रासणाऱ्या समस्या, जगातील पहिल्या समाजवादी देशाने कशा सोडवल्या याचा अगदी तपशीलवार अहवाल दिला आहे.

दोनः हे पुस्तक ऐतिहासिक तथ्यांवर आधारलेले आहे. त्यामुळे, अनेक समीक्षक, परीक्षकांनी म्हटल्याप्रमाणे हा रशियन राज्यक्रांतीच्या एका अत्यंत महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा पैलूचा वस्तुनिष्ठ अभ्यास आहे.

आठ वर्षात या पुस्तकाच्या सात आवृत्या निघाल्या – कॅनडात तीन, अमेरिकेत एक, भारतामध्ये दोन इंग्लिश तसेच एक तमिळ आवृत्ती. तिसऱ्या भारतीय आवृत्तीचे नियोजन झाले आहे. लवकरच जपानी भाषेत हे पुस्तक येत आहे.

आपल्या लेखनाला देशाच्या सीमेबाहेर लोकप्रियता मिळत आहे, आणि दिवसेंदिवस आपल्या पुस्तकाची प्रतिष्ठा वाढत आहे ही कोणत्याही लेखकासाठी अत्यंत समाधान देणारी गोष्ट असते. परंतु, Sin and Science हे पुस्तक माझ्यासाठी वैयक्तिक समाधानाचा मोठा स्त्रोत आहे ते अगदी वेगळ्याच कारणासाठी.

जेव्हा मी हे पुस्तक लिहीत होतो तेव्हा, ते ज्या देशाबद्दलचे पुस्तक आहे, तो देश म्हणजेच सोविएत रशिया, मी पाहिला नव्हता. आणि ही गोष्ट मी लपवलीही नव्हती. हे पुस्तक सोविएत परिस्थितीचा वैयक्तिक अभ्यास केलेल्या तज्ञ व्यक्तींच्या विधानांवर आणि अधिकृत दस्तावेजांवर आधारलेले होते. पुढे अनेक वर्षे लोक मला म्हणत, तुम्ही अभ्यास केलेल्या गोष्टींचा अहवाल लिहिला ते ठीकच आहे...पण समजा, जर तुम्ही सोविएत युनियनला गेलात, आणि तुम्हाला तिथली परिस्थिती तुम्ही पुस्तकात लिहिली आहे त्यापेक्षा खूपच वेगळी असल्याचे आढळले तर?

या प्रश्नाने मी कधीच चिंतित झालो नाही, पण अशा परिस्थितीत अनिश्चिततेची भावना डोकावणे स्वाभाविक होते. जसजसा काळ पुढे सरकला, तसतशी तिथली परिस्थिती पाहण्याची माझी स्वतःची उत्सुकता वाढत गेली.



आणि जेव्हा संधी आली, तेव्हा या पुस्तकातील तथ्यांना तिथल्या प्रत्यक्ष जीवनात तपासून पहायचे मी ठरवले. माझ्या पत्नीबरोबर मी न्यूज–फॅक्ट्स या मासिकाचा संपादक म्हणून सोविएत रशियाला गेलो. ज्यांनी आमचे यजमानपद स्वीकारले होते, त्या सोविएत रशियामधील सोसायटी फॉर कल्चरल रिलेशन्स वुईथ फॉरेन कंट्रीज या संस्थेतील लोकांना माझ्या 'नैतिकते'चा शोध घेण्याच्या हेतूविषयी काहीच कल्पना नव्हती. आम्ही मुद्दामच या हेतूबद्दल वाच्यता केली नव्हती. नंतर कुणी, सोविएत डॉक्टर, न्यायाधीश आणि इतर अधिकारी आधीच आमच्या प्रश्नांसाठी तयारी करून बसले होते असे म्हणावे असे आम्हाला वाटत नव्हते.

आम्ही यशस्वी झालो, कारण आमचे यजमान, तसेच इतरही लोक सोविएत नीतीमत्तेच्या आमच्या वैयक्तिक सर्वेक्षणाबद्दल अनभिज्ञ होते. आम्ही अनेक प्रदेश पालथे घातले, लांबवरच्या सफरी केल्या. जुनी, नवी मोठमोठी शहरे पाहिली, तशीच लहान गावेही पाहिली. तिथे राहिलो. असंख्य लोकांना भेटलो, त्यांच्याशी अगणित संवाद झाले. आम्ही रात्री उशीरा त्यांच्या रस्त्यांवर असायचो, रेल्वेतून, बसमधून, विमाने, बोटीमधून फिरायचो. कधी त्यांच्या घरांमध्ये, कारखान्यांमध्ये, इस्पितळांमध्ये, पर्यटनस्थळांवर असायचो, तर कधी कोर्टात, शाळेत तर कधी वृद्धाश्रमांमध्येही जायचो.

आणि जेव्हा आमचा प्रवास संपला, तेव्हा आम्ही अत्यंत समाधानाने हे म्हणू शकलोः Sin and Science मध्ये दिलेली तथ्ये खरोखरच सोविएत रशियातील प्रत्यक्ष जीवनाची तथ्ये आहेत. पुस्तकात जे वर्णन आहे त्याप्रमाणेच तिथे गोष्टी घडल्या आहेत. नवी नीतीमत्ता विकसित करण्यामध्ये रशियन लोकांनी मिळवलेले यश हे पुस्तकापेक्षाही अधिक प्रभावित करणारे आहे.

आम्ही हे प्रत्यक्ष पाहिले आहे. या आवृत्तीमध्ये आम्ही प्रत्यक्ष पाहिलेल्या, तपासलेल्या तथ्यांचीही शक्य तिथे जोड दिली आहे.

आज आमच्या मनात फक्त एकच खंत आहे ती म्हणजे समाजवादी युगामध्ये वीस कोटी लोकांच्या आयुष्यामध्ये घडून आलेले प्रचंड परिवर्तन आम्ही या पुस्तकामध्ये पूर्णपणे मांडू शकलेलो नाही. मानवी स्वभावाच्या पुनर्निर्मितीबद्दलच्या अनेक इतर पैलूंबद्दल आम्ही आमच्या We saw socialism या अधिक सविस्तर अहवालामध्ये लिहिले आहे.

– **डायसन कार्टर,** टोरोंटो, १९५२

# पाप आणि विज्ञान

## 'व्हिक्टरी गर्ल' आणि सामाजीकृत स्त्रिया

अमेरिकेच्या 'पब्लिक हेल्थ सर्व्हिसचे' मुख्य सर्जन डॉ. पैरन यांनी १९३६ साली एक ऐतिहासिक लेख लिहिला. लाखो लोकांना अचंबित करणाऱ्या या लेखाचा विषय होताः गुप्तरोग. आतापर्यंत हा विषय उघडपणे बोलत नसत. गुप्तरोगाविषयीची अनेक तथ्ये लोकांपासून लपवली जात. डॉ. पैरन यांनी मात्र आपल्या लेखात गरमी आणि परमा या दोन रोगांचा स्पष्ट उल्लेख केला होता.

सभ्य समाजाला हतबुद्ध करणारी ही तथ्ये अशी होतीः अमेरिकेमध्ये १९३६ साली ३० लाख लोकांना गरमीची लागण झाली होती. साधारण ९० लाख लोकांना परमाची लागण झाली होती. दरवर्षी पाच लाख नवीन लोकांना गरमीची आणि त्याच्या तिप्पट लोकांना परमाची लागण होत होती. गरमीमुळे होणाऱ्या हृदयरोगामुळे दरवर्षी हजारो लोक मृत्युमुखी पडत. गरमीच्या प्रभावामुळे मनोरुग्ण होणाऱ्या लोकांची काळजी घेण्यासाठी आणि त्यांच्यावर उपचार करण्यासाठी कोट्यवधी डॉलर खर्च होत होते. या दोन्ही रोगांमुळे होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक यातना भयानक होत्या. अशीच किंबहुना याहीपेक्षा वाईट परिस्थिती कॅनडा, इंग्लंड आणि इतरही अनेक देशांमध्ये होती. डॉ. पैरन यांनी हे स्पष्ट केले, की हे रोग म्हणजे काही थोड्या अनैतिकतेने वागणाऱ्या दुराचारी लोकांना झालेली शिक्षा नव्हे. समाजातील कोणत्याही जातीधर्माच्या, कोणत्याही वर्गाच्या लोकांना हे होऊ शकतात. या रोगांचा प्रसार इतक्या झपाट्याने होतो आहे, की देशाच्या जन–आरोग्याचा पायाच त्यामुळे खिळखिळा होऊ लागला आहे.

डॉ. पैरन यांच्या या मताला काही लोकांनी विरोध केला तरी बहुतेक धर्मगुरू, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, लोकप्रतिनिधी यांनी गुप्तरोगांना संपवण्याच्या लढ्यात मनापासून सहकार्य केले. एका पिढीतच गरमी हा खरा



प्राणघातक रोग निपटून टाकता येईल असे डॉ. पैरन यांनी सांगितल्यामुळे त्यांना हुरूप आला. हे साल होते १९३६. पुढील दोन वर्षांमध्ये हे आंदोलन तीव्र झाले. कायदे केले गेले. बरेच पैसे गोळा केले गेले. दवाखाने, प्रयोगशाळा सुरू झाल्या. हजारोंच्या संख्येने पत्रके वाटली गेली. हजारो लोकांची रक्त तपासणी करण्यात आली. मोठ्या प्रमाणात गुप्तरोगांशी लढा सुरू झाला.

१९४० मध्ये डॉ. पैरन यांनी दुसरा लेख लिहिला. आत्तापर्यंत फक्त एक पंधरांश गरमीचे रुग्ण बरे झाले होते. परमाच्या रोग्यांची संख्या तर जशीच्या तशीच होती. गुप्तरोगांविरुद्धचे हे आंदोलन अपेक्षित यश मिळवण्यात अपयशी ठरले होते. अमेरिकन सैन्यातील रुग्णांची संख्या तर बरीच वाढली होती.

आता सेनाधिकाऱ्यांनीही बडगा उगारला. पोलिस बळाचा वापर करून या सर्व प्रकारांसाठी वेश्यांना जबाबदार धरून त्यांचा छळ सुरू केला. समाजात वेश्याव्यवसाय दूर करायचा असेल तर त्यासाठी बिचाऱ्या वेश्यांना बळी देण्याचा उपाय समाजात नेहमीच केला गेला आहे.

मात्र खरी वैचारिक दिवाळखोरी तेव्हा समोर आली, जेव्हा अनेक प्रसिद्ध व्यक्तींनी भावनांनी ओथंबलेल्या शब्दांमध्ये लोकांना पापापासून दूर राहण्याचे, इंद्रियसुख विसरण्याचे, 'सदाचार' नामक पुरातन गुण आत्मसात करून या रोगांना उखडून टाकण्याचे आवाहन केले. थोडक्यात, सैनिकांनी काही काळाकरता पुरुषत्वाचा त्याग करून संन्यासी बनावे, असे हे आवाहन होते. अर्थात या अतीशहाण्या लोकांनी यात संन्याशाला कधीही गुप्तरोग होत नाहीत असे गृहीत धरले होते. तर अशा रितीने, वैज्ञानिक पद्धतीने सुरू झालेल्या या योजनेने अखेरीस असे मध्ययुगीन आवाहनाचे रूप धारण केले.

१९४३ साली उत्तर अमेरिकेच्या सैनिकांच्या सुरक्षा, आरोग्य आणि कल्याणासंबंधीच्या विभागामध्ये, गुप्तरोगांनी पीडित लोकांची संख्या पाहून मोठा विवाद उभा राहिला. सारा देश खडबडून जागा झाला, आणि याचा परिणाम म्हणून कडक अंमलबजावणी करून सर्व वेश्यागृहे बंद करण्याची मागणी पुढे आली. आश्चर्य म्हणजे, या मागणीला सैन्यातील अधिकाऱ्यांनीच विरोध केला. त्यांचे म्हणणे होते, वेश्यागृहे बंद केली तर या वेश्या सर्व शहरांमधून पसरतील. वस्त्यांमध्ये राहणाऱ्या वेश्यांकडे जाण्यापासून सैनिकांना थोपवणेच अधिक सोपे आहे. पण याला सुरक्षा, आरोग्य व कल्याण विभागाकडे उत्तर होते. घरात बसून एक वेश्या एका रात्रीत पन्नास सैनिकांनासुद्धा रोगग्रस्त करू शकते. पण तीच जर रस्त्यावर धंदा करू लागली तर तिच्याकडे तोंड लपवत जावे लागेल आणि मग तिला अर्ध्या

डझनाहून अधिक ग्राहक मिळणार नाहीत.

या विवादामुळे वेश्याव्यापार एक खूपच सुव्यवस्थित धंदा आहे आणि वेश्यांकडे जाणारे बहुसंख्य लोक आपल्याच आसपासचे तथाकथित सभ्य गृहस्थ आहेत, हे तथ्य लाखो प्रतिष्ठित नागरिकांना मान्य करावे लागले.

आता नैतिकतेच्या पुजाऱ्यांना 'व्हिक्टरी गर्ल' हा नवीन शब्द सापडला. चारातल्या तीन नाविकांना बिगर-व्यावसायिक मुलींकडून रोगसंसर्ग झाल्याचे आढळले. अशा अचानक कुठेतरी भेटणाऱ्या मुलींपासून काही धोका नाही असे त्या नाविकांना वाटले होते. व्यावसायिक वेश्यांच्या तुलनेत या मुलींची संख्या चौपट होती. साधारण चौदा ते चोवीस वय असलेल्या या मुली छोट्या छोट्या वस्त्यांमध्ये, मळ्यांमध्ये, किंवा कार्यालयांमध्ये कारकून म्हणून काम करण्यासाठी शेकड्यांनी येत. जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशननेसुद्धा या तथ्यांना पुष्टी दिली. जुन्या प्रकारच्या वेश्या आता मागे पडल्या आहेत. ही नव्या प्रकारची वेश्या सोळा ते चोवीस वर्षे वयाची कोवळी मुलगी आहे...आपण असे म्हणू शकतो की गुप्तरोग पसरवणारे लोक आपल्यापैकीच आहेत.

अशाच प्रकारचे अहवाल ब्रिटिश मेडिकल असोसिएशनच्या जर्नलने इंग्लंडबद्दल छापले. ऑस्ट्रेलियाच्या डॉक्टरांचा त्यांच्या देशातल्या अशा चारित्र्यहीन मुलींची संख्या अजूनच जास्त असल्याचा अंदाज होता. कॅनडातही या नव्या मुली देशातल्या कानाकोपऱ्यांमधून वेश्याव्यवसायाचा रस्ता पकडताना दिसून येत होत्या.

म्हणजेच, या 'व्हिक्टरी गर्ल्स' अनैतिकता आणि गैरवर्तनाचेच एक वेगळे रूप होते. युद्धकाळात मोठ्या संख्येने होणारे लोकसंख्येचे स्थलांतर, तसेच उद्योगधंद्यांचा अनियंत्रित आणि अनियोजित विकास अनैतिकता वाढण्यास मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरला. या नव्या प्रकारच्या व्यभिचारी मुलींमुळे नवा धोका निर्माण झाला आहे म्हणून जो आरडाओरडा केला जात होता, त्याला वास्तवातील अनेक तथ्यांनी खोटे ठरवले. या प्रवृत्ती तर १९२५ पासूनच दिसत होत्या. १९४४ मध्ये आरोग्य आणि शिक्षणासंबंधी एका अहवालात असे म्हटले आहे की तरुणांमधील जो दुराचार, गुन्हेगारी भयानक प्रमाणात वाढली आहे, त्याला फक्त हे नवे युद्धच कारणीभूत नाही, तर पहिल्या महायुद्धापासूनच ही प्रक्रिया सुरू झाली आहे, आणि चांगल्या आणि वाईट माणसांमधला सामाजिक फरक धूसर होऊ लागला आहे.



वरील विवेचनावरून दोन निष्कर्ष एकदम स्पष्ट होतात. एक म्हणजे गुप्तरोगांवर डॉक्टरी आक्रमण असफल ठरले. शिक्षणाच्या प्रसाराने आणि दवाखान्याच्या मदतीने गरमीचा रोग एका पिढीतच नष्ट होईल हे डॉ. पैरन यांचे गृहीतक अमान्य करावे लागले. गुप्तरोगांना अनैतिकतेच्या संपूर्ण समस्येपासून वेगळे काढणे शक्य नाही, ही एक साधी आणि स्वाभाविक गोष्ट आहे.

दुसरा निष्कर्ष जरा कमी स्पष्ट आहे. गुप्तरोगांचा नायनाट करण्यासाठी लढाई पुकारणारे लोक एका विचित्र एकांगी पद्धतीने विचार करताना दिसतात. स्त्रियाच या रोगांचे मूळ आहेत हे सिद्ध करताना ते भरपूर पुरावे सादर करतात. एका रात्रीत एक वेश्या किती पुरुषांना खराब करू शकते याचा हिशोब करताना जेव्हा या कृत्यातील पुरुषाबद्दल विचारणा होते, तेव्हा तो विषय टाळला जातो. स्त्रियांवर कडक कारवाईची मागणी करणारे पुरुषांच्या बाबतीत निव्वळ आकडेवारी देतात. तुरुंगवास, शिक्षा, पळवून लावणे, किंवा सुधारणा या गोष्टी फक्त स्त्रिया आणि मुलींसाठी. पुरुषांचा तर इलाज होतो, फार तर फार त्यांना काही उपदेश आणि रोगापासून वाचण्यासाठी उपयुक्त सामान दिले जाते.

जिथे संपूर्ण निष्पक्षतेची अपेक्षा केली जाते अशा विज्ञानाच्या क्षेत्रातही आपल्याला या एकांगीपणाचे दर्शन होते. डॉक्टर नेहमी असेच बोलताना दिसतात की स्त्रियांमुळे पुरुषांना रोग लागतो!

अनैतिकतेच्या प्रश्नामुळे अनेक गंभीर सामाजिक दुष्परिणाम घडण्याच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. आणि आपले वैज्ञानिक आणि धार्मिक नेते या कामी नुसताच गोंधळ वाढवण्यात यशस्वी झाले आहेत.

नैतिक समस्यांच्या विशेषज्ञांना जडबुद्धी म्हणणे वावगे ठरणार नाही. जडबुद्धी असणे हाच त्यांचा रोग आहे. यासाठी मूर्खपणा आणि पूर्वग्रह या दोन मानसिक रोगांचे जिवाणू कारणीभूत आहेत. शब्दकोशांमध्ये 'जडबुद्धी'चा अर्थ आहे, अशी व्यक्ती जिच्यापर्यंत कोणतेही विचार किंवा आदर्श घेऊन पोहोचता येत नाही. कादंबरीकार गोर्की यांनी त्यांची व्याख्या करताना त्यांना मानवी सुखाचे सर्वात घातक शत्रू म्हटले आहे. ते म्हणतात, जडबुद्धी लोकांची एकच घोषणा असू शकते, ती म्हणजे, जे जसे आजपर्यंत होते, ते तसेच राहणार आहे. मेलेल्या माशांसारखी त्यांची सुद्धा डोक्याकडून सडण्यास सुरुवात होते.

इतक्या कडक शब्दांमध्ये हे लिहिण्याचे कारण म्हणजे लोकशाहीतील नैतिक समस्या सोडवण्यात आपल्याला अपयश आले आहे आणि त्यामुळे आपल्यात अशा

समाजसुधारकांची संख्या खूपच वाढली आहे, जे सभांमधून बोलतानातर वेश्याव्यवसायावर जोरदार हल्ला चढवतात, पण खाजगीत मात्र हसून, खांदे उडवून पुटपुटतात, वेश्याव्यवसाय जसा आजपर्यंत चालू आहे तसाच राहणार. हेच ते शुद्ध जडबुद्धीवादी, मूर्खासारखे अनिष्ट भूतकाळाला मिठी मारून बसलेले आत्मसंतुष्ट, आत्ममग्न!

या अवस्थेचे वर्णन एका शब्दात करायचे तर– सडकी अवस्था!

आज आपण कोणत्याही स्वरूपात सडकी अवस्था सहन करायला तयार नाही. आपली पिढी इतिहासातील एक विशेष पिढी आहे. मोठ्या प्रमाणात आपण भूतकाळातील सर्व दुःखांना नष्ट करण्याच्या कामी लागलो आहोत. संपूर्ण मानवजात आज वेगाने स्वतःसाठी खरेखुरे सुंदर आणि महान भवितव्य निर्माण करू पाहते आहे.

नैतिकतेवर जडबुद्धी दृष्टिकोन असा आहे, की सामाजिक भ्रष्टाचार आपल्यामध्ये कायमच राहिला आहे, आणि तो सदासर्वकाळ तसाच राहील. गुलामी प्रथापरंपरांचा विचार केला तर लगेच लक्षात येईल की हे एकदम खोटे आहे. हजारो वर्षांपर्यंत माणसांची खरेदी–विक्री होत होती, तेव्हासुद्धा तेव्हाचे जडबुद्धीवादी हेच म्हणत होते, की ही प्रथा कायम अशीच राहील. पण एका शतकात सुसंस्कृत राष्ट्रांनी गुलामी प्रथा मुळापासून उखडून टाकली. युगायुगांपासून जगातले कोट्यवधी लोक गुलामी, कंगाली आणि विविध रोगांच्या भट्टीत खाक झाले आणि ज्यांना या सगळ्याचा सामना करावा लागत नाही, ते पोट भरलेले जडबुद्धीवादी कण्हतात, की हे सर्व सनातन काळापासून चालत आले आहे.

ज्याकाळात गुप्तरोगांच्या विरोधातली अमेरिकन मोहीम सर्वोच्च बिंदूवर होती, तेव्हा सार्वजनिक सुरक्षा विभागाच्या फिलिप एस. ब्रौटन यांनी एक पुस्तिका लिहिली होती. तिचे नाव होते, 'वेश्याव्यवसाय आणि युद्ध'. या पुस्तिकेत ते म्हणतात, वेश्याव्यवसाय काही असा व्यवसाय नाही, ज्याला चालवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करायला हवेत. तो स्वतःच पसरतो. मधामागे मधमाश्या लागाव्यात किंवा जहाजामागे समुद्रपक्षी उडावेत तसाच. इतिहासातील प्रत्येक सेनेला, प्रत्येक बंदराला, प्रत्येक वेळी जेव्हा जेव्हा औद्योगिक तेजी आली त्या त्या वेळी याचा सामना करावा लागला आहे, आणि त्याच्याबरोबर प्रत्येक वेळी रोग आले आहेत. श्री. बौटन यांचे म्हणणे येथे मांडण्याचे कारण एवढेच, की एकतर ते काही प्रमाणात सरकारी मत आहे, आणि शिवाय अनैतिकतेकडे पाहण्याच्या एका सर्वमान्य, पराजयवादी आणि उथळ दृष्टिकोनाचाच तो एक नमुना आहे. पण श्री.



ब्रौटन यांनी केलेली ही विधाने संपूर्णपणे खोटी आणि निराधार आहेत.

इतिहासातील सर्वात मोठ्या सेनांपैकी एक सेना अशी आहे, जी वेश्याव्यवसाय आणि त्याच्या दुष्परिणामांपासून मुक्त आहे. आत्तापर्यंतच्या सर्वात मोठ्या औद्योगिक प्रगतीचे वैशिष्ट्य वेश्याव्यवसायात वाढ हे नाही, तर वेश्याव्यवसायाचा खात्मा हे आहे. गेल्या वीस वर्षात बांधल्या गेलेल्या अनेक औद्योगिक नगरांमध्ये आणि विशाल बंदरांमध्ये अनैतिकतेची समस्या नाहीच – थोडीसुद्धा नाही!

खरेतर असा एक देश आहे, जिथे वीस कोटी लोकसंख्येच्या समाजातून वेश्याव्यवसाय आणि गुप्तरोगांना खऱ्या अर्थाने नेस्तनाबूत करण्यात आले आहे. हा देश आहे – सोविएत समाजवादी प्रजातंत्र संघ!

अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या देशांतील विज्ञानसंबंधी मासिकांमधून आरोग्य चिकित्सकांनी डझनांनी लेख लिहून छापले आहेत, तसेच इतरही अनेक निष्पक्ष निरीक्षकांनी मान्य केले आहे, की सोविएत रशियामध्ये गेल्या वीस वर्षात अनैतिकतेसंबंधीच्या सर्व गंभीर समस्या आश्चर्य वाटेल इतक्या यशस्वीरित्या सोडवल्या गेल्या आहेत. यात व्यभिचार आणि दारूसंबंधीच्या समस्यासुद्धा आहेत. आणि विशेष हे की वीसच वर्षांपूर्वी रशियातील जनतेमध्ये व्यभिचार आणि दारूबाजीचे जे प्रमाण होते, ते इतिहासात इतर कुठेही नसेल.

हिटलरने पूर्वेकडे युद्ध सुरू केल्यानंतर, मॉस्कोमधल्या हॅरिमॅन मिशनचे एक सदस्य आणि अमेरिकन दूतावासाशी संबंधित आरोग्यविभागाचे अधिकारी अमेरिकन नौसेनेचे कमांडर नॉर्मन यांनी वार्ताहरांना सांगितले होते, लाल सैन्य आणि लाल वायुसेना गुप्तरोगांपासून जवळजवळ मुक्त आहे. जगातल्या इतर कोणत्याही सेनेबद्दल असे विधान करता येणार नाही. त्यांचे हे विधान फारच कमी वर्तमानपत्रांनी छापले. मित्र–राष्ट्रांचे गुप्तरोगविरोधी आंदोलक तर हे वाचून गप्पच झाले. तीन वर्षानंतर, सोविएत रेड क्रॉस संघटनेचे प्रतिनिधी प्रोफेसर लेबेडॅन्को यांच्या विधानाने तर वार्ताहरांना चकितच केले. ते म्हणाले, रशियन तरुणांच्या नव्या पिढीला वेश्याव्यवसायाचा अर्थसुद्धा माहिती नाही. या विधानाबद्दल अनेकांच्या मनात खूपच उत्सुकता निर्माण झाली, तर काहींना हे विधान खरेच वाटले नाही. तरीसुद्धा त्याबाबत जनतेमधून जे प्रश्न उमटले, त्यांना अमेरिकेत फटाफट दाबून टाकण्यात आले.

त्या काळात कॅनडा आणि रशियामधले संबंध मैत्रीपूर्ण नव्हतेच. सोविएत रशियाच्या अनैतिकतेविरुद्धच्या संघर्षाची संपूर्ण कहाणी शोधायचा प्रयत्न केला

असता असे लक्षात आले की यासंबंधी इंग्रजीमध्ये अजून काहीच छापले गेलेले नाही. त्यानंतर मात्र, व्यक्तिगत संपर्कामधून काही गोष्टी विस्ताराने समजल्या. याच प्रकारे अनेक तथ्ये आणि अहवाल जमा केले. या पुस्तकातून याच सगळ्या अहवालांमधून समोर आलेली कथा मांडली आहे.

या पुस्तकाच्या आधीच्या आवृत्तीमध्ये व या आवृत्तीमध्ये एक मुख्य फरक आहे तो म्हणजे, एवढ्यातच मी आणि माझी पत्नी प्रत्यक्ष रशियाला जाऊन आलो. त्यामुळे या आवृत्तीमध्ये स्वतः पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या काही गोष्टींचा समावेश आहे. या आवृत्तीमध्ये तुम्ही जे वाचाल तो सरकारी दस्तावेजांमधून मिळवलेल्या तसेच स्वतः आपल्या डोळ्यांनी पाहिलेल्या तथ्यांचा निःपक्ष अहवाल आहे.

## वेश्याव्यवसायासाठी पिवळ्या तिकिटाची व्यवस्था

१९१७ मध्ये क्रांतीनंतर कम्युनिस्टांना देशाच्या आर्थिक आणि भौतिक हलाखीबरोबरच ज्या नैतिक अधःपतनाचा वारसा मिळाला होता तो इतका भयानक होता, की त्यावर सहजासहजी विश्वास ठेवता येत नाही. रशियामध्ये अनैतिकतेचा आधार होती वेश्याव्यवसायाची संघटित व्यवस्था, जी झारच्या आश्रयाने पोसली गेली होती. त्या काळी ती 'पिवळ्या तिकिटाची व्यवस्था' या लाजिरवाण्या नावाने ओळखली जात असे.

झारच्या रशियामध्ये सर्व नागरिकांना नोंदणीसाठी तसेच ओळखीसाठी एक प्रमाणपत्र दिले जात असे, ज्याला पासपोर्ट म्हणत. खरे तर, सर्व नागरिकांसाठी हा पासपोर्ट म्हणजे जणू जिवंत राहण्यासाठीचा परवाना होता. पण असे अनेक लोक होते, ज्यांना हे पासपोर्ट परत करण्याची सक्ती केली जात असे. जसे की अशा महिला ज्यांनी उपजीविकेसाठी वेश्याव्यवसाय पत्करला होता. झार शासनाच्या मते हा व्यवसाय देशातील पुरुषांच्या हिताकरिता आवश्यक होता. या स्त्रियांची स्थिती आणि त्यांच्या अनैतिक कारवाया यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारी कायदेकानून अस्तित्वात होते.

जी स्त्री वेश्याव्यवसाय करेल तिने आपला पासपोर्ट परत करून, म्हणजेच आपले नागरिकत्व सोडून आपली नोंदणी करून घ्यावी आणि ते बदनाम 'पिवळे तिकिट' घ्यावे असा कायदा होता. पोलिस अधिकारी खुल्लमखुल्ला ही तिकिटे वाटत असत. वेश्याव्यवसाय करणाऱ्यांसाठी ते एकप्रकारचे सरकारी लायसेंसच होते. पण पिवळे तिकिट घेतलेल्या बाईला आपल्या नागरिकत्वाच्या सर्व अधिकारांपासून



वंचित रहावे लागत असे. हे पिवळे तिकिट तिला मानवापेक्षा खालच्या जातीचा प्राणी म्हणून घोषित करत असे. आणि सर्वात भयानक गोष्ट ही, की एकदा हे तिकिट घेतलेली महिला आयुष्यभरासाठी या जाळ्यात अडकून राहत असे. झारचे अधिकारी कोणत्याही महिलेचे नागरिकत्व काढून घेऊन तिला पिवळे तिकिट देण्यासाठी तत्पर असत, पण पुन्हा परत फिरण्याची, विचार बदलण्याची मुभा कायदा देत नसे. एकदा हा व्यवसाय स्वीकारला, की त्या स्त्रीला पुन्हा दुसरे कोणतेही भले काम करण्याची परवानगी नव्हती. नागरिकत्वाच्या पासपोर्टशिवाय नोकरी मिळवणे अशक्य होते. अनैतिक मार्गक्रमण करणाऱ्या या स्त्रिया आणि मुलींना सुधारण्याचे प्रयत्न शासनातर्फे कधीच केले जात नसत. उलट कायद्यानेच अशा सुधारणा होऊ न देण्याची तजवीज केलेली होती.

बहुतेक वस्त्यांमधून या पिवळे तिकिटधारी महिलांना वेगळ्या खास घरांमध्ये रहावे लागे. या घरांना सरकार दरबारी 'व्यभिचाराचे अड्डे' असे नाव दिले होते. ज्या घरांमधून खूपसे लोक राहत, त्या घरांच्या दर्शनी भागांमध्ये त्यांच्या नवांची यादी दिलेली असे. या यादीत या बदनाम स्त्रियांची नावे पण असत. पण त्यांना आपल्या नावासमोर 'वेश्या' असा शब्द लिहावाच लागे. यापेक्षा अधिक सामाजिक पतनाची कल्पना करणेही कठीण आहे.

म्हणायला ही पिवळ्या तिकिटाची व्यवस्था अनैतिकतेला आळा घालण्यासाठी होती, पण वेश्याव्यवसाय 'थांबवण्या'साठीच्या या सर्व कायद्यांचे उद्दिष्ट खरे तर वेश्यांच्या बाजारासाठी मोठ्या प्रमाणात स्त्रिया जमवणे हेच होते.

व्यभिचारांच्या या अड्ड्यांवर कधी कधी कमतरता निर्माण होई, किंवा सैन्यातील अधिकारी तक्रार करत की सैन्याच्या तुकड्यांमध्ये गरमी रोग फैलावला आहे. त्यामुळे नव्या मुलींची आवश्यकता भासे. अशा वेळी कायद्याच्या अंमलबजावणीच्या नावाखाली पोलिस धडाधड छापे टाकत आणि मजूर वस्त्यांपासून ते सर्व रस्ते, घरे, मनोरंजनाची ठिकाणे यांची अंदाधुंद तपासणी होई. यात व्यावसायिक वेश्यांना अटक करण्याबरोबरच काही सामान्य मुलींनाही पकडले जाई. त्यांना मग न्यायालयात उभे करून त्यांच्यावर पिवळे तिकिट न घेता धंदा केल्याचा आरोप ठेवला जाई. या गुन्ह्याकरिता दंड होता पाचशे रूबल. एवढी मोठी रक्कम देणे एखादीलाच जमे. तर मग कायद्यात त्यासाठी दुसरी व्यवस्था होतीच. अपराधी स्त्रीने तिचा नागरिकत्वाचा पासपोर्ट परत करून त्याजागी पिवळे तिकिट घ्यायचे. हे छापे इतके बेमालूमपणे मारले जात की वेश्या आणि नव्या मुलींव्यतिरिक्त अनेक गरीब गरत्या बायकांनाही धरले जाई. कधीकधी या पकडलेल्या स्त्रियांमध्ये

गरोदर, तान्हे मूल असलेल्या स्त्रियाही असत मग फसवायच्याच हेतूने धरलेल्या नव्या मुली सोडून इतरांना अगदी उदारपणे सोडून दिले जाई. अशा प्रकारे 'धंद्यासाठी बायका जमवण्याच्या' या घृणास्पद कारवाईला कायदेशीर रूप दिले जाई.

विशेष भर देऊन सांगायचा मुद्दा हा, की झारच्या न्यायालयांमध्ये स्त्रियांची स्थिती फारच कमजोर असे. सर्वच स्त्रियांच्या बाबतीत हे खरे असले, तरी विशेष करून ज्या स्त्रिया अनैतिक स्वरूपाचे जीवन जगत होत्या, त्यांची अवस्था खूपच वाईट होती. पिवळे तिकिट हे प्रत्यक्षात नरकाचे तिकिट होते. पोलिसांच्या जाचातून सुटण्याचे दोनच मार्ग होते, एक तर असा महाभयंकर आजार, ज्यामुळे स्त्री पुरुषांच्या कामाची उरत नाही, किंवा मग मृत्यू.

अशा परिस्थितीत गुप्त रोग वाढत होते, पसरत होते. त्यांचा अंत करण्यासाठी रशियन विशेषज्ञांनी काहीच उपाय करण्याचे प्रयत्न केले नव्हते असे नाही. आजचे आधुनिक विशेषज्ञ करत आहेत, ते सर्व उपाय क्रांतीच्या आधीच करून झाले होते. पण हे सगळे उपाय म्हणजे ढोंग आहे आणि ते मूळ प्रश्नाला हात घालत नाहीत हे सर्वांनाच कळून चुकले होते.

१९१७ च्या रशियातील व आज आपल्या येथे आहे ती अनैतिकतेची समस्या एकसारखीच आहे. आज आपल्या येथेही अनैतिकता वाढीस लागली आहे. झार शासनाच्या न्याय-विभागाच्या सरकारी आकडेवारीनुसार पहिल्या महायुद्धाच्या आधीच्या वीस वर्षांमध्ये वेश्याव्यवसाय आणि गुन्हे यांचे प्रमाण सातत्याने वाढत होते. खून तसेच इतर हिंसक अपराधांमध्ये पन्नास टक्क्यांनी वाढ झाली होती. याहीपेक्षा तिप्पट वेगाने लैंगिक गुन्ह्यांमध्ये वाढ झाली होती. पिवळ्या तिकिट व्यवस्थेमुळे हे अपराध कमी तर झाले नाहीच, उलट, या व्यवस्थेच्या विकासाच्या प्रमाणातच गुन्ह्यांमध्ये पण वाढ झाली. १९१३ मध्ये, एकट्या पीटर्सबर्ग (आताच्या लेनिनग्राड) शहरामध्ये, सरकारी लायसेंस असलेल्या वेश्यांची संख्या साठहजार होती. तरुण दारूबाजांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली होती. क्रांतीच्या आधी दहातील आठ वेश्या २१ पेक्षा कमी वयाच्या होत्या. त्यापैकी निम्म्याहून अधिकांनी १८ वर्षे पूर्ण होण्याच्या आधीच हा व्यवसाय पत्करला होता. अनेक जणी तर १४ वर्षे पूर्ण होण्याच्याही आधीच या मार्गाला लागल्या होत्या.

झारशाहीत/राजेशाहीत लोकांना मानव म्हणून नाही तर पशू म्हणूनच जगावे लागते, एवढे म्हणून या सर्व तथ्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कारण आपल्या देशांमध्ये तर आजही तीच परिस्थिती आहे. आपल्या 'व्हिक्टरी गर्ल्स' कमी



वयाच्या, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मुलींच्याच वयाच्या आहेत. सामाजिक इतिहास सांगतो, की जेव्हा जेव्हा नैतिक अधःपतन वाढते, तेव्हा कमी वय असलेल्या गुन्हेगारांची संख्या वाढत असते.

आता आपण सावध होऊ लागलो आहोत, डॉक्टरांनी आपले प्रयत्न वाढवले आहेत, पुरोहित, पादरी, धर्मगुरू उपदेश आणि सूचना देत आहेत, राजकीय नेते विशेषज्ञांच्या समित्या बनवत आहेत.

क्रांतीच्या सात वर्षे आधी, सुधारणा आंदोलनांच्या रेट्यामुळे अनैतिकतेच्या विरुद्ध संघटित संघर्ष करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून झारला एक काँग्रेस बोलवावी लागली. यात चर्चेचा प्रमुख विषय होताः अनैतिकतेचे नियंत्रण करणाऱ्या सरकारी यंत्रणेला संपवणे. रशियातील कामगार संघटनांनी सुद्धा या काँग्रेसला भरपूर महत्त्व दिले, आणि त्यात सहभागी होण्यासाठी आपले प्रतिनिधी पाठवले. चर्चेत त्यांनी झारशाहीतील समाजव्यवस्थेवर सडेतोड टीका केली. झारशाहीतील आर्थिक आणि राजकीय भ्रष्टाचारच या अनैतिकतेच्या वाढीचे मूळ कारण असल्याचे सांगून भविष्यवाणी केली, की तो असेपर्यंत वेश्याव्यवसाय आणि गुप्तरोगांसारख्या समस्या सोडवण्याचा शासनाचा प्रत्येक प्रयत्न असफल होईल. चर्चेत या भविष्यवाणीवर कोणताही विचारविनिमय झाला नाही. कारण तसे केल्यास सगळ्या काँग्रेसलाच सैबेरियाची हवा खायला जावे लागेल अशी स्थिती होती. परिणामी, जिंकले पोलिस अधिकारीच. त्यांच्या मते, पिवळ्या तिकिट्ची व्यवस्था सर्वोत्तम होती, आणि त्यांच्या दृष्टीने हेच बरे होते की 'चांगल्या' घरातील मुली-सुनांवर अनैतिकतेचा प्रभाव पडण्यापेक्षा कनिष्ठ वर्गांमधल्या लाखो स्त्रियांनी अनाचाराचे जीवन जगत राहावे. मात्र हेही बोलण्यापुरतेच होते. खरे कारण तर हे होते, की या कायद्यांचा रशियन सरकारला मोठा आर्थिक फायदा होता. स्त्रियांकडून वरचेवर मोठ्या रकमा गोळा करून त्या झारशाहीच्या भ्रष्ट शासनाच्या तिजोरीत जमा करता येत होत्या.

तात्पर्य, काँग्रेसच्या संचालकांनी या सामाजिक रोगांच्या आर्थिक बाजूंचा विचार करायला नकार दिला आणि ते दोन्ही हात उंचावून ओरडत, किंचाळत राहिले, खालच्या वर्गातल्या स्त्रिया आणि मानवाची सनातन पापवृत्तीच या समस्येला कारणीभूत आहे.

मॅक्सिम गॉर्की यांच्या शब्दात सांगायचे तर झारशाही आणि तिचे समर्थक मेलेल्या माशांप्रमाणे मेंदूकडून खाली सडत चालले होते.

## बंधनमुक्त प्रेम आणि वैज्ञानिक नैतिकता

१९१७ च्या नोव्हेंबर क्रांतीमुळे झारकालीन जीवनाचे खरे रूप बाहेर आले. रखडत चाललेल्या अर्धसरंजामी व्यवस्थेला तिने उद्ध्वस्त केले. शतकानुशतके पाळल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित, पण आतून पोखरलेल्या रीतीरिवाजांना उलथून टाकले. काही दिवसांसाठी तर रशियातील दीर्घकाळ अस्तित्वात असलेली आर्थिक, राजकीय आणि सामाजिक विषमता अजूनच वाढली. अनैतिकतेवर प्रभावी हल्ला करायला सोविएत सरकार काही काळ असमर्थ ठरले.

जिच्या मुळाशी असंख्य स्त्रियांची गुलामगिरी आहे अशी नैतिकता खरे स्वातंत्र्य देऊ पाहणाऱ्या समाजव्यवस्थेमध्ये टिकू शकणार नाही ही क्रांतीच्या सुरुवातीच्या काळापासूनच कम्युनिस्ट नेत्यांची धारणा होती. जिथे जिथे सोविएत सत्ता स्थापन झाली, तिथे तिथे प्रशासन पोलिसांच्या हातातून गेले आणि जनतेच्या हाती आले, आणि अशा सर्व ठिकाणी जो पहिला कायदा पास केला गेला, तो होता पिवळ्या तिकिटांच्या व्यवस्थेचा शेवट. १९१७ नंतर रशियातील वेश्यांनी अधिकाऱ्यांना नजराणे देणे बंद केले. हा बदल अत्यावश्यक होता. क्रांती यशस्वी करण्याचे संपूर्ण श्रेय संघटित कामगारवर्गाचे होते आणि या क्रांतीचे उद्दिष्टही या कामगारवर्गाचे हित हेच होते. गरीब शेतकरी वर्ग सुद्धा या क्रांतीचा समर्थक होता. रशियातील बहुसंख्य वेश्या या खेड्यांमधून आणि शहरातील गरीब वस्त्यांमधून आलेल्या निर्धन स्त्रिया होत्या. त्यामुळे नवे सरकार या असहाय्य स्त्रियांचे अमानवी शोषण तसेच चालू राहू देणे शक्यच नव्हते.

परिणामी पिवळे तिकिट बंद झाले. सर्व स्त्रियांना पुन्हा नागरिकत्व मिळाले. परंतु तरीही अजूनही ते प्रतिकात्मकच होते. क्रांतिकारकांमध्ये असेही आदर्शवादी होते, ज्यांना वाटत होते, की या स्त्रियांना त्यांच्या प्रतिष्ठित शेजाऱ्यांप्रमाणे मतदानाचा अधिकार दिला जाणे म्हणजेच त्यांना उचित मानसन्मान मिळणे होय. त्यांचा हा भ्रम मोडायला फार दिवस लागले नाहीत. जुनी राज्यव्यवस्था मोडल्यानंतर एक मोठा काळ रशियन समाजजीवन विस्कळितच राहिले. अनैतिकतेची अनेक रूपे नोव्हेंबर क्रांतीनंतर वाढली होती, ज्यात अल्पवयीन वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणात होता.

लवकरच लक्षात येऊ लागले की क्रांतीमुळे जे स्वातंत्र्य मिळाले आहे, त्याचे वेगवेगळे अर्थ लावले जाऊ लागले आहेत. झारशाही उद्ध्वस्त होताच काहीजणांनी भांडवलशाही नीतीनियमसुद्धा उलथून टाकायला सुरुवात केली. त्यांनी निष्कर्ष काढला, की व्यभिचार संपवण्याचा एकच उपाय आहे – बंधनमुक्त प्रेम, लैंगिकतेसंबंधीचे सर्व प्रतिबंध नष्ट करणे. भूक लागली की जेवायचे, तहान लागली



की पाणी प्यायचे तसेच जेव्हा कामेच्छा जागृत होईल त्यावेळी समोर असेल त्याच्याबरोबर प्रेम करणे. अशाप्रकारे मग अनैतिकतेला स्थानच उरणार नाही असा काही रशियन तरुणांचा आणि बुद्धिजीवींचा विचार होता. या लोकांनी हा विचार केला नाही, की यामुळे नैतिकता ही गोष्टच संपून जाण्याचा धोका आहे.

बहुतेक रशियन बुद्धिवादी नैतिकतेसंबंधीची प्रत्येक गोष्ट गुलामी म्हणून उडवून लावत होते. त्यांची इच्छा होती स्त्रीपुरुष संबंधांवरून प्रत्येक बंधन हटवण्याची. प्रत्यक्षात याचा अर्थ होताः सर्व स्त्रियांसाठी प्रतिबंधरहित वेश्याव्यवसाय.

सोविएत नेत्यांच्या सिद्धांतामध्ये आणि कृती कार्यकर्मामध्ये मात्र अशा बंधनहीन शारीरिक संबंधांसाठी कोणतीही जागा नव्हती. उलट ते हे जाणून होते, की व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या नावाखाली नैतिकतेसंबंधीच्या नियमांना नष्ट करणे हेच समाजवादी प्रगतीच्या आड येईल. सोविएत सत्तेला उलथवून टाकण्याच्या तयारीत असलेल्या जागतिक शक्ती मात्र रशियामध्ये स्त्रियांचे सामाजीकरण झाले आहे, कोणताही पुरुष कोणत्याही स्त्रीचा उपभोग घेऊ शकतो अशीच बोल्शेविकांची नीती आहे, रशियातून विवाहाची प्रथाच संपवली गेली आहे आणि मुलांना सरकारी दवाखान्यांमधून त्यांच्या आई–बापांचा नाव पत्ता न सांगता सांभाळले जाते अशा प्रकारचा भडक प्रचार करत होत्या.

गोर्की यांनी नवी पिढी करत असलेल्या नैतिकतेच्या व्याख्येचा कडक शब्दात समाचार घेतला आहे. १९२० मध्ये त्यांनी जे लिहिले, ते आजही सत्य आहे. 'लैंगिकतेसंबंधी नवीन पिढी जो विचार करते आहे, ते उथळ आहेत आणि त्याची किंमत काही दिवसातच त्यांना चुकवावी लागेल.

बंधनमुक्त प्रेमासंबंधांच्या प्रचारकांवर सरकारी पातळीवरूनही लेनिन यांनी हल्ला चढवला. तहान लागण्याइतकीच कामेच्छासुद्धा स्वाभाविक गोष्ट आहे आणि तिची पूर्तता इच्छा झाल्याबरोबर करून टाकली पाहिजे या विचाराबाबत सोविएत सत्तेचे प्रवर्तक लेनिन यांना क्लारा झेटकिन यांनी प्रश्न विचारला असता, त्यांनी या विचाराचे जोरदार खंडन केले. ते म्हणाले, तहान अर्थातच भागवली पाहिजे. पण सर्वसाधारण परिस्थितीत एखादा माणूस गटारीतून किंवा इतरांनी उष्टावलेल्या ग्लासातून पाणी पिणे पसंत करेल काय? पण या संबंधातील सामाजिक बाजू ही त्याहीपेक्षा महत्त्वाची आहे. पाणी पिणे ही एक व्यक्तिगत बाब आहे. प्रेमामध्ये दोन जिवांचा संबंध अभिप्रेत आहे, आणि त्यातून एका तिसऱ्या जिवाचा जन्म होतो. या कारणामुळेच, प्रेमसंबंधांना सामाजिक महत्त्व प्राप्त होते, जे समाजाप्रती व्यक्तीचे कर्तव्य काय ते ठरवते. एक कम्युनिस्ट असल्यामुळे मला या पाणी पिण्याच्या

सिद्धान्ताविषयी जराही सहानुभूती नाही...

लैंगिकतेसंबंधी स्वातंत्र्याचा ते कोणत्या पातळीपर्यंत विरोध करतील असे विचारले असता लेनिन म्हणाले, माझ्या विरोधाचा मुद्दा म्हणजे संन्यासवादाचा प्रचार नव्हे. कम्युनिझम संन्यासवादाला प्रोत्साहन कधीच देणार नाही. उलट तो स्थापना करेल सुखी, शक्तिशाली जीवनाची! त्यासाठी आनंददायी प्रेमजीवन सहाय्यकच सिद्ध होईल. परंतु ज्याप्रकारे सध्या लैंगिकतेशी संबंधित गोष्टींवर जोर दिला जात आहे, त्यामुळे माझ्या मते जीवनाला सुख आणि शक्ती मिळणार नाही, उलट त्यामुळे सुख आणि शक्ती नष्टच होईल. महान परिवर्तनाच्या या काळात ही गोष्ट फारच वाईट आहे. तरुण स्त्री-पुरुषांना विशेष करून जीवनातील सुख आणि शक्तीची खूपच गरज आहे. आरोग्यवर्धक खेळ, विविधांगी बौद्धिक क्रिया, शिक्षण, अभ्यास, संशोधन... नव्या पिढीच्या लोकांसाठी या गोष्टी लैंगिकतेच्या समस्यांवर चर्चा चर्वण करण्यापेक्षा अधिक फायद्याच्या आहेत. स्वस्थ शरीर तरच स्वस्थ मन!

लेनिन यांच्या या वक्तव्यावरून सोविएत नेत्यांचा लैंगिकतेसंबंधी समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा होता ते स्पष्ट होते. खरेतर, सोविएत कार्यक्रम रशियाच्या आर्थिक आणि राजकीय जीवनाच्या पुनर्रचनेपुरताच मर्यादित नव्हता. तो त्याहीपेक्षा अधिक व्यापक आणि विस्तृत होता. सोविएत सरकारचे उद्दिष्ट फक्त माणसाचे रोजचे जीवन बदलणे एवढेच नव्हते, तर माणसाचा स्वभाव बदलणे हेसुद्धा होते.

मॉस्को स्पोर्ट्स क्लबच्या पुढील घोषणेत हे उद्दिष्ट ठळकपणे दिसते, आम्ही मानवी समाजाची पुनर्रचना केवळ आर्थिक आधारावर करत नाही, तर मनुष्यजातीलाच वैज्ञानिक सिद्धांताच्या आधारे सन्मार्गावर आणत आहोत.

वैज्ञानिक तत्त्वांचे आधार घेऊन मानवसमाज सुधारणे हा विचार नवा आहे. सर्वप्रथम यामध्ये मानवजातीला सुधारण्याची गरज आहे हे मान्य केले आहे. दुसरे, हेही मान्य केले आहे की मानवजातीला सुधारले जाऊ शकते. थोडक्यात, मानवी स्वभावाला वैज्ञानिक नियमांच्या मदतीने सुधारणेध्बदलणे शक्य आहे. मात्र हे फक्त व्यवस्थित, योजनाबद्ध पद्धती वापरूनच करता येणे शक्य आहे.

इतिहासातील नैतिकतेसंबंधीचा हा सर्वात मोठा प्रयोग वरील तीन गोष्टींवरच्या अविचल विश्वासावर आधारलेला होता.

आपल्या देशांमध्ये अनैतिकतेच्या विरोधात मोठमोठी वैद्यकीय आंदोलने झाली आहेत. पण त्यांचे काहीच महत्त्वपूर्ण परिणाम निघालेले नाहीत. त्यांचे उद्दिष्ट फक्त



गुप्तरोग नष्ट करणे एवढ्यापुरतेच मर्यादित असूनही विशेष फायदा झाला नाही. या अपयशाचे विश्लेषण करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. आपल्या लोकशाही देशांमधल्या एकाही जबाबदार शास्त्रज्ञाने अनैतिकतेचा प्रश्न सोडवण्यासाठी शास्त्रशुद्ध संशोधन केले पाहिजे, असे म्हणण्याचे धाडस केलेले नाही. पण सोविएत नेते मात्र शास्त्रशुद्ध उपाययोजनांबद्दल एवढे आशादायी का होते?

पहिल्यांदाच, सोविएत शास्त्रज्ञांनी अनैतिकता ही सर्वांना समजेल अशी गोष्ट बनवून टाकली. दुसरे, त्यांनी 'पाप' या शब्दावरून रहस्याचा पडदा दूर केला.

## भांडवलशाहीने प्रेमाला सन्माननीय स्थान दिले

मानवासाठी लैंगिक इच्छा ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. एका अर्थाने तिची तुलना भूक आणि तहान यांच्याबरोबर केली जाऊ शकते, कारण ही इच्छा तृप्त करण्याची गरज भासते. सोविएत जीवशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि मानववंशशास्त्रज्ञांनी पाण्याच्या ग्लासाच्या रुक्ष आणि भौतिकवादी सिद्धांताची नीट तपासणी केली, आणि ते या निष्कर्षाला पोहोचले, की लैंगिक इच्छा ही तहान या गोष्टीपेक्षा मुळातच भिन्न आहे. कामेच्छा जन्मापासून नसते. कुमारावस्था प्राप्त झाल्यानंतरच ती पूर्णपणे विकसित होते. कामेच्छा जागृत होते, तेव्हाच मुला-मुलींच्या शरीर व मनात महत्त्वपूर्ण बदल होतात. मानवांमध्ये या इच्छेमुळे मिळणारा आनंद आणि तृप्ती ही मन, विचार, धारणा, स्वप्न यांच्या प्रभावामुळे अधिकाधिक वाढत जाते. भूक आणि तहान निरंतर भागवत राहणे हे शरीर जिवंत ठेवण्यासाठी गरजेचे असते. परंतु लैंगिक इच्छेची तृप्ती त्या अर्थाने आवश्यक नसते. मात्र, मानवासाठी लैंगिक संबंधांचे जैविक परिणाम स्वतः जिवंत राहण्याच्या इच्छेपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण आहेत. या संबंधांमधून माणूस माता-पिता बनतो, नव्या जिवाला जन्म देतो, मानवजातीचे सृजन करतो. पण याचबरोबर हेही तितकेच खरे आहे की संभोगातून मोठ्या प्रमाणावर आनंद मिळतो. हा आनंद मानवी मनाने इतका रंगीबेरंगी आणि गुंतागुंतीचा करून ठेवला आहे, की त्याची तुलना भूक-तहान भागवण्याशी होऊच शकत नाही. या मुद्द्यावरूनच रशियन शास्त्रज्ञांनी आधीच्या नीतीतज्ज्ञांपासून फारकत घेतली आणि पुढचे पाऊल टाकले. त्यांनी हे मानण्यास नकार दिला की मानवी विकासाच्या इतिहासात लैंगिक संबंध अपरिवर्तित राहिले. त्यांनी हेही मानण्यास नकार दिला की लैंगिक समस्या ही कधीही न सुटणारी समस्या आहे. आधुनिक समाजातील माणसांचे लैंगिक संबंध भूतकाळातील समाजांपेक्षा पूर्णतः भिन्न आहेत, हा नवा विचार त्यांनी जुन्या विचारांना आव्हान देत मांडला.

आपण ज्याला 'प्रेम' म्हणतो, त्याची त्यांनी नवी व्याख्या मांडली. ऐतिहासिक तथ्यांच्या आधारे त्यांनी हा निष्कर्ष काढला, की आपण आज ज्याला प्रेम म्हणतो, ते मानवी समाजाच्या महान, प्रगतीशील, क्रांतीकारी विकासाचे द्योतक आहे. प्रेमाबद्दलची योग्य समज आणि त्याचा निरंतर विकास हेच खऱ्या नैतिक समाजाचा आधार असू शकतात.

सोविएत शास्त्रज्ञांच्या विस्तृत संशोधनामधून समजलेल्या काही मूलभूत तथ्यांचा सारांश आपण येथे पाहू.

सुरुवातीला, आदिम समाजात मानवी जीवनातील लैंगिकतेचे स्थान हे प्राण्यांच्या मानाने थोडेच वर होते. कामेच्छा हा पुरुषाचा प्रमुख गुण मानला जात होता. स्त्री त्याच्या इच्छापूर्तीचे आणि मुलांना जन्म देणारे साधन होती. त्या काळात मानवाला जीवशास्त्रीय ज्ञान अजिबात नव्हते. स्त्रीमध्ये गर्भधारणा कशी होते हे माहीत नव्हते, त्याला स्त्री–पुरुष दोघेही जबाबदार असताता हेही माहीत नव्हते. या समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते – सामूहिक विवाह. एका गटातील स्त्रियांचे वेळोवेळी त्या गटाच्या सर्व किंवा बहुतेक पुरुषांबरोबर लैंगिक संबंध असत. पुरुषाला प्रेमासारख्या रम्य कल्पनांचा गंधही नव्हता. त्याची स्त्री ही फक्त मुलं जन्माला घालणारी, त्याच्या हुकुमाचे पालन करणारी होती.

या व्यवस्थाहीन समाजातूनच रानटी समाजाचा विकास झाला. याबरोबरच एक पुरुष व एक स्त्री यांच्या लैंगिक संबंधांवर आधारित विवाह सुरू झाले. स्त्री–पुरुषांच्या मीलनातून मुलाचा जन्म होतो, ही प्राथमिक जीवशास्त्रीय माहिती याचा आधार होती. अर्थात, अनेकांची संपत्ती असलेली स्त्री आता एकाचीच संपत्ती झाल्याने तिच्या स्थितीत विशेष कोणताही फरक पडला नाही. सर्वार्थाने ती पुरुषाची दासीच राहिली. बहुतेक रानटी समुदायांमध्ये स्त्रीलाच जास्तीत जास्त शारीरिक श्रमाची कामे करावी लागत.

या रानटी समाजव्यवस्थेतूनच प्राथमिक समाजव्यवस्थांचा जन्म झाला. बदलते वैवाहिक संबंध ही समाजाला रानटी अवस्थेतून बाहेर काढण्यामागच्या अनेक प्रेरणांमधली एक महत्त्वाची प्रेरणा होती. आधीच्या आदिम व्यवस्थांपेक्षा या समाजात अन्न, वस्त्र, निवारा व इतर आवश्यक वस्तूंचे उत्पादन अधिक होते. बहुसंख्य लोक जरी अजून गरीबी आणि काबाडकष्टाचे जीवन जगत होते, तरी या प्राथमिक समाजांनी काही थोड्या लोकांसाठी आरामात सुरक्षित जीवन जगण्याच्या संधी निर्माण केल्या. त्यामुळे, आता विचार करायला, रहस्यांची उकल करायला लोकांना उसंत मिळू लागली.



पहिल्या पहिल्यांदा ज्या रहस्यांनी माणसाच्या मेंदूला गुंतवले होते, त्यात लैंगिकतेचे रहस्य होते. प्राचीन मानवाने लैंगिकता आणि धर्म यांच्यात परस्परसंबंध स्थापित केला होता. अनेक देव–देवतांचा उगम आणि कार्य लैंगिकतेशी संबंधित होते. प्राचीन धार्मिक ऊर्जा आणि इतर अशाच घटनांना लैंगिकतेसंबंधी गुंतागुंतीच्या व आनंददायी तथ्यांशी तसेच मातृत्वाच्या अद्भुत रहस्याशी जोडले आहे. प्राचीन धर्माचे आधुनिक धर्माशी अनेक बाबतीत साम्य दिसत असूनही, त्यांच्या आध्यात्मिक संकल्पना आणि पूजाअर्चा करण्याच्या पद्धतींमध्ये मूलभूत फरक आहेत. हा फरक स्पष्टपणे वेश्याव्यवसायासंबंधी उपलब्ध ऐतिहासिक तथ्यांमधून दिसून येतो. अतिप्राचीन काळी वेश्याव्यवसायांचा जन्म देवळांमधून झाला.

बहुतेक रानटी व अर्धसंस्कृत समाजांमध्ये स्त्रियांना स्वतःला एकदा किंवा पुन्हापुन्हा पुरोहितवर्गाला किंवा इतरांना समर्पित करावे लागे. ही धार्मिक प्रथा होती. या पद्धतीने देवांना प्रसन्न करायला तयार असणाऱ्या पुरुषांची संख्या अर्थातच कमी नव्हती. अशा पूजेनंतर त्यांना देवाला एक चांदीचे नाणे ठेवावे लागे. स्त्रियांना या व्यवहारातून काही प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळत असे.

या उत्पन्नातून पुरोहितांनीही वाटा घ्यायला सुरुवात केली. आणि हळूहळू देवळातल्या पूजेचे वेश्याव्यवसायामध्ये रुपांतर झाले. आता लोक देवळात कामपूर्तीसाठीच जाऊ लागले. स्त्रिया आणि पुरोहितवर्ग यातून पैसे मिळवू लागले. देवळे वेश्यागृहे बनली. अशाप्रकारे, वेश्याव्यवसाय एक सामाजिक कुप्रथेच्या रुपात स्थापित झाला. अर्धा व्यवसाय, अर्धी धर्मपरायणता. शतकानुशतके त्याचे रूप असेच राहिले. आजही, भारतात अनेक देवळे अशी आहेत, जिथे वेश्याव्यवसाय विविध रूपात चालतो, आजही देवळांमधून देवदासी नृत्य करतात. पैसे देऊन कुणीही त्यांना विकत घेऊ शकतो.

ख्रिश्चन धर्माने सर्व पाश्चिमात्य देशांमधून ही प्रथा समाप्त केली. परंतु, यामुळेही व्यभिचार संपला नाही. एवढेच झाले की वेश्यांचे अड्डे आता देवळे सोडून इतरत्र, गर्दीच्या वस्त्यांमध्ये गेले. याचे चांगल्यापेक्षा वाईट परिणामच अधिक झाले. चर्चमधून वेश्यांना हाकलून नैतिक विजय जरूर मिळाला, पण गलिच्छ वस्त्यांमधून, सर्व प्रकारचे अभाव आणि गरिबीमध्ये राहून या वेश्या सामाजिक रोगांच्या वाहक बनल्या. प्रगती झाली ती फक्त त्यांच्या संख्येत. धर्मयुद्ध, खेळांच्या मोठमोठ्या स्पर्धा, तऱ्हेतऱ्हेचे उत्सव, सण–समारंभांच्या काळात प्रचंड मोठ्या प्रमाणात व्यभिचारात वाढ होत असे. आरोग्य शास्त्राच्या इतिहासात यासंबंधीची तथ्ये उपलब्ध आहेत.

जो वेश्याव्यवसाय इतक्या मोठ्या प्रमाणावर समाजात स्वीकृत होता, त्याच्याकडे एक सामाजिक समस्या म्हणून केव्हापासून आणि का पाहिले जाऊ लागले?

बाराव्या शतकाच्या मध्यात लिस्बेनच्या विरोधात धर्मयुद्ध करणाऱ्या इंग्रज आणि जर्मन राजे-उमरावांच्या लक्षात आले, की त्यांची सेना आपापल्या बरोबर आणलेल्या स्त्रियांमध्येच गुंतलेली आहे. त्यांनी तातडीने नियम लागू केला, की सेनेचा यापुढे वेश्यांबरोबर काहीही संबंध राहणार नाही. कोणीही आपल्याबरोबर अशी स्त्री ठेवली, तर त्याची शस्त्रे काढून घेतली जातील आणि त्याला अधर्मी घोषित केले जाईल. तसेच त्या स्त्रीचे नाक कापून टाकले जाईल. अर्थातच या उपायांचा काहीच उपयोग झाला नाही. शिवाय, श्रीमंत सेनाधिकाऱ्यांबरोबर असलेल्या स्त्रियांना या परिस्थितीचा सामना करण्याची गरज नव्हती.

दोनशे वर्षांनंतरही जेव्हा सैन्यातून व्यभिचार संपत नाही असे दिसले, तेव्हा युरोपच्या सेनाधिकाऱ्यांनी एक नवा नियम लागू केला. आजही, काही ठिकाणी हा नियम आहे – व्यभिचार नियंत्रण कायदा. १३८० मध्ये सम्राट दुसरा फ्रेडरिक याने आदेश दिला की फौजेशी संबंधित प्रत्येक वेश्येकडून आठवड्याला फी वसूल करावी. हाच कायदा इंग्रज, फ्रेंच, इटालियन आणि डच शासकांनी आपल्या सेनांबाबत लागू केला.

युरोपच्या सर्व देशांमध्ये वेश्याव्यवसायाचा इतिहास असाच असलेला दिसून येतो. मध्ययुगाचा विकास होता होता मोठ्या नगरांमधून व्यभिचाराचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला होता. स्थानिक फौजा आणि व्यापारी याचे पोशिंदे होते.

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे, की जी परिस्थिती आज आपल्याला अत्यंत घृणास्पद वाटते, ती त्याकाळात पूर्णपणे नैतिक मानली जात होती. त्या काळातील पुरुषप्रधान संस्कृती आणि स्त्रीची गुलाम अवस्था पाहता हे स्वाभाविकही होते. नैतिकतेची व्याख्या पुरुषप्रधान होती. यात स्त्रीचा विचार शून्य होता.

युद्धापूर्वी जपानमध्येही हजारो वेश्यागृहे होती. ती खुद्द सरकारतर्फे चालवली जात. युद्धानंतर तिथे बरेच बदल झाले. विशेष म्हणजे, उच्च व मध्यम आर्थिक परिस्थितीतील लोक वेश्यांबरोबर विवाहही करत व त्यामुळे त्यांच्या इभ्रतीला धक्का लागत नसे. वेगवेगळ्या वर्गासाठी वेगवेगळी वेश्यागृहे असत. ही राज्यांद्वारे नियंत्रित असत, तर कधी त्यांचे नियंत्रण मठ-मंदिरांकडूनही होत असे. ही प्रथा शतकानुशतके चालत आली आहे आणि वर्तमानयुगातही मध्ययुगातील नैतिक



नियमांचे न बदललेले ते एकमेव उदाहरण आहे.

मध्ययुगाच्या शेवटीशेवटी युरोपात वेश्याव्यवसायांच्या विरोधातील संघर्ष तीव्र होत गेला. कडक शब्दांत टीका होऊ लागली. अनेक संशोधकांच्या मते या बदललेल्या दृष्टिकोनाची कारणे शिक्षणाचा प्रसार, धर्माचा प्रचार तसेच गुप्त रोगांना आळा घालण्याचे गरज इ. होती. मात्र सोविएत शास्त्रज्ञांच्या मते याचे कारण दुसरेच होते, ते म्हणजे 'प्रेम' ही संकल्पना! सोविएत अधिकाऱ्यांच्या मते प्रेमाला आज आपण ज्या रूपात ओळखतो, ती मानवी जीवनातील अगदी अलिकडची गोष्ट आहे. स्थायी प्रेमाच्या या नव्या संकल्पनेला जन्म दिला तो जमीनदारीविरुद्ध भांडवलशाही व्यवस्थेने केलेल्या यशस्वी संघर्षाने. भांडवलशाहीने प्रेमाला व्यभिचाराच्या पातळीपासून वर उचलले आणि प्रतिष्ठा दिली. इतकेच नाही, तर तिने प्रेमाला एक नैतिक संबंधांचे रूप दिले, जे अनैतिकतेबरोबर चार हात करू शकेल.

सोविएत अधिकाऱ्यांचा हा निष्कर्ष समजून घेणे आवश्यक आहे. तेव्हाच आपण त्यांनी योजलेले उपाय समजून घेऊ शकू.

एक पती-पत्नी विवाहाची प्रथा फार पूर्वी रानटी समाजातूनच सुरू झाली. संस्कृतीच्या विकासाबरोबरच या विवाहप्रथेमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण बदल झाले. सोविएत मानववंशशास्त्रज्ञांनी पूर्वीच इतिहासतज्ज्ञांनी मांडलेल्या तथ्यांना पुष्टी दिली, की एक पती-पत्नी विवाहप्रथेबरोबर सगळीकडे वेश्याव्यवसाय असतोच. मात्र सोविएत शास्त्रज्ञांनी त्याच्या पुढे पाऊल टाकले. ग्रीक आणि रोमन संस्कृतींचा अभ्यास करून त्यांनी पुराव्यानिशी सिद्ध केले की एकपत्नी विवाहप्रथेमागे सरळसरळ आर्थिक हेतू होते. पुरुषाची संपत्ती त्याच्या मृत्यूनंतर काही थोड्याच लोकांमध्ये विभागली जावी, खासकरून त्याच्या कायदेशीर अपत्यांमध्येच ती राहावी या हेतूने एकपत्नी विवाहप्रथा कायदेशीर केली गेली. श्रीमंतवर्गाच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून उचललेले हे एक व्यावहारिक पाऊल होते. आपल्याला भासवले जाते त्याप्रमाणे एकपत्नी प्रथा ही काही स्त्रीपुरुषांमधले प्रेम चिरस्थायी होते म्हणून बनली नव्हती. ग्रीक आणि रोमन संस्कृतीतील अत्यंत सुसंस्कृत पुरुषसुद्धा जिच्यावर प्रेम आहे अशा स्त्रीबरोबर विवाह करण्याचा विचार करीत नसत.

प्राचीन जगातील श्रीमंत पुरुषांसाठी, विवाह ही एक कायदेशीर गरज होती. विवाहसंस्थेतील वारसाहक्काच्या नियमाने त्यांना त्यांची संपत्ती व दर्जा मिळाला होता आणि स्वतःच्या मुलांच्या बाबतीतही ते हाच नियम लागू करणार होते.

कायदेशीर वारसदारांकडे संपत्तीचे हस्तांतरण! गरीब पुरुषाला विवाह एक दासी आणि मुले जन्माला घालणारी मादी मिळवून देत असे. लैंगिक तृप्ती मात्र सर्वसाधारणपणे अशाच स्त्रियांकडून करून घेतली जाई, ज्यांच्याशी ते विवाह करीत नसत. ही पद्धत संपूर्णपणे नैतिक मानली गेली होती.

हे स्पष्ट आहेच की एकपत्नी विवाहप्रथेतील बंधने फक्त स्त्रियांसाठी होती. पुरुषाला परवडतील तितके विवाहबाह्य संबंध ठेवण्याचा कायदेशीर आणि नैतिक अधिकार होता. पत्नीला मात्र असे कोणतेही अधिकार नव्हते. विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या स्त्रीला दिल्या जाणाऱ्या शिक्षा भयंकर होत्या. तिच्यासाठी पतीशिवाय कोणत्याही पुरुषाशी लैंगिक संबंध ठेवणे अनेक कारणांमुळे अनैतिक ठरवले गेले होते. त्यात जीवशास्त्रीय कारण महत्त्वाचे होते. दुसऱ्या पुरुषापासून झालेला मुलगा पतीच्या संपत्तीचा वारस बनू शकत नव्हता – बनू नये यासाठीची ती धडपड होती. पुरुषांसाठी मात्र वेश्यागमन जराही अनैतिक नव्हते. विशेष म्हणजे, प्राचीन व मध्ययुगीन समाज वेश्यांच्या जीवनाकडे वाईट नजरेने पाहत नव्हता. उलट, त्यांचे अस्तित्व समाजासाठी आवश्यक गोष्ट मानली जात होती.

संपत्तीच्या कायदेशीर अधिकारांवर बेतलेली नैतिकतेची ही व्यवस्था ख्रिश्चन समाजाने दोन हजार वर्षांपूर्वी जशीच्या तशी उचलली. जमीन आणि संपत्तीच्या वारशात राजकीय सत्तेचा वारसाही अंतर्भूत केला गेला. परिणामतः सरंजामशाहीची संपूर्ण सामाजिक, आर्थिक आणि राजकीय रचना ही या बंदिस्त वारसाहक्काच्या संकल्पनेवर उभी राहिली. राजाचा पुत्र आपल्या पित्याच्या मुकुटाचा उत्तराधिकारी बनत असे. जमीनदार आपल्या मुलाकडे आपला कारभार सोपवत असे, सरदाराचा मुलगाच सरदार बनत असे. आणि गरीब शेतकऱ्याला आपल्या बापाची मोडकी तोडकी झोपडीच मिळत असे. मध्ययुगात कारागिरांच्या संघटना (गिल्ड) असत, ज्या विवाह आणि जन्मासंबंधीचे कायदे बनवत. आपला सामाजिक वर्ग सोडून विवाह करण्यावर संपूर्ण बंदी होती. प्रेमविवाह करणे तर कल्पनेच्या पलिकडचेच होते. कोणत्याही मुलीचा विवाह तिच्या वर्गीय परिस्थितीप्रमाणेच होत असे. 'मध्यस्थ' किंवा कधीकधी सरकारी अधिकारीही हे विवाह ठरवत. क्वचितच कुठल्याही मुलीची इच्छा जणून घेण्याचा प्रयत्न केला जाई. तिला विचारलेच तर ते तोंडदेखलेच असे. सर्वसामान्यपणे, ती आपल्या पतीचा चेहरा लग्नाच्या दिवशीच पाहू शकत होती.

तात्पर्य हे, की या काळात 'प्रेम' या महत्त्वपूर्ण अनुभवाला कुठलीही कायदेशीर मान्यता नव्हती.



विवाहाच्या वेळीच मुलीला कडक समजावणी दिली जात असे की तिने एकाच पुरुषावर – तिच्या पतीवर भक्तिभावाने आणि आजीवन प्रेम करायचे आहे. विवाहाच्या कायदेशीर आणि धार्मिक विधींमधूनही हेच मूल्य अधोरेखित केले जाई. समाज जाणत होता की स्त्री आपल्या पतीशिवाय दुसऱ्या पुरुषावर प्रेम करू शकते. पण हे प्रेम जाहीर करण्यावर कडक प्रतिबंध होता. दुसरीकडे तिच्या पतीच्या बेलगाम वासनेला वाढवण्यासाठी आणि तृप्त करण्यासाठी वेश्यांची फौज जशीच्या तशी कायम होती.

याच काळात, नव्या आर्थिक शक्ती सरंजामशाहीला मुळातून हादरवायला पाहत होत्या. भांडवलशाही आणि तिला पोषक अशा लोकशाही विचारसरणीचा विकास होत होता.' सरंजामशाहीचे नैतिक आणि कायदेशीर आधार होते – मध्यस्थांमार्फत जमवलेले विवाह, वारसाहक्काचे कठोर नियम आणि वेश्यागमन. 'प्रेमा'च्या नव्या भावनेने सरंजामशाहीचे हे आधार कमकुवत केले. ही भावना अगदी नव्या नैतिक संकल्पनेचे प्रतिनिधित्व करीत होती, कारण ती राज्य किंवा धर्माने स्त्रीवर लादलेल्या पतीपेक्षा स्वतःच्या निवडीच्या पुरुषावर प्रेम करण्याच्या तिच्या अधिकाराचा प्रश्न उपस्थित करीत होती. जे कवी या प्रेमभावनेची गाणी गात, त्यांच्या जिभा कापल्या जाण्याचा किंवा त्यांना भर चौकात फाशी जाण्याचा सतत धोका असे.

तरीही, या नव्या प्रेम या संकल्पनेचे दमन होऊ शकले नाही. अशीही वेळ आली, जेव्हा शेक्सपियर निर्भयपणे हा प्रश्न लंडनच्या रंगमंचावरून दाखवू शकला. 'रोमियो आणि ज्युलियट' या शेक्सपियरच्या नाटकाची पार्श्वभूमी काय होती हे आपल्याला शाळा–कॉलेजांमध्ये शिकवले जात नाही. खरे तर हे एक जबरदस्त ताकदीचे राजकीय नाटक होते. दोन प्रेमी आपल्या प्रेमासाठी जिवाची आहुती कशी देतात हे शेक्सपियरने कलात्मकतेचा कस लावत दाखवून दिले. ही गोष्ट नवीन नव्हती. त्यापूर्वीही कवींनी अशा प्रेमगाथा गायिलेल्या होत्या. पण 'रोमिओ आणि ज्युलियट' या अर्थाने नवे होते, की या नाटकाने प्रेक्षकांना प्रेमिकांच्या एकमेकांशी विवाह करण्याच्या हक्कासाठी रडवले.

आज हा हक्क आपण सहज मान्य करतो. भारतासारख्या काही देशांमध्ये तर आजसुद्धा प्रेमविवाह केला म्हणून प्रेमिकांची हत्या करायला कुटुंबे मागेपुढे पाहत नाहीत. सोविएत इतिहासतज्ज्ञांच्या मते, प्रेमासाठी विवाह ही एकेकाळी क्रांतिकारी संकल्पना होती. संपूर्ण मध्ययुगात विवाह करणे ही राजकीय कृती होती, जिचे उद्दिष्ट फक्त सरंजामदारांसाठी सत्तेचे केंद्रीकरण करणे, हे होते. स्त्री ही या प्रक्रियेत सत्ता

मिळवण्याचे निव्वळ साधन होती – मग ती राजकन्या असो की शेतकऱ्याची निर्धन मुलगी!

ही व्यवस्था एकीकडे वेश्याव्यवसायाला पुरुषांसाठी आवश्यक सेवा म्हणून खुले प्रोत्साहन देत असे, तर दुसरीकडे सन्माननीय विवाहित स्त्रियांना त्यांचे प्रेम व्यक्त करण्यापासून प्रतिबंधित करीत असे.

म्हणजेच, समाजात प्रेमविवाह भांडवलशाहीने सरंजामशाहीला उखडून फेकून दिल्यावरच शक्य होऊ लागले. मुक्त व्यापाराचे समाजाच्या नैतिकतेच्या कल्पनांवर दूरगामी परिणाम झाले. पहिल्यांदाच लोकशाहीने व्यक्ति स्वातंत्र्याला मूलभूत नैतिक तत्त्व म्हणून प्रतिष्ठा दिली. व्यक्ती आपल्या सर्व कृती आपल्या मर्जीप्रमाणे करण्यास स्वतंत्र आहे, आपल्या निवडीप्रमाणे काम करण्यास स्वतंत्र आहे, हवे तसे कपडे घालण्यास व वर्तन करण्यास स्वतंत्र आहे, सामाजिक दर्जा काहीही असो, पैसे कमावण्यास स्वतंत्र आहे, हवे तिथे राहण्यास स्वतंत्र आहे. त्या काळात या कल्पना क्रांतिकारक होत्या. या विचारांच्या प्रभावामुळे ख्रिश्चन धर्मात महत्त्वपूर्ण बदल झाले. मध्ययुगात सरंजामशाही आणि चर्च, हे दोघेही या विचारांचे सुरुवातीपासून शेवटपर्यंत विरोधी होते. कारण हे दोन्ही व्यक्तीवर जन्मापासून ते मृत्यूपर्यंत सार्वत्रिक बळजबरी करण्याच्या तत्त्वावरच टिकून होते. जुनी व्यवस्था जशी कोसळत गेली, तसे हे कायदे आणि धर्म आणि नैतिकतेच्या कल्पना, यांच्यातही क्रांतिकारक बदल होत गेले.

इतिहासात पहिल्यांदाच, भांडवलशाहीच्या अंतर्गत, विवाहाला खऱ्या नैतिकतेचा आधार मिळणे शक्य झाले. अनैतिक बळजबरीतून विवाहप्रथा मुक्त होऊ शकली. यापूर्वी, विवाह एक स्पष्ट व्यवहार होता. लोकशाहीने पहिल्यांदाच हा प्रश्न उभा केलाः जर समाजातले सर्व व्यवहार दोन्ही पक्षांच्या स्वतंत्र इच्छेवर अवलंबून असायला हवेत, तर मग विवाहातील दोन्ही व्यक्तींना हे स्वातंत्र्य कसे नाकारता येईल? हा तर सर्व मानवी व्यवहारांमधला सर्वात पवित्र व्यवहार आहे, ज्यात दोन शरीरे, दोन प्रेमी संपूर्ण जीवनासाठी एकमेकांचे होतात. म्हणून, विवाह माणसाने प्रेमासाठीच करावा, हे त्याचे नैतिक कर्तव्य आहे. जो विवाह स्त्री–पुरुषांच्या परस्परप्रेमावर आधारित नाही, तो अनैतिक आहे.

आज हे विचार आपल्याला साधे–सरळ वाटतात. प्रेम नसताना, सोयीसाठी विवाह करणाऱ्या स्त्री–पुरुषांवर टीका करायला आपण शिकलो आहोत, त्यांची आज आपल्याला घृणा वाटते. त्यामुळे त्या लोकशाही मूल्यांचे क्रांतिकारक महत्त्व आपल्या लक्षात येत नाही, ज्यांनी आधीच्या सर्व पारंपरिक नैतिकतेच्या कल्पनांना



विरोध केला.

भांडवलदारी लोकशाहीमुळे स्त्रीपुरुष नात्यामध्ये ज्या मोठ्या सुधारणा घडून आल्या, त्याचा विवाहसंस्थेवर फारसा परिणाम झाला नसला, तरी स्त्रीच्या सामाजिक स्थानावर त्याचा मोठा प्रभाव पडला. स्त्रीचा प्रेम करण्याचा आणि तरीही समाजात सन्मानाने जगण्याचा कायदेशीर व नैतिक अधिकार मान्य केला गेला.

सोविएत संशोधकांनी हे महत्त्वाचे ऐतिहासिक सत्य लक्षात घेतले. या तथ्याला त्यांनी इतके महत्त्व दिले, की त्यालाच त्यांनी आपल्या सर्व नैतिक पुनर्बांधणीचा पाया बनवले. आपल्या संशोधनातून त्यांनी काही महत्त्वाचे निष्कर्ष काढले.

पहिले म्हणजे, या संशोधनामुळे सर्वसाधारणपणे मान्य असलेला हा गैरसमज दूर केला, की प्रेम, विवाह आणि नीतीमूल्ये ही वर्षानुवर्षे, शतकानुशतके अपरिवर्तनीय राहिलेली आहेत. नीतीमूल्ये नुसती बदललीच नाहीत, तर भांडवलशाही आणि लोकशाहीच्या विकासामुळे ती संपूर्णपणे उलटीपालटी झाली. सरंजामशाहीमध्ये प्रेमविवाह करणे ही नैतिकदृष्ट्या विचारही न करण्याची गोष्ट होती. आज आपल्यासाठी प्रेमाशिवाय इतर कोणत्याही कारणासाठी विवाह करणे अनैतिक आहे. सरंजामी काळात मोठमोठे सरदार–उमराव व्यभिचाराच्या जागी उघडपणे वावरत, यात काही गैर मानले जात नव्हते. पण एकदा समाजात लोकशाही रुजल्यानंतर मात्र व्यभिचाराचे हे संघटित स्वरूप समाजाला असह्य झाले. प्रत्यक्षात, जितके बदल प्रेम, लैंगिकता, नैतिकता किंवा व्यभिचार यांच्याशी संबंधित दृष्टिकोनांमध्ये आणि व्यवहारांमध्ये झाले तितके इतर कोणत्याही गोष्टीमध्ये झाले नाहीत.

इतिहासाच्या तथ्यांमधून दुसरी महत्त्वाची गोष्ट दिसते, ती म्हणजे, नैतिकतेमध्ये खूप सुधारणा झाली आहे. मानवी समाजामध्ये पूर्वीपेक्षा अनैतिकतेचे प्रमाण आता खूप कमी आहे.

यातून निघालेला शेवटचा निष्कर्ष स्त्रियांच्या आताच्या सामाजिक स्थानासंबंधी आहे. भांडवलदारी लोकशाहीने स्त्रियांना प्रेम करण्याचा, प्रेमविवाह करण्याचा अधिकार दिला.

सोविएत तज्ज्ञांनी जेव्हा हे तथ्य तपासले, तेव्हा त्यांना यातील कमकुवत धागा सापडला. प्रेमासाठी विवाह करण्याचा स्त्रीचा अधिकार ही काही अशी गोष्ट नाही, जी कायदे करून प्रत्यक्षात येईल. स्त्रीच्या मर्जीविरुद्ध तिचा विवाह होऊ शकत नाही, एवढाच कायदा करता येतो. आणि जवळजवळ सर्व सभ्य समाजांमध्ये हा

कायदा आहेच. परंतु प्रत्येक स्त्री प्रत्यक्षात खऱ्या खुऱ्या प्रेमासाठी विवाह करण्याइतकी स्वतंत्र असेलच, ही खात्री कोणताही कायदा देऊ शकत नाही. या स्वातंत्र्यासाठी स्त्रीने पूर्णपणे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असणे आवश्यक आहे. आणि यासाठी गरज आहे समाजात स्त्री–पुरुष समानता असण्याची! प्रत्यक्षात असे आहे का?

सोविएत सरकारच्या घोषणापत्रांमध्ये जरी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिलेले असले, तरी प्रत्यक्षात त्यांना समान वागणूक मिळत नव्हती, हे नोव्हेंबर क्रांतीनंतर स्पष्ट झाले. ज्या बंधनमुक्त प्रेमाच्या स्वातंत्र्याला गोर्की आणि लेनिन यांनी १९२० च्या दशकात विरोध केला होता, त्या बंधनमुक्त प्रेमामध्ये स्त्रीही पुरुषाइतकीच स्वतंत्र असणे अपेक्षित होते. तसे नसल्यामुळे, ती अर्थातच एक फसवी आणि घृणास्पद कल्पना होती. स्वतःला क्रांतिकारक म्हणवण्याऱ्या स्त्रियांनीही जेव्हा बंधनमुक्त लैंगिक संबंधांचे प्रयोग केले, तेव्हा त्यांना लगेचच जीवनाचे हे मूलभूत सत्य उलगडले.

सर्व कायदे आणि नीतीमूल्यांच्या पलिकडे एक तथ्य हे आहे, की स्त्री आणि पुरुष काही जीवशास्त्रीय दृष्ट्या समान नाहीत. इंद्रियसुखाचा आनंद जरी काही क्षण दोघेही बरोबरीने घेत असले, तरीही गर्भधारणा होणे, मुलाला जन्म देणे ही जबाबदारी शारीरिक पातळीवर स्त्रीवरच येऊन पडते. स्त्रीचे हे मानवजातीच्या सृजनाचे, कुटुंबाच्या निर्मितीचे कार्य मानवी समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असूनसुद्धा, त्याच्या बदल्यात समाज स्त्रीला काय देतो? मातृत्वाबद्दल कडक शिक्षा?

मातृत्वाची चाहूल लागल्याबरोबर स्त्रीला नोकरी सोडावी लागते. प्रसवाची पूर्ण वेदना स्त्रीलाच सोसावी लागते. अर्भकाची काळजी घेणे ही तिची जबाबदारी असते. सोविएत रशियामध्ये अनैतिकतेची समस्या सोडवली जाण्यापूर्वी जी परिस्थिती होती, तशीच आज आपल्या देशांमध्ये आहे. स्त्री विवाहानंतर पूर्णपणे पराधीन बनते. असे कोणतेही बंधन पुरुषांवर नसते.

अशा परिस्थितीमध्ये, स्त्रीपुरुषांमधील लैंगिक समानतेच्या गप्पा पोकळ आहेत.

लोकशाही आणि भांडवलशाहीने सरंजामशाहीच्या लज्जास्पद अनैतिक स्थितीतून स्त्रीला काही प्रमाणात मुक्त केले असले, तरी बहुसंख्य स्त्रिया आजही विवाहाच्या आणि मातृत्वाच्या संदर्भात असंख्य व्यावहारिक, आर्थिक आणि



सामाजिक बंधनांमध्ये अडकलेल्या आहेत. लग्न करतानाच त्यांना आपल्या स्वातंत्र्याचा त्याग करावा लागतो. ज्या बेड्यांमध्ये आज स्त्री अडकली आहे, त्या प्रामुख्याने आर्थिक बेड्या आहेत. ज्या स्त्रीपुरुषांमधील शारीरिक फरकांमुळे अजूनच पक्क्या झाल्या आहेत.

हिटलरच्या जर्मनीतले नीतीशास्त्रज्ञ स्त्रीच्या या असमानतेमध्येच प्रतिष्ठा मानत होते. आपले प्रतिगामी विचारवंत सुद्धा या नाझी घोषणेची नक्कल करीत आहेत, स्त्रियांना काय, मुलं द्या, एक चूल द्या आणि जोडीला देवधर्म द्या!

अशा घोषणांमागील विचारसरणीचा पोकळपणा सोविएत अधिकाऱ्यांनी हिटलरशाहीच्याही बरेच आधी उघड केला होता. ही विचारसरणी म्हणजे सरळसरळ स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने अधिकार देण्याला नकार आहे. सोविएत तज्ञांच्या मते, इथेच आधुनिक जगामधील अनैतिकतेची कारणे दडली आहेत.

## अनोखी प्रश्नावली

सोविएत संशोधकांनी अनैतिकतेची समस्या सोडवण्यासाठी, स्त्री कोणत्या परिस्थितीत आपले शरीर विकण्यास तयार होईल हे समजावून घेण्याला प्राधान्य दिले. एखादी स्त्री वेश्या केव्हा बनते? अनैतिकतेचा मार्ग का स्विकारते? 'वेश्या' म्हणजे नेमके कोण? या प्रश्नांची सखोल उत्तरे मिळणे हे व्यभिचाराचा खातमा करण्यासाठी महत्त्वाचे होते.

बहुतेक वेळा 'वेश्या' हा शब्द अशाच महिलांसाठी वापरला गेला आहे, ज्या रोख रक्कम घेऊन आपले शरीर वेगवेगळ्या पुरुषांना पुन्हा पुन्हा विकतात. परंतु, नव्या सामाजिक दृष्टिकोनातून संशोधनाला सुरुवात केल्यानंतर ही व्याख्या अपुरी पडू लागली आहे. गुप्तरोग पसरवण्यात मोठ्या प्रमाणावर अशा मुलींचा वाटा आहे, ज्यांना या व्याख्येनुसार वेश्या म्हणता येणार नाही. दुसऱ्या टोकाला काही मनोविकारतज्ञ असेही मानतात की दोन प्रेमिकांमधले लैंगिक संबंध सोडता बाकी कोणाहीमधले संबंध अनैतिकच असतात. ज्या संबंधांमध्ये खुले किंवा छुपे आर्थिक व्यवहार असतील त्यांनाही आपण अनुचितच मानतो.

धार्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर विवाहाबाहेरचा कोणताही लैंगिक संबंध अनैतिक असतो, मग तो पैशासाठी असो किंवा प्रेमासाठी. रशियातही हाच दृष्टिकोन अनेक वर्षे प्रचलित होता. नैतिकतेसंबंधी दृष्टिकोनात धार्मिक नेत्यांच्या आणि रशियन कम्युनिस्ट नेत्यांच्या विचारांमध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. परंतु विचार किंवा सिद्धांत प्रत्यक्ष व्यवहारातच सिद्ध होत असतात.

बहुतेक धार्मिक लोक विवाहाला एक सामाजिक आणि पवित्र बंधन मानतात. जे अतूट असते. पती-पत्नी एकमेकांवर प्रेम करत असोत वा नसोत, त्यांच्यातील घनिष्टता ग्राह्य धरलेली असते. आधुनिक कायदेही विवाहात समर्पणाचीच अपेक्षा ठेवतात. बऱ्याच सुसंस्कृत महिला आणि त्यांची मुले (केवळ) पतीवर आर्थिक दृष्ट्या अवलंबून असल्यामुळेच अजून विवाहबंधनात राहत आहेत. अशा संबंधांचा नैतिक आधार काय आहे? आधुनिक मानसशास्त्रानुसार याचा प्रतिष्ठित विवाहित स्त्रियांवर तितकाच वाईट परिणाम होतो, जितका व्यभिचाराचा. आज रशियन लोक अशा विवाहांना घृणास्पद आणि अनैतिक मानतात.

जोपर्यंत भांडवलशाही लोकशाहीने सरंजामी व्यवस्थेला उद्ध्वस्त केले नव्हते, तोपर्यंत अनैतिकतेविरुद्ध असा कोणताही लढा दिला गेला नव्हता. हा संघर्ष केवळ दुराचार दूर करण्यासाठी नव्हे, तर गुप्तरोग संपवण्यासाठी सुद्धा आवश्यक होता.

सोळावे शतक सुरू होता होता गुप्तरोगांचा धोका एवढा वाढला होता, की राज्याच्या अधिकाऱ्यांचे आणि धर्मगुरूंचे धाबे दणाणले. हा रोग ज्याला झाला असेल, त्याला गुन्हेगार मानले जाऊ लागले. रोग्याचे विविध तऱ्हेने हाल केले जात. स्त्रियांना क्रूरपणे वागवले जाई, फाशीपण दिली जाई. या रोगाने ग्रस्त कोणत्याही वयाच्या स्त्री-पुरुषांना घराबाहेर हाकलून दिले जाई, शहरांमध्ये आणि गावांमध्ये राहू दिले जात नसे. काही वर्षातच गरमी हा रोग संपूर्ण युरोप आणि ब्रिटिश द्वीपांवर फैलावला.

या नंतरचा शंभर वर्षाचा इतिहास हा सेना अधिकाऱ्यांच्या गुप्तरोगांविरुद्ध केलेल्या संघर्षाचा इतिहास आहे. सेनेबरोबर असणाऱ्या स्त्रियांवर नवी, अधिकाधिक कडक बंधने घातली गेली. त्यांना कायद्याने गुन्हेगार ठरवले जाऊ लागले. प्रत्यक्षात मोठमोठे सरदार, अधिकारी, आणि त्यांच्या पत्नींनाही ही गरमीची लागण झाल्याचे आढळत होते. पण त्यांना त्यांच्या पैशांचे आणि सामाजिक प्रतिष्ठेचे संरक्षण होते. त्यामुळे त्यांना या भयानक शिक्षा होत नव्हत्या. गरमीची लागण झालेल्या वेश्यांचे कान-नाक कापले जात. कधी त्यांना दारूने मत्त झालेल्या सैनिकांमध्ये सोडले जाई, जे त्यांचे हाल हाल करून त्यांना मारून टाकत.

अनैतिकता रोखण्यासाठी सुरुवातीला जे कायदे केले गेले, त्यांच्यात एक वेगळा कायदा मार्च १७६९ मध्ये राजा लुईने केला. या कायद्यानुसार, वेश्यांना अटक करून तीन महिन्यांसाठी फक्त ब्रेड आणि पाण्यावर ठेवले जाई. त्या सुधारेपर्यंत त्यांना तुरुंगात ठेवले जाई. या कायद्यात पुढे काही सुधारणा झाल्या आणि त्यानंतर तुरुंगातच त्यांच्यावर उपचार करण्यास सुरुवात झाली. याचा खर्च सैन्याकडून



केला जात असे. याचा वेश्यांना प्रत्यक्ष उपयोग किती झाला हे सांगता येणे कठीण आहे कारण तोपर्यंत गरमीवर उपाय सापडला नव्हता. पण एक महत्त्वाची गोष्ट ही होती की लुईने या स्त्रियांना कोणत्याही शारीरिक यातना न देण्याविषयी आणि त्यांचा सार्वजनिक अपमान न करण्याविषयी कडक सूचना दिल्या होत्या.

थोड्याच काळानंतर युरोपमधील सरकारांकडून रोगांवर नियंत्रण आणण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न होऊ लागले. वेश्यागृहे बंद केली गेली. याचा उलट परिणाम असा झाला, की त्या त्या क्षेत्रांमधील सैनिकांमध्ये रोग्यांची संख्या वाढली. सेनाधिकाऱ्यांना फटाफट ही वेश्यागृहे पुन्हा उघडण्याचे आदेश द्यावे लागले.

तेव्हापासून जर्मनी किंवा युरोपातील इतर देशांमध्ये या कायद्यांची संख्या कधी खूप वाढत असे, तर कधी एकदम कमी होत असे. कधी वेश्यागृहे कडक कारवाई करून बंद केली जात तर कधी अर्धवट वैद्यकीय देखरेखीखाली पोलिसांकरवी ती पुन्हा उघडली जात.

ब्रिटिशांचा अनुभव या प्रश्नावर विशेष प्रकाश टाकणारा आहे. ज्यांना गरमी विरुद्ध अभियान चालवण्याची गरज वाटत होती अशा सर्व सुसंस्कृत देशांमध्ये इंग्लंडचा क्रमांक सर्वात खालचा होता. ब्रिटिशांचा सनातनी दृष्टिकोन एवढेच याचे कारण नव्हते. दुसरे कारण हे होते, की इंग्लंडच्या वैद्यकीय तज्ञांनी इतर युरोपियन देशांनी केलेल्या प्रयोगांचे निरीक्षण केले, तेव्हा त्यांच्या उपयुक्ततेबद्दल आणि व्यावहारिकतेबद्दल त्यांना शंका वाटली. तरीसुद्धा १८८६ मध्ये काही नौदल आणि सैन्याच्या छावण्यांमध्ये संसर्गजन्य रोगांना रोखण्याच्या दृष्टीने कायदा केला गेला. त्यानुसार स्त्रियांची आवश्यक ती वैद्यकीय तपासणी करण्यासाठी गरज पडल्यास त्यांना दवाखान्यात भरती करण्याचे अधिकार पोलिसांना मिळाले. यामुळे हा रोग नाविकांमधून आणि सैनिकांमधून कमी झाला. पण अचानक काही कारण न देता आठ वर्षांनी ब्रिटिश सरकारने हा कायदा रद्द केला.

पहिले महायुद्ध सुरू होण्यापूर्वी काही दिवस प्रसिद्ध ब्रिटिश डॉक्टर सर विल्यम ओस्लर यांनी इतर अनेक डॉक्टरांच्या सह्या घेऊन 'टाईम्स'मध्ये एक पत्र छापले. त्यात गुप्तरोगांच्या वाढत्या धोक्याबद्दल सूचना होती. या पत्रामुळे ब्रिटिश जनतेला जबरदस्त धक्का बसला. गरमी या रोगाचा सरळसरळ उच्चार पहिल्यांदाच केला गेला होता. याचा परिणाम म्हणून सरकारने गुप्तरोगांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सुप्रसिद्ध सिडेनहॅम रॉयल कमिशनची स्थापना केली. या कमिशनने आपल्या अहवालात डॉ. ओस्लर यांच्या मतांना पुष्टी दिली. ब्रिटनच्या नागरी लोकसंख्येमधून १० टक्के लोक गरमीने ग्रस्त होते आणि त्याहीपेक्षा अधिक

लोकांना परमाची लागण झालेली होती. प्रतिवर्षी अंदाजे ६३,००० ब्रिटिश नागरिक गरमीमुळे मृत्युमुखी पडत होते. क्षयरोगामुळे मरणाऱ्यांपेक्षा ही संख्या जास्त होती. आजही या परिस्थितीमध्ये फारशी सुधारणा झालेली नाही.

काही दिवसांपूर्वीपर्यंत गुप्तरोगांबद्दल सर्वसामान्य जनतेला काहीही माहिती नव्हती, या गोष्टीचे आश्चर्य वाटल्यावाचून राहत नाही.

गुप्तरोगांना आटोक्यात आणण्यासाठी वैज्ञानिक उपाययोजना करण्यासाठी समाजाने एवढा वेळ का घेतला? आधुनिक तज्ञ यासाठी सामाजिक ढोंग, धर्म, दांभिकपणा या गोष्टींना जबाबदार मानतात. खरे तर वैद्यकीय ज्ञान शास्त्र म्हणून उदयाला आल्यानंतरही बराच काळ लैंगिक जीवनाच्या सर्व टप्प्यांबद्दल शास्त्रशुद्ध माहिती उपलब्ध नव्हती. विश्वास ठेवायला अवघड असले तरी हे खरे आहे. मानवजातीला लैंगिक संबंध आणि मानवजन्म यांच्यातील परस्परसंबंध लक्षात आले त्यालाही फार काळ लोटलेला नाही.

साधारण १८७५ नंतरच मानव आणि इतर प्राण्यांचा जन्म कसा होतो याबद्दल आपल्याला शास्त्रशुद्ध ज्ञान प्राप्त झाले. एकूणच लैंगिकतेबद्दल ज्ञान मिळवणे आपल्या समाजामध्ये फार सहज सोपे नाही. त्यामुळे आपण गुप्तरोगांबद्दल फार मोठा काळ निष्क्रिय राहिलो. याचे प्रमुख कारण आपले अज्ञान हेच आहे. याविषयीचे आत्तापर्यंतचे आपले ज्ञान मूर्ख अंधश्रद्धा आणि भाकडकथांनी भरलेले होते.

तर, गुप्तरोगांविरुद्ध आपला संघर्ष जवळजवळ ३०० वर्षांपूर्वी सुरू झाला. सुरुवातीला हा संघर्ष शास्त्रशुद्ध नव्हता. सुमारे २०० वर्षे तरी तो खूपच सैल, वरवरचा आणि म्हणूनच अपयशी होता.

यानंतर सरकारी हस्तक्षेपाचे युग आले. वर्जित वस्त्या स्थापन झाल्या आणि काही प्रमाणात वैद्यकीय नियंत्रण लागू केले गेले. याच सुमारास व्यापारात प्रचंड वाढ झाली. याचा व्यभिचारावर खोल परिणाम झाला. संघटितपणे वेश्याव्यवसाय होऊ लागला. नियोजनबद्ध पद्धतीने स्त्रियांना धंद्यात ओढले जाऊ लागले. या धंद्यातून काही माणसे मोठ्या प्रमाणावर नफा कमावू लागली. बेकायदेशीर असूनही हा धंदा इतका फायदेशीर बनला की कायदा त्यापुढे हतप्रभ झाला.

सरकारने हा व्यभिचार 'संपवण्या'साठी मोहिमा उघडल्या. नवनवीन कायदे बनवले गेले. बहुतेक देशांमध्ये खास वेश्याव्यवसाय विरोधी पोलिसदलांची निर्मिती झाली. डॉक्टरांनी गुप्तरोगांविरुद्ध दुप्पट वेगाने प्रचार सुरू केला. चर्च मधून



अनैतिकतेविरुद्ध जोरदार भाषणबाजी सुरू झाली. या सर्व प्रयत्नांचा उद्देश वेश्याव्यवसाय संपवणे हा होता. परंतु अज्ञान आणि मूर्खपणा यामुळे या मोहिमा अयशस्वी ठरल्या. अगदी आत्ताआत्तापर्यंत म्हणजे १९३८ पर्यंत गरमी आणि परमा या रोगांबद्दल नुसते बोलणे सुद्धा असभ्य मानले जात होते.

पहिल्या महायुद्धानंतर हे आंदोलन स्वतःच्याच कमतरतांमुळे थंड पडले. सर्व देशांमध्ये वेश्याव्यवसाय आणि गुप्तरोगांमध्ये प्रचंड वाढ झाली. आता या संघर्षाला शास्त्रीय आधार देण्याचे दृढ प्रयत्न सुरू झाले. वैद्यकीय तसेच सामाजिक मासिकांमधून रोगपीडितांची सविस्तर माहिती अहवाल स्वरूपात प्रसिद्ध होऊ लागली. पण जडवादी, अर्धवट विज्ञानाच्या जंजाळात मानवीय नैतिकता, प्रेम, विवाह, कुटुंब यांच्याशी संबंधित सर्व प्रश्न हरवून गेले. वेश्याव्यवसाय विरोधी सर्व योजनांवर मानसिक चिकित्सेचा प्रभाव पडू लागला. व्यभिचाराचे समर्थन करणाऱ्या सिद्धांतांनासुद्धा वैद्यकीय आधार मिळू लागला.

मात्र स्त्रिया अनैतिकतेकडे का वळतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा गंभीर प्रयत्न कुणीच केला नाही.

अनेक देशांमध्ये व्यभिचारासंबंधी अनेक विलक्षण स्पष्टीकरणे अत्यंत गंभीरपणे मांडली गेली आहेत. त्यापैकी काही उदाहरणादाखल सांगतो.

१. वेश्या अत्यंत नीच चरित्र असलेल्या स्त्रिया असतात. त्यामुळे जोपर्यंत वैज्ञानिक किंवा धार्मिक उपायांनी मानवजात सुधारत नाही, तोपर्यंत आपण काही करू शकत नाही.

२. पुरुषांना निसर्गतःच कामतृप्तीसाठी विविधता हवी असते. त्यामुळे वेश्याव्यवसाय संपवणे अशक्य आहे.

३. अनैतिकता पसरवण्यासाठी पुरुषच जबाबदार असल्यामुळे पुरुष जेव्हा त्याचे समर्थन न करण्याची शपथ घेतील तेव्हाच व्यभिचाराचा खातमा होईल.

४. बऱ्याच बदफैली स्त्रिया आधी चांगल्या, चारित्र्यवान मुली होत्या. पण सामाजिक कुप्रभावांमुळे त्या बिघडल्या. यावर उपाय आपल्या घरांमध्ये आणि मंदिरांमध्ये उपलब्ध आहे.

५. ज्यांना कष्ट न करता सहज मार्गांनी जीवनातील सुखसोयी हव्या असतात अशा स्त्रिया नेहमीच समाजात असतात, त्यामुळे वेश्याव्यवसाय कधीच संपणार नाही.

६. जवळजवळ सर्व व्यभिचारी स्त्रिया कारखान्यांमध्ये कामाला असतात. कारखान्यांमधून स्त्रियांना कामावर ठेवणे बंद करणे हाच वेश्याव्यवसाय संपवण्याचा एकमेव उपाय आहे.

७. अविवाहित असताना माता बनल्यामुळे समाजात कलंकित झालेल्या आणि अपमानित झालेल्या स्त्रिया व्यभिचाराकडे वळतात.

८. अनैतिक स्त्री ही कोणत्यातरी मानसिक रोगाने ग्रस्त असते, आणि फक्त मानसिक चिकित्सेनेच तिला सुधारता येऊ शकते.

या प्रकारच्या परस्परविरोधी, अर्धसत्य गप्पांचा आपण काय अर्थ लावायचा? व्यभिचाराविरुद्ध कायदे काहीही करू शकले नाहीत, यात काहीच आश्चर्य नाही. कोणताही कायदा लागू केला जाऊ शकत नव्हता, कारण प्रत्येक कायद्याला जोरदार विरोध केला जात होता.

वैद्यकीय संशोधक असे औषध शोधत आहेत जे गर्भनिरोधकही असेल आणि गुप्तरोग प्रतिबंधकही म्हणूनही काम करेल. (असे कोणतेही औषध आजही उपलब्ध नाही.) या दुहेरी औषधामुळे आपोआपच अनैतिकतेचा प्रश्न सुटेल, असे वैज्ञानिकांचा एक मोठा गट मानतो.

आपण या मताशी सहमत आहोत का?

आज गर्भधारणेची आणि रोगाची लागण होण्याची भीती आहे म्हणून व्यभिचारावर एक स्वाभाविक नियंत्रण आहे. ही भीतीच जर दूर झाली, तर व्यभिचारात कल्पनातीत वाढ होईल अशी शक्यता सोविएत रशिया सोडून इतर सर्व देशांमध्ये आहे. कारण तिथे रोग्यांची आकडेवारी किंवा अनैतिक मुलांचे प्रमाण यापेक्षा अधिक व्यापक, नैतिक प्रश्नांकडे लक्ष दिले गेले आहे. सोविएतांचे उद्दिष्ट मानवजातीमध्ये सुधारणा घडवणे हे आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात ज्या अनेक नामवंत लोकांनी सोविएत रशियाला भेट दिली, त्यांनी सांगितले की क्वचितच एखादी रशियन स्त्री किंवा पुरुष जोडीदाराशिवाय कोणाबरोबर घनिष्ट संबंध ठेवेल. माझ्या व्यक्तिगत निरीक्षणांवरून मीही असाच दावा करू शकतो. सोविएत नैतिकतेची पातळी किती उच्च आहे, हे पाहून आश्चर्य वाटते. त्या तुलनेत पाश्चिमात्य जगाची परिस्थिती पाहून दुःख होते.

रशियन जनतेच्या जीवनाच्या पुनर्रचनेचे काम लेनिन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रशियन पुरुषापासून नव्हे, तर रशियन स्त्रीपासून सुरू केले.



सोविएत नेत्यांनी कधीही स्वतःला स्त्रियांचे 'उद्धारक' म्हणून संबोधले नाही. स्त्रियांनी केस कापावेत की नाही, त्यांच्या स्कर्टची उंची किती असावी, त्यांनी सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करावे की नाही, किंवा कायद्यापुढे त्यांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क आहेत की नाहीत, यासारख्या स्त्रियांच्या हक्कांपुरते त्यांनी स्वतःला सीमित ठेवले नाही. अनेक पुरुषांबरोबर संबंध ठेवण्याबद्दल त्यांनी स्त्रियांवर टीका केली, तशीच पुरुषांवरही केली. स्त्री स्वातंत्र्यासाठी ज्या योजना सोविएत रशियामध्ये राबवल्या गेल्या, त्या फक्त स्त्रियांचे हित पाहणाऱ्या नसून संपूर्ण मानवजातीचे हित पाहणाऱ्या होत्या.

जोपर्यंत स्त्रीपुरुषांमध्ये असमानता आहे, तोपर्यंत मानवजातीला सुधारणे अशक्य आहे हे रशियन तज्ञांचे मत होते. अनैतिकता आणि व्यभिचारावर हल्ला करताना त्यांनी पुरुष आणि स्त्री असा फरक केला नाही. स्त्रीची असमान अपमानजनक स्थिती दूर करून तिचे समाजातील स्थान उंचावणे हे आधुनिक जगापुढील सर्वात महत्त्वाचे आव्हान आहे, असे २५ वर्षांपूर्वी लेनिन यांनी म्हटले होते. रशियाच्या मोठ्या भागात, स्त्रीस्वातंत्र्याचा लढा इतर सर्व राजकीय कामांपेक्षा अधिक महत्त्वाचा मानला गेला होता.

या संदर्भात सोविएत सरकारने बनवलेल्या कायद्यांचे संक्षिप्त विवरण खाली देत आहोतः

१. स्त्रियांना मतदान करण्याचा आणि सर्व शासकीय समित्यांवर निवडून येण्याचा हक्क मिळाला. खरेतर, सर्व प्रगत समाजांमध्ये स्त्रियांना हा अधिकार असतो, परंतु प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये तो नाकारला जातो. आपल्या देशांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार तर आहे, पण कायदे बनवणारे आणि त्यांची अंमलबजावणी करणारे बहुसंख्येने पुरुषच आहेत.

२. सर्व नागरी अधिकार आणि कायदेशीर बंधने स्त्रीपुरुषांना समान प्रमाणात लागू केले गेले. इतिहासात प्रथमच, न्यायालयांसमोर स्त्रियांना समान अधिकार आणि समान जबाबदाऱ्या दिल्या गेल्या.

३. स्त्रीला तिच्या मनाविरुद्ध विवाहात ढकलणाऱ्या कोणत्याही व्यक्तीसाठी, मग ते तिचे पालक असले तरीही, कडक शिक्षेची तरतूद केली गेली. हा कायदा नवा किंवा क्रांतिकारक असा नव्हता, पण आता त्याची अंमलबजावणी निर्णायकपणे केली जाऊ लागली. आपल्या देशांमध्ये, जेव्हा स्त्री शारीरिक हिंसेची शिकार होते, फक्त तेव्हाच या कायद्याची अंमलबजावणी केली जाते.

४. स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणारे अनेक नियम व कायदे बनवले गेले.

आपल्या देशांमध्ये, विवाहित किंवा अविवाहित स्त्रीच्या नोकरी करण्याच्या हक्काला कायदेशीर आधार असा काही नाही. सोविएत रशियामध्ये स्त्रीला ही कायदेशीर हमी देण्यात आली. वरवर पाहता याचे महत्त्व कळणार नाही. युद्धकाळात आपण पाहतोच, की स्त्रियांना नोकऱ्यांची कमतरता नसते. पुरुष युद्धावर गेलेले असतात. त्यांच्या जागा रिकाम्या असतात. मात्र, पुरुष परत येताच स्त्रियांनी पुन्हा आपल्या घरकामाकडे वळावे ही अपेक्षा असते. समाजात नोकऱ्यांची संख्या मर्यादित असताना पुरुषांना प्राधान्य मिळावे हे सर्वसाधारणपणे स्वीकृत तत्त्व समाजात आहेच. आपल्या कामगार संघटना स्त्री कामगारांच्या 'समान कामासाठी समान वेतन' या मागणीसाठी अयशस्वी लढाई लढल्या आहेत. पण कामगार माता आपल्या बालकांना निर्धोकपणे ठेवू शकतील अशा पाळणाघरांच्या तातडीच्या मागणीला मात्र या संघटनांकडूनही अजूनही म्हणावा तसा प्रतिसाद नाही.

नव्या पिढीच्या रशियन स्त्रियांचा नोकऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे वेगळा आहे. नोकरी-धंद्यांसंबंधी स्त्रीपुरुषांना समान सुविधा पुरवण्यामागे सोविएत नेत्यांचे उद्दिष्ट मुख्यतः आर्थिक उन्नती हे नसून, नैतिक उन्नती हे होते. जोपर्यंत स्त्रियांना त्यांच्या 'स्त्री' असण्याची आर्थिक किंमत चुकवावी लागते, तोपर्यंत त्यांच्या प्रगतीच्या सर्व गप्पा निरर्थक आहेत. हे तिथले शास्त्रज्ञ आणि राजनीतिज्ञ जाणून होते. अर्थात त्यांना हेही माहीत होते, की स्त्रियांच्या आर्थिक स्थितीमध्ये एक कायदा करून, एका रात्रीत परिवर्तन घडून येणे अशक्य आहे.

१९२१ मध्ये, रशियन क्रांतीनंतर चार वर्षांनी देशभरात अनैतिकतेमध्ये वाढ झाल्याची नोंद केली गेली. परकीय आक्रमणांविरुद्धच्या अतिशय लांबलेल्या लढाईचा हा सर्वसाधारण परिणाम होता. अजून नियोजित आर्थिक व्यवस्था लागू झालेली नव्हती. बेकारी प्रचंड वाढली होती. बेकारांमध्ये दोन-तृतियांश स्त्रिया होत्या. युद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या देशात त्यांची अवस्था अजूनच दयनीय झालेली होती. दोन वर्षे अनैतिकतेमध्ये सतत वाढ होत राहिली.

१९२३ मध्ये रशियन शास्त्रज्ञांनी या संकटाविरुद्ध युद्ध पुकारले. त्यांच्या पहिल्याच हल्ल्याने समाजात खळबळ उडाली. याआधी असे काही घडले नव्हते. या शास्त्रज्ञांनी एक छापील प्रश्नावली बनवली. ती गुप्तपणे हजारो स्त्रिया आणि मुलींमध्ये फिरवली गेली. ही प्रश्नावली बनवली होती डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ, कामगारसंघटनांचे नेते, तसेच इतर संशोधकांनी!



प्रश्नावली इथे छापणे शक्य नाही, परंतु या प्रश्नावलीचे एक असामान्य उद्दिष्ट होते. कोणत्या परिस्थितीमध्ये स्त्री आपले शरीर विकायला तयार होते, ते शोधून काढणे.

स्त्रिया अनैतिकतेकडे का वळतात, हे जाणून घेण्याचा अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न होता. शतकानुशतके हा जटिल प्रश्न विचारला जात होता. साहित्यिक, डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ अशा सर्वांनीच या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला आहे. पण या प्रश्नाचे उत्तर दिले गेले सोविएत रशियामध्ये! तेही समाजातील प्रत्येक स्तरातील, सर्व वयांच्या, वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या असंख्य स्त्रियांना हाच प्रश्न विचारून! सर्व उत्तर लिखित स्वरूपात होती, आणि त्यांच्याबद्दल संपूर्ण गुप्तता पाळली गेली होती.

या अनोख्या प्रश्नावलीने अनेक जुन्या धारणांच्या चिंध्या चिंध्या केल्या. उत्तर देणाऱ्या स्त्रीला ही खात्री दिली जात असे, की तिची उत्तरे गुप्त ठेवली जातील. त्यामुळे, उत्तरांमध्ये एकदम स्पष्टता होती.

या पाहणीतून सर्वसाधारण माणसाला धक्कादायक वाटेल अशी माहिती मिळाली. अविवाहित, आणि विवाहित स्त्रियांपैकी अनेकजणींनी एकदा तरी, किंवा त्यापेक्षा अधिक वेळा, काही खास परिस्थितीमध्ये अनैतिक संबंध ठेवले होते. काहींनी कमी-जास्त काळासाठी व्यभिचाराला कमाईचे साधनही बनवल्याचे सांगितले. मात्र 'वेश्या' हा डाग लागू न देता. बहुतेकींनी सांगितले, की प्रामाणिकपणे कामधंदा करून केलेली कमाई त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांच्या निर्वाहासाठी पुरेशी नव्हती.

यासंबंधीचे अधिक विवेचन पुढील प्रकरणात केले आहे. येथे हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे, की सोविएत शास्त्रज्ञांनी या पाहणीतून जे निष्कर्ष काढले, ते आपल्या देशांमधील शास्त्रीय आणि नैतिक मतांपेक्षा खूप वेगळे आहेत.

## स्त्रियांच्या खरेदी-विक्री विरुद्ध संघर्ष

स्त्रिया वेश्याव्यवसायाला आपले पोट भरण्याचे साधन का बनवतात?

सोविएत प्रश्नावलीतून मिळालेल्या उत्तरांमध्ये सारखेपणा होता. स्त्रिया जेव्हा व्यभिचाराला तात्पुरते किंवा कायमस्वरूपी जीविताचे साधन बनवतात, तेव्हा त्याचे कारण आर्थिक अडचणी आणि गरिबी हे असते. पण हे अर्धे उत्तर आहे.

रशियामध्ये अशाही अनेक स्त्रिया होत्या, ज्यांनी गरिबीवर उपाय म्हणून

वेश्याव्यवसाय स्वीकारला नाही. का? त्या व्यभिचारी स्त्रियांपेक्षा अधिक 'चांगल्या' होत्या म्हणून?

अजिबात नाही! रशियन स्त्रियांनी या प्रश्नाचे उत्तरही जोरदार शब्दांमध्ये दिले. व्यावसायिक व्यभिचाराच्या शिकार फक्त त्याच स्त्रिया बनल्या ज्यांना इतर कुणीतरी मुद्दाम यासाठी उद्युक्त केले. कोणत्या लोकांनी? त्यांच्या पहिल्या ग्राहकांनी नव्हे, तर वेश्याव्यवसायातून भरपूर पैसा कमावत असलेल्या पुरुष किंवा स्त्रियांनी.

काही वाचकांना वाटेल हे फक्त रशियन महिलांच्या बाबतीत घडले आहे. पण १९२३ मध्ये जे रशियामध्ये घडत होते, ते उरलेल्या सगळ्या आधुनिक जगात आज घडत आहे. आणि तिथेही हीच दोन कारणे लागू होतात. याला कुठेही अपवाद नाही. वेश्याव्यवसाय अस्तित्वात आहे कारण, एक म्हणजे गरीब–अनाथ मुली मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत, आणि दुसरे म्हणजे या व्यवसायातून स्त्रियांचा व्यापार करणाऱ्यांना भरपूर नफा कमावता येतो.

या प्रचंड नफ्यातून स्त्रियांना फारसा वाटा मिळत नाही. बऱ्याच लोकांचा हा भ्रम असतो की या स्त्रिया यातून भरपूर पैसे कमावतात, पण प्रत्यक्षात या स्त्रियांचे वार्षिक उत्पन्न खूपच कमी असते. त्यांचे जीवन अगदी कनिष्ठ प्रतीचे असते – दयनीय, दुर्दैवी आणि विपन्न! रशियन स्त्रियांमधून अगदी मोजक्या स्त्रियांनी हा व्यवसाय ठरवून स्विकारला होता. बाकी हजारोंनी सांगितले, की त्यांना काही समजायच्या आतच त्या वेश्या बनवल्या होत्या. एकतर त्या अगदी कंगाल तरी होत्या, किंवा अगदी कमी पैशांवर प्रचंड कष्टाचे काम करत होत्या किंवा पूर्ण बेकारच होत्या. अशावेळी एखादा ठेकेदार, दलाल त्यांना हेरत असे. तो किंवा ती मग त्या स्त्रीसाठी काही पैशांची तजवीज करत. हे पैसे म्हणजे काही फार मोठी रक्कम नसे. रशियन संशोधकांना दिसले, की बहुतेक वेळा या मुली इतक्या गरीब होत्या की अगदी थोड्याशा पैशांचा लोभसुद्धा त्यांना वेगाने व्यभिचाराकडे खेचू शकत होता. अमेरिकेच्या बाबतीतही कूपर यांचे संशोधन हेच सिद्ध करते, की युद्धापूर्वीच्या दिवसांमध्ये मुली एकदम कमी रक्कम घेऊनही आठवड्याभरासाठी स्वतःला विकायला तयार होत असत. या सगळ्यातून हे सिद्ध होते की अनैतिकतेचे मूळ टोकाच्या गरिबीत आहे.

ज्या काळात ही प्रश्नावली फिरवली जात होती, त्या काळात रशियन सरकारने देशातील उद्योगधंदे आणि शेतीच्या पुनर्रचनेला सुरुवात केली होती. त्या काळात स्त्रियांना रोजगार कमी मिळत होता. जो होता, तोसुद्धा कमी पगार देणारा होता.



प्रश्नावलीमध्ये स्त्रियांना चांगल्या किंवा अधिक रोजगारासंबंधी कोणतीही आश्वासने दिलेली नव्हती. तरी सुद्धा बहुसंख्य स्त्रियांनी लिहिले की चांगल्या रोजगाराची थोडी जरी आशा असेल, तरी त्यांना स्वतःमध्ये नैतिक सुधारणा घडवून आणण्याची संधी मिळेल. ती संधी त्या दवडणार नाहीत. त्यांना स्वतःच्या पतनाच्या आर्थिक कारणांची चांगलीच जाणीव होती. बहुतेक जणी म्हणाल्या, की आता त्या आपल्या मुलांचे पालनपोषण करत आहेत, आणि मुले मोठी व्हायच्या आतच त्यांना हा धंदा सोडून देण्याची इच्छा आहे. कारण मोठी झाल्यानंतर मुलांना आपण वेश्येची मुले आहोत, म्हणून समाजात मान खाली घालावी लागू नये.

मानसशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, आणि तमाम सुसंस्कृत लोकांना आधीच माहिती असलेले अजून एक तथ्य या प्रश्नावलीने पुढे आणले. ते म्हणजे, अतीकामवासनेमुळे वेश्याव्यवसाय करणाऱ्यांची संख्या अत्यल्प आहे. रशियन महिलांनी सांगितले, की उलट या प्रकारचे जीवन जगून इंद्रियभोगाविषयी घृणाच निर्माण होते, त्यातून कोणतेही सुख मिळत नाही.

अशा अनेक उत्तरांच्या आधारे, रशियन शास्त्रज्ञांनी निष्कर्ष काढला, की बहुतेक वेश्या या मानसिकदृष्ट्या इतर स्त्रियांसारख्याच, म्हणजे सर्वसामान्यच असतात. नैतिक जीवन जगणाऱ्या इतर स्त्रियांपेक्षा त्यांची मानसिक अस्थिरती अधिक नसते. चारित्र्यसंपन्न जीवन सोडून त्या पापाच्या जीवनाकडे वळतात त्याचे कारण त्यांची मानसिक अवस्था हे नसून, आर्थिक दुरवस्था हे असते. आपल्या देशांमध्ये असे मानले जाते, की वेश्यांना जर पुन्हा समाजयोग्य बनवायचे असेल तर त्यांच्या मानसिक आरोग्याकडे संपूर्ण लक्ष केंद्रित करणाऱ्या संस्थांमध्ये त्यांना ठेवले पाहिजे. हा विचार अवैज्ञानिक आणि व्यवहारज्ञानाच्या विपरित आहे. या दृष्टिकोनामुळे एकाहून एक हास्यास्पद सुधार योजना लागू केल्या जातात. त्यांच्या आर्थिक परिस्थितीकडे मात्र संपूर्ण दुर्लक्ष केले जाते. रशियन स्त्रियांनी या मुद्द्यावर खास जोर दिला. त्यांनी स्पष्ट सांगितले, आम्हाला चांगले काम आणि पुरेशी सुरक्षितता द्या, आम्ही स्वतःच स्वतःला सुधारू!

व्यभिचाराच्या व्यापारी शोषणाबद्दलची त्यांची उत्तरे आपले डोळे उघडणारी होती. काही मोजक्या, अतिश्रीमंत लोकांचा छोटा गट या व्यापाराचे नियोजन–नियंत्रण करतो, हा भ्रमही त्यांनी दूर केला. त्यांच्या उत्तरांमधून स्पष्ट झाले की जे स्त्रीपुरुष यामधून नफा कमावतात ते सर्वसाधारण लोक असतात. रशियातील त्या काळातील परिस्थितीला आपल्या आजच्या परिस्थितीशी ताडून पाहिले असता आपण म्हणू शकतो, की नफा कमावणारे हे लोक म्हणजे मोटर–ड्रायव्हर,

हॉटेलांमधून काम करणारे, गुंड, दारुडे, डान्स-बार किंवा स्वस्त हॉटेले किंवा धर्मशाळा यांचे मालक वगैरे असतात. सर्व देवाण-घेवाण यांच्या अड्ड्यांमधून होत असते.

या तथ्यांपर्यंत पोचल्यानंतर रशियन अधिकाऱ्यांनी आपल्या देशातून वेश्याव्यवसाय संपवण्यासाठी जी मोहीम हाती घेतली ती दुसऱ्या देशांमध्ये चालवल्या गेलेल्या आंदोलनांपेक्षा एकदम वेगळी होती, आणि एका नव्या दृष्टिकोनावर आधारित होती.

थोडक्यात, संघटित वेश्याव्यवसाय ही एक सामाजिक समस्या होती, जिच्या मुळाशी स्त्रियांची आत्यंतिक गरिबी आणि काहींचा या व्यापारातून होणारा आर्थिक फायदा होता. त्यामुळे याविरुद्धचा संघर्ष केवळ वेश्या-विरोधी मोहीम बनणार नाही, याची रशियन अधिकाऱ्यांनी पुरेपूर काळजी घेतली.

संघर्षाच्या या नीतीचे स्पष्टीकरण गोर्की यांच्या शब्दातः कदाचित जेव्हा या जगात एकही गुलाम उरणार नाही, एकही गरीब उरणार नाही, तेव्हा माणूस आदर्शरूपात चांगला बनेल. पण जर हे घडून हवे असेल, तर आपल्याला गरिबांच्या श्रमावर नफा कमावणाऱ्या व मौज करणाऱ्यांबरोबर निर्दय संघर्ष करावा लागेल.

१९२५ मध्ये सोविएत सरकारने आपली तत्त्वे प्रत्यक्षात उतरवण्यास सुरुवात केली. वेश्याव्यवसायाविरुद्ध संघर्षाचा कार्यक्रम या नावाचा कायदा पास केला. यात कडक शब्दांत सरकारची भूमिका मांडली गेली. मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात असलेल्या व्यभिचाराकडे व त्यामुळे होणाऱ्या रोगांकडे यात लक्ष वेधले गेले. शिवाय यात सर्व शासकीय संस्था, कामगार संघटना, सहकारी संस्था तसेच लोकसंघटनांना खालील उपाय ताबडतोब लागू करण्याबद्दल आवाहन केले गेलेः

१. कामगारांच्या सशस्त्र सुरक्षा सैन्याने कामगारसंघटनांच्या मदतीने स्त्रियांना कामावरून काढून टाकले जाणे त्वरित थांबवावे. कोणत्याही परिस्थितीत अविवाहित स्त्रिया, गरोदर स्त्रिया, लहान मुले असलेल्या स्त्रिया, तसेच घरापासून दूर राहणाऱ्या तरुण मुलींना नोकरीवरून काढले जाता कामा नये.

२. त्या काळातल्या बेकारीला काही प्रमाणात तोंड देण्यासाठी शासकीय संस्थांना सहकारी तत्त्वांवर कारखाने आणि शेतीला संघटित करण्याचे आदेश दिले गेले, ज्यातून निराधार स्त्रियांना काम मिळू शकेल.

३. स्त्रियांना शाळा आणि प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले



जावे, तसेच स्त्रियांच्या उद्योगधंद्यांमधल्या व इतर व्यवसायांमधल्या सहभागाबद्दल पूर्वग्रह असणाऱ्यांशी कामगार संघटनांनी यशस्वी संघर्ष चालवावा.

४. निवास अधिकाऱ्यांनी, ज्या स्त्रियांचे राहण्याचे असे निश्चित ठिकाण नाही, व ज्या मुली खेड्यांमधून शहरांमध्ये आल्या आहेत, त्यांच्यासाठी सहकारी घरांची व्यवस्था करावी.

५. घरदार नसलेल्या मुलांच्या आणि तरुण मुलींच्या सुरक्षिततेचे नियम कडक करावेत व त्वरित लागू करावेत.

६. नव्या लोकराज्यातून गुप्तरोग आणि वेश्याव्यवसायासारख्या समस्या नाहीशा व्हाव्यात या दृष्टीने सर्वसाधारण जनतेमध्ये जागृती आणण्यासाठी त्यांच्यातील अज्ञानावर हल्ला केला जावा आणि या समस्या नष्ट करण्याची जनतेची इच्छा जागवावी.

हे प्राथमिक उपाय होते. त्यांचा व्यापक हेतू गरीबातल्या गरीब स्त्रिया व मुलींचे समाजातील स्थान बळकट करणे हा होता. वेश्याव्यवसाय समाजातील प्रत्येक स्तरात घट्ट मूळ धरून आहे याची अधिकाऱ्यांनी जाणीव होती. त्यामुळे निव्वळ आर्थिक तंगी दूर करून हा रोग, याच नाही, तर पुढच्या पिढीतूनही नष्ट करणे शक्य नव्हते. त्यामुळे व्यभिचारावर सरळसरळ हल्लाही केला गेला. त्यासाठी, केंद्रीय अधिकाऱ्यांनी आणखी तीन घोषणा दिल्याः

१. झारकाळातील वेश्यांच्या विरुद्ध कार्यवाही करण्याचे न्यायालयांचे व पोलिसांचे सर्व अधिकार रद्द करण्यात येतील.

२. वेश्याव्यवसायांतून खुला किंवा छुपा नफा कमावणाऱ्यांविरुद्ध कडक संघर्ष सुरू करण्यात येईल.

३. गुप्तरोग झालेल्या सर्व लोकांना वैद्यकीय तसेच औषधपाणी संबंधित सर्व मदत विनामूल्य पुरवण्यात येईल.

सार्वजनिक आरोग्यखात्याच्या देखरेखीखाली नवी केंद्रे स्थापून अधिकाऱ्यांचे गट बनवले गेले आणि त्यांच्यावर हे नियम लागू करण्याची जबाबदारी टाकली गेली. परंतु पहिल्याच महिन्यापासून अडचणी येऊ लागल्या. आर्थिक योजनांचे काही चांगले परिणाम हळूहळू दिसू लागले. पण संघटित व्यभिचाराविरुद्धच्या संघर्षाचा काही परिणाम झाला नाही. कामगारांच्या सुरक्षासेनेचे काही गट झारच्या

सैनिकांप्रमाणेच अमानवी पद्धतीने काम करत होते. कारण अनैतिकतेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन अजून त्यांनी समजून घेतला नव्हता. म्हणून १९२३ च्या फेब्रुवारीमध्ये कायदेसंबंधित जनसमितीने अपराधकायद्यांमध्ये फेरबदल केले. त्याचे मुक्त भाषांतर साधारण असे होईलः

कलम १७०: जो कोणी व्यक्तिगत फायदा किंवा दुसऱ्या कारणांमुळे, शारीरिक किंवा नैतिक दबावामुळे वेश्या व्यवसाय वाढवण्यास मदत करेल, त्याला पहिल्या गुन्ह्यासाठी कमीत कमी तीन वर्षांची कैद होईल.

कलम १७१– जे लोक वेश्याव्यवसायातून नफा कमावतात, त्यांना त्यांच्या पहिल्या गुन्ह्यासाठी कमीत कमी तीन वर्षे कैद होईल, तसेच त्यांची सर्व खाजगी मालमत्ता जप्त केली जाईल. गुन्हेगारांच्या ताब्यात जर २१ वर्षे पूर्ण नसलेली वेश्या आढळली तर त्याची शिक्षा ५ वर्षे कैद अशी असेल.

याशिवाय एक घोषणा अजून केली गेली, आणि त्वरित कायदा म्हणून मंजूर झाली – वेश्याव्यवसायाविरुद्धच्या संघर्षातील सैन्याची भूमिका. ही घोषणा इतिहास कायम लक्षात ठेवेल. हाच पहिला कायदा होता जो संघटित व्यभिचाराची सामाजिक पाळेमुळे उद्ध्वस्त करण्यात यशस्वी झाला. इतर देशांसाठीसुद्धा हा कायदा आदर्श आहे. याला दोन भागांमध्ये समजून घेता येईलः

१. सैन्याची कामे स्पष्टपणे सांगितली गेली. त्यांचे काम होते, व्यभिचाराच्या अड्ड्यांचा पत्ता लावणे. इथूनच नफ्याची पक्की व्यवस्था कायम होत असे. कडक ताकीद दिली गेली की जो कोणी असे अड्डे चालवेल, भाड्याने देईल, किंवा अशा जागांचा मालक असेल, किंवा जो कोणी स्त्रिया, मुली पुरवील, ग्राहकांना आणेल, त्याला/तिला अटक केली जाईल आणि शिक्षा/दंड होईल. वरील कृत्ये करणाऱ्यांना माणसांचा व्यापार करणारे मानले जाईल आणि त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. मनोरंजनाच्या जागा व उपहारगृहांकडे खास लक्ष ठेवण्याचे सैन्याला आदेश दिले गेले. खासकरून मोठे अड्डे बंद पाडले गेल्यानंतर! (आपल्या देशांमधल्या कायदेतज्ञांकडून अशा कडक पण आवश्यक उपायांचा विचार कधीच केला गेला नाही. वेश्यागृहे अशा जागा आहेत, जिथून रोख रक्कम मिळत असते. अशा अड्ड्यांचे मालक कधीच पकडले जात नाहीत, मग पोलिसांचे कितीही छापे पडोत!)

२. कायद्याचा हा भाग क्रांतिकारक आणि नवा होता. सैन्याला आणि जनतेला



सूचना दिली गेली की वेश्यांच्या विरुद्ध कोणतीही दमनात्मक कारवाई केली जाऊ नये. त्यांना अटक करू नये. न्यायालयातही त्यांना फक्त व्यापाऱ्यांविरुद्ध साक्ष देण्यासाठी बोलवावे. अड्ड्यांवर छापे मारताना सुद्धा वागणूक कशी असावी याबद्दल कायद्यात स्पष्ट सूचना होत्या. अशा ठिकाणी सापडलेल्या स्त्रियांना सामाजिक दृष्ट्या आपल्या समान समजावे. कोणा स्त्रीने विरोधी किंवा हटवादी भूमिका घेतली तरी तिच्याशी सन्मानपूर्ण शब्दांमध्येच बोलावे आणि तिचा कोणत्याही प्रकारे अपमान करू नये. अधिकाऱ्यांना कोणत्याही स्त्रीचे नाव किंवा पत्ता घेण्याची परवानगी नव्हती. आपल्या देशातील कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला हे नियम विचित्र वाटतील. आपल्याकडे तर वेश्यांना माणूस सुद्धा मानले जात नाही. नव्या कायद्याचे परिणाम मात्र लगेचच दिसून येऊ लागले. सैन्य, मग या संघर्षाशी संबंधित कामगारसंघटना आणि नंतर हळूहळू सर्वसामान्य जनता, सर्वांच्याच लक्षात येऊ लागले की का स्त्रिया व्यभिचाराकडे वळतात, यामागे कोणती परिस्थिती असते आणि हा व्यापार कोण चालवते.

### याचे प्रत्यक्ष परिणाम काय झाले?

वेश्यागृहांच्या मालकांच्या आणि ठेकेदारांच्या न्यायालयात रांगा लागू लागल्या. तेथून त्यांची रवानगी तुरुंगात होऊ लागली. अपेक्षेप्रमाणे त्यांनी याविरुद्ध मोहीम सुरू केली. वर्तमानपत्रांमधून संपादकांच्या नावे पत्रे येऊ लागली, ज्यामध्ये नैतिकतेबद्दल मोठमोठ्या बाता मारलेल्या असत. या पत्रांमध्ये लिहिलेले असे, की सरकार वेश्यांना आश्रय देऊन साध्या सरळ घरमालकांना मात्र शिक्षा करत आहे, हा घोर अन्याय आहे. पडद्यामागील गुन्हेगारांना जसजसे पकडले जात होते, तसतसा त्यांचा आरडाओरडा वाढत चालला होता. सैन्याने याच्या उत्तरादाखल कारवाई अजून कडक केली. अंतर्गत घडामोडींवर देखरेख करणाऱ्या अधिकाऱ्यांनी ठणकावून सांगितले, की संघटित व्यभिचारासारख्या भयानक गुन्ह्याला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला समाज कधीही क्षमा करणार नाही. व्यापाऱ्यांनी एक भूमिका हीसुद्धा मांडली की वेश्यांना त्यांचा व्यवसाय करण्याचा हक्क आहे. याचे उत्तरही अधिकाऱ्यांनी प्रश्नावलीच्या उत्तरांच्या सहाय्याने दिले. या स्त्रियांनी व्यभिचाराचा मार्ग कठीण परिस्थितीमध्ये स्विकारला आहे आणि त्यांना चांगले काम देऊन व्यभिचारातून त्यांना मुक्त करणे हे समाजाचे कर्तव्य आहे.

१९२६ साल संपता संपता आणखी एक प्रश्न उभा ठाकला. हा प्रश्न होता वेश्यांच्या ग्राहकांचा! 'इजवेस्तिया' या मॉस्कोहून प्रकाशित होणाऱ्या

वर्तमानपत्राच्या संपादकीयाने हा प्रश्न जनतेसमोर ठेवला. यामुळे नैतिकतेसंबंधीच्या सोविएत संघर्षामध्ये पुढचा टप्पा गाठला गेला. संपादकीयामध्ये म्हटले होते, की सर्व स्त्रियांसाठी चांगल्या कामांची व्यवस्था होऊ शकली तर वेश्याव्यवसाय नष्ट होऊ शकतो. तरीपण या कामात संपूर्ण यश हवे असेल तर पुरुषवर्गाने नवा नैतिक दृष्टिकोन स्विकारला पाहिजे. संपादकीयातील शब्दांतः जर कोणा व्यक्तीसाठी स्त्रीच्या शरीराचा व्यापार करणे हा गुन्हा ठरत असेल, तर तिचे शरीर काही काळापुरते उपभोगासाठी विकत घेणे आणि तिचा अनादर करणे, हाही तेवढाच मोठा गुन्हा ठरतो.

जमीनदारी व्यवस्था संपवल्यानंतर विवाह आणि प्रेमाकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलला आणि तेव्हाच पहिल्यांदा सामाजिक पातळीवर ही समस्या चर्चेसाठी कोट्यवधी लोकांच्या समोर ठेवली गेली. नागरिकांसमोर सर्व तथ्ये ठेवली गेली. रशियात अशी सामाजिक व्यवस्था लागू करण्यात आली होती, जिच्यात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कायदेशीर, राजकीय, व सामाजिक अधिकार दिले गेले होते. इंद्रियसुखाच्या मार्गातील सर्व अडथळे प्रेम आणि विवाहाचा मार्ग सुकर करून दूर केले गेले होते. मग आता स्त्रीच्या शरीराचा व्यापार करून किंवा उपभोगापुरते तिचे शरीर विकत घेऊन तिच्या आत्मसन्मानाला ठेच लागेल असे वर्तन करताना कोणता पुरुष लाजिरवाणा होणार नाही?

प्रोफेसर एलिस्त्रातोव यांनी गुप्तरोगांविरुद्ध चालू संघर्षाच्या दुसऱ्या काँग्रेसमध्ये हीच भूमिका जोरदार शब्दांत मांडली. त्यांनी 'ग्राहकां'वर सामाजिक दबाव टाकण्याची गरज बोलून दाखवली. त्यांच्या शब्दांत, आम्ही हा केवळ नैतिक प्रश्न मानत नाही. आम्ही याला अत्यंत महत्त्वाचा राजकीय प्रश्न मानतो. सोविएत संघराज्याच्या पायाभूत मूल्यांमध्ये माणसाने माणसाच्या केलेल्या शोषणाचा अंत आहे. जी व्यक्ती स्त्रियांवरील इतके घृणास्पद शोषण कायम ठेवील, ती आमच्या देशाची नागरिक म्हणवून घेण्याचा अधिकार गमावून बसते.

जरी ही वाक्ये उपदेशात्मक वाटली, तरी सोविएत अधिकाऱ्यांनी येथेही आपल्या नेहमीच्या पद्धतीनेच अंमलबजावणी केली. एका सैद्धांतिक विचाराला त्यांनी वैज्ञानिक कार्यक्रमाचे स्वरूप दिले. सैन्याकडे त्याची कारवाई सोपवली गेली.

एक आश्चर्यजनक कायदा मंजूर झाला. आता कोणत्याही व्यभिचाराच्या अड्ड्यावर छापा मारल्यानंतर सापडलेल्या सर्व 'ग्राहकांची' नावे, पत्ते आणि नोकरी–धंद्याचे तपशील लिहून घेतले जाऊ लागले. त्यांना अटक केली जात नसे. मात्र दुसऱ्याच दिवशी बाजारात एका नियोजित स्थळी त्या लोकांच्या नावांची यादी



टांगली जाई. त्यांच्या नाव व पत्त्यांच्या वर मोठ्या अक्षरांमध्ये स्त्रियांचे शरीर विकत घेणारे असे लिहिलेले असे. ही यादी सर्वच मोठ्या इमारती, कारखाने, गिरण्या यांच्याबाहेर लटकवलेली असे.

या नियमाचा काय परिणाम झाला असेल ते कळायला कल्पनाशक्तीला फार ताण द्यायची गरज नाही. आपल्या देशांमध्ये बरोबर याच्या उलट वेगळाच अलिखित कायदा काम करताना दिसतो. या 'प्रतिष्ठितां'च्या बरोबर पोलिसांना आदरयुक्त व्यवहार ठेवावा लागतो. शिवाय त्यांचे नाव गुप्त राहील ही खबरदारी घ्यावी लागते. सोविएत सरकारने नेमक्या याच प्रतिष्ठेला धक्का लागेल या सर्वसामान्य भीतीला वेश्याव्यवसाय विरोधी एक शक्तिशाली शस्त्र म्हणून वापरले. या 'वैयक्तिक प्रतिष्ठे'च्या भावनेला त्यांनी जनतेसमोर न्यायनिवाड्यासाठी ठेवले. पापाला शिक्षा देण्यापेक्षा किंवा त्याविरुद्ध मोठमोठी भाषणबाजी करण्यापेक्षा पुरुषांच्या छुप्या व्यभिचाराची शक्यताच सोविएत अधिकाऱ्यांनी संपवून टाकली.

यापूर्वी असे साहस कधीही केले गेले नव्हते. ज्या मानसशास्त्रज्ञांनी हा उपाय केला, त्यांनी योग्य वेळीच तो लागू करण्याचे तारतम्यही ठेवले. हा उपाय तेव्हाच लागू केला जेव्हा इतर कायद्यांद्वारे संघटित व्यभिचाराची आर्थिक आणि इतर पाळेमुळे उद्ध्वस्त होऊ लागली होती.

याशिवाय महत्त्वाची गोष्ट ही की कोणावरही कोणताच नैतिक प्रतिबंध लावला गेला नाही. लैंगिक तृप्तीसाठी कोणाला स्त्रीचे शरीर विकत घेण्याला मनाई केली गेली नाही की कोणत्याही शिक्षेची तरतूद केली गेली नाही. त्यांना फक्त एवढेच सांगितले गेले, की नवे सोविएत राज्य या गोष्टीला अनैतिक मानते आणि मनुष्याने मनुष्याच्या केलेल्या शोषणाचे हे एक अत्यंत घृणित रूप आहे. समाजात चांगले लोकही होते. ते कमनशिबी स्त्रियांच्या गरिबीचा फायदा घेणे गैर मानत. अर्थातच त्यांना हे जाणून घेण्याचा अधिकार होता की वैयक्तिक स्वार्थासाठी शोषण कायम ठेवणारे हे लोक कोण आहेत.

हा नियम त्या काळातील विशिष्ट परिस्थितीचे योग्य विश्लेषण करून लागू केल्यामुळे त्याची ताकद दिसून आली. ज्यावेळी हा नियम लागू केला तेव्हा पूर्ण देशात जनतेला शिक्षित बनवण्यासाठी आंदोलने चालू होती. या संदर्भात रशियन नाट्यसंस्थांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सरळ साध्या शब्दांमधली समस्याप्रधान नाटके प्रेक्षकांमध्ये विशेष लोकप्रिय झाली. यातून संपूर्ण सत्य लोकांपुढे ठेवले जात असे. तथ्यांबरोबरच पात्रांकरवी कायदेशीर माहितीही पोचवली जाई. ही नाटके पाहणाऱ्या प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला, तरुणाला या समस्येशी संबंधित सर्व नैतिक प्रश्नांची

संपूर्ण माहिती होई. जर कुणी पुरुष आजनंतर वेश्येबरोबर सापडला तर त्याचे नाव सर्वज्ञात होईल ही सूचनाही पोहोचवली जाई. एवढेच नाही, तर हेसुद्धा लक्षात आणून दिले जाई की त्याचे नातेवाईक, त्याचे सहकारी, सगळेच त्याच्याकडे दोषी म्हणून अपमानकारक नजरेने बघतील, जेव्हा त्याचे नाव स्त्रियांचे शरीर विकत घेणाऱ्यांच्या यादीत लटकवलेले सापडेल!

## ख्रिश्चन धर्म आणि डॉक्टर

गुप्तरोगांविरुद्ध संघर्षाबद्दल अजून आपण काही चर्चा केलेली नाही. नव्या सोविएत सरकारपुढे ही सुद्धा एक मोठी समस्या होती.

रशियामध्ये त्या काळात गरमीचा जोर अधिक होता. अनेकांना तर उपचार न झाल्याने शारीरिक कुरूपता आली होती. बंधनमुक्त प्रेमाचे प्रयोग करता करता गुप्तरोगांना बळी पडणाऱ्यांची संख्याही वाढली होती.

परिस्थिती इतकी गंभीर असूनही रशियन अधिकाऱ्यांनी फक्त या रोगांवरच आपले लक्ष केंद्रित केले नाही. इतर देशांमधली गुप्तरोगांविरुद्धची आंदोलने असफल झाली कारण सगळी शक्ती केवळ रोग नष्ट करण्यावर केंद्रित झाली. संबंधित इतर गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष झाले. अनैतिकता आणि वेश्याव्यवसाय यांचा खात्मा होईपर्यंत गुप्तरोगांना संपवणे शक्य नाही, या निष्कर्षाप्रत सोविएत संशोधक पोहोचले होते. सर्व समस्यांच्या मुळाशी अनैतिकतेचा प्रश्न आहे असे त्यांचे ठाम मत होते. त्यांचे म्हणणे होते, की अनैतिकतेचा प्रश्न सुटल्यानंतर गरमी आणि परमा हे रोग साधे, इतर रोगांसारखे रोग राहतील, ज्यांचा वैद्यकीय उपचारांनी इलाज करणे शक्य होईल. हे रोग सामाजिक लाज, अप्रतिष्ठेशी जोडलेले राहणार नाहीत. गुप्तरोगांविरुद्धच्या मोहिमा मग क्षय किंवा मद्यपानाविरुद्धच्या मोहिमांचा हिस्सा बनतील.

सर्वप्रथम, सोविएत अधिकाऱ्यांनी कोणत्या स्त्रिया जास्त प्रमाणात गुप्तरोग फैलावतात, कोणत्या कमी, या प्रकारच्या फालतू चर्चा बंद केल्या. सत्य हे आहे, जिला गुप्तरोग झाला आहे अशी कोणतीही व्यक्ती, पुरुष किंवा स्त्री, हा रोग इतरांपर्यंत सहज पोचवू शकते. यासाठी सोविएत अधिकाऱ्यांनी एका नव्या कायद्याची तरतूद केली. यानुसार, गुप्तरोगपीडित असलेली कोणतीही व्यक्ती, जर स्वतःच्या रोगाबद्दल माहिती असूनही दुसऱ्या व्यक्तीबरोबर लैंगिक संबंध ठेवेल, त्याला त्याचा जाब सरकारला द्यावा लागेल. अधिकारी फक्त कायदा करून गप्प राहिले नाहीत, त्यांनी संपूर्ण देशामध्ये या रोगांच्या उपचारांकरिता विविध केंद्रे



स्थापन केली. वीस वर्षांपूर्वी जेव्हा ही केंद्रे स्थापन केली गेली, तेव्हा खरे तर गुप्तरोगांचा इलाज करणे फारच कठीण होते. उपचाराच्या पद्धती मागास होत्या. रशिया आर्थिक समस्यांनी ग्रस्त असल्यामुळे परदेशातून चांगली औषधे मागवणेही शक्य नव्हते. तरीही या उपचारांबाबत या केंद्रांनी जे यश मिळवले, ते पाहता आपल्या देशांची परिस्थिती खूपच लाजिरवाणी आहे असे म्हटले पाहिजे. या यशामागील कारणे शोधून काढणे अवघड नाही.

ही इस्पितळेसुद्धा वेश्याव्यवसाय आणि व्यभिचाराविरुद्धच्या आंदोलनाचा अभिन्न भाग बनली होती. क्षयरोगाचा उपचार ज्याप्रमाणे केला जातो, त्याच पद्धतीने या रुग्णालयांमधून व्यवस्था ठेवली गेली. काही रुग्ण घरी राहून उपचार घेत, तर काही रुग्णालयात दाखल होत. सुरुवातीच्या काळात मोठमोठ्या रुग्णालयांनी आपले लक्ष वेश्यांवर केंद्रित केले. पण गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाईसाठी नाही. गुप्तरोग झालेल्या वेश्यांना न्यायालये डोळे मिटून दंड करत नव्हती. सर्वानाच माहीत होते, की या स्त्रिया सामाजिक कुप्रथांमुळे वेश्या बनल्या आहेत. म्हणून न्यायालयीन कारवाईनंतर नागरिकांची एक समिती या स्त्रियांची बेट घेत असे. ही समिती त्यांना आपल्या रोगावर उपचार करून घेण्यासाठी रुग्णालयात भरती होण्यासाठी प्रोत्साहित करत असे.

या सुमारास, सर्वांना भेडसावणारा प्रश्न असाही होता की या स्त्रिया पुन्हा वेश्या म्हणूनच व्यवसाय करणार असतील, आणि पुन्हा रोगग्रस्त होणार असतील तर त्यांचा इलाज करून उपयोग काय?

याला उत्तर म्हणून सोविएत संशोधकांनी या स्त्रियांवर उपचार करणाऱ्या रुग्णालयांमध्ये नवे बदल केले. या रुग्णालयांनाच त्यांनी प्रशिक्षण केंद्र आणि कामधंद्याची ठिकाणे बनवून टाकले.

या केंद्रांचे पहिले काम होते गुप्तरोगांवर संपूर्ण इलाज करणे. कोणावरही रुग्णालयात भरती होण्याबद्दल बळजबरी केली जात नव्हती. रात्री दारे बंद होत नव्हती की पहारे नव्हते. प्रत्येक रुग्णाला समाजाच्या दृष्टीने उपयुक्त असा उद्योग शिकवला जाई. उपचार चालू असतानाच रुग्ण कामही शिकत आणि पैसेही कमावत. याचा त्यांच्या मानसिक स्थितीवर किती चांगला परिणाम होत असेल याची कल्पना करणे कठीण नाही. स्त्रियांना शिक्षा नव्हती की भाषणे दिली जात नव्हती. फक्त त्यांना उपयुक्त धंद्याचे प्रशिक्षण दिले जाई. त्यामुळे त्यांना चांगले काम मिळे आणि प्रामाणिक मार्गाने पैसे कमावणे शक्य होई. बऱ्याच रुग्ण मुलीतर वेश्या नव्हत्याच. झारकाळात चांगले प्रशिक्षण न मिळाल्यामुळे नोकरी न मिळालेल्या या मुली होत्या.

काही रुग्ण रोग थोडा आटोक्यात आल्यानंतर आपापल्या घरी झोपायला जाऊ लागत. दिवसा मात्र त्या रुग्णालयात औषधपाणी घेत आणि काम शिकत. इथे स्त्रियांमध्ये 'चांगल्या' आणि 'वाईट' असा फरक केला जात नसे. क्षयरोगासाठी दाखल झालेल्यांपेक्षा या स्त्रियांनी स्वतःला कमी लेखू नये या दृष्टीने प्रयत्न केले जात.

याप्रकारे ही रुग्णालये संघटित व्यभिचाराविरुद्ध चाललेल्या संघर्षाची केंद्रे बनली. काही काळातच एकट्या मॉस्कोमधल्या रुग्णालयांमधून वर्षाला पन्नास लाख रुपयांचा माल तयार होऊ लागला. ही रुग्णालये लोकप्रिय ठिकाणे बनली. महिला कार्यकर्त्यांचे गट वेश्यावस्तीत जात आणि वेश्यांना या रुग्णालयांमध्ये दाखल होण्यास प्रोत्साहन देत. सुरुवातीला वेश्या घाबरत. त्यांना भीती होती, की ही रुग्णालये एक प्रकारे तुरुंगांचेच काम करतील. पण जसजसा विश्वास वाढला, तसतशा मोठ्या प्रमाणावर वेश्या रुग्णालयांमध्ये दाखल होऊ लागल्या. या संदर्भातला सर्व प्रचारही प्रश्नावलीच्या उत्तरांवर आधारित असल्यामुळे एकदम खरा होता. त्याचा परिणामही त्यामुळे त्वरित होत असे.

या केंद्रांमधून प्रशिक्षण घेणाऱ्यांवर आत्मनियंत्रणाचे नियम पाळण्याची सक्ती असे. हे नियम तिथे काम करणाऱ्या स्त्रियांनी स्वतः बनवले होते. आणि नियमभंगाच्या गुन्ह्याची सर्वात मोठी शिक्षा होती, त्या व्यक्तीला रुग्णालयातून काढून टाकणे.

या रुग्णालयांचे महत्त्वाचे कार्य होते गुप्तरोगांचा नायनाट करणे. यात त्यांना यश मिळाले का?

एका लहानशा तुलनेने ही गोष्ट स्पष्ट होते. सोविएत इस्पितळांची तुलना करू या अमेरिकन इस्पितळांशी. अमेरिकेतही गुप्तरोगांवर नियंत्रण आणण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न चालू आहेत. रशियातील इस्पितळांमध्ये केवळ गुप्तरोगांवरच नाही तर अनैतिकतेच्या व्यापक समस्येवर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला गेला.

मोठ्या अभिमानाने अमेरिकेचे आरोग्य अधिकारी सांगतात की १९३५ ते १९४० या पाच वर्षांमध्ये गुप्तरोगांवरील औषधांचा वापर दुप्पट झाला आहे. पण दोन वर्षांनंतर जेव्हा हे आंदोलन आणखी तीव्र झाले, आणि उपचार अधिक प्रगत झाले, तेव्हा गरमी आणि परमाच्या रुग्णांची संख्यासुद्धा वाढली.

रशियातील आंदोलन १९२६ मध्ये सुरू झाले. पाच वर्षे ते चालू राहिले व यशस्वी झाले. याचा सर्वात मजबूत पुरावा म्हणजे १९३१ मध्ये रुग्णांची संख्या



कमी झाल्यामुळे रुग्णालये बंद होऊ लागली. दोन वर्षांनी अर्ध्याहून अधिक गुप्तरोगविरोधी विशेष केंद्रांचा ठावठिकाणाही राहिला नाही. १९३८ पर्यंत लाल सेनेमधून व आरमारामधून गरमी आणि परमा या रोगांना पूर्णपणे संपवले गेले. नागरिकांमधूनही हे रोग जवळजवळ नाहीसे झाले. आता ते उरले एक सामान्य समस्या म्हणून! गुप्तरोगविरोधी इस्पितळे कायमसाठी बंद झाली, वेश्याव्यवसायही मुळापासून संपला.

या आंदोलनाच्या विस्मयजनक यशाचे विस्तृत वर्णन इतरांनीही केले आहे. १९४५ मध्ये ब्रिटिश वैज्ञानिकांच्या संमेलनामध्ये सोविएत रशियाचा उल्लेख डॉ. जे. ए. स्कॉट यांनी आपल्या भाषणात केला. त्यांनी सांगितले की रशियामध्ये सोविएत सत्तेच्या स्थापनेपूर्वी फक्त १३ वैद्यकीय महाविद्यालये होती. आता त्यांची संख्या ७० आहे. १९१४ मध्ये, म्हणजे झारशाहीत गरमीच्या रुग्णांची संख्या इतर देशांच्या तुलनेत सर्वाधिक होती. याकूत प्रदेशात ३० टक्के जनता गुप्तरोग पीडित होती. मॉस्कोमध्ये या रुग्णांची संख्या दहाहजारांमध्ये ३३८ इतकी होती.

वेश्यांच्या उपचारांव्यतिरिक्त एकूणच जनतेतून या रोगांचा नायनाट करण्यासाठी एक वेगळी विशाल संघटना बनवली गेली होती. डॉ. स्कॉट यांच्या निरीक्षणानुसार गुप्तरोगांचा इलाज करण्यासाठी फिरत्या इस्पितळांची व्यवस्था केली गेली होती. त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाची वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी होत होती. अगदी लहानात लहान इस्पितळात सुद्धा दोन विशेषज्ञ, दोन आरोग्य तंत्रज्ञ (वैद्यकीय पदवी नसलेले), एक स्त्री तपासनीस, एक कारकून, दोन मदतनीस एवढे लोक असलेच पाहिजेत असा कायदा केला गेला. या गटाजवळ उपचाराची नवी, आधुनिक साधने असत. सर्व नवे औषधोपचार असत. पुरुष आणि स्त्रियांच्या उपचाराची जागा आणि वेळ वेगवेगळी असे. एक काळ असा होता, की रशियामध्ये या प्रकारची दोनहजार इस्पितळे कार्यरत होती. नंतर याच गटांनी इतरही संसर्गजन्य रोगांची तपासणी आणि उपचारांचे काम सांभाळले.

या इस्पितळांमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या इतरही काही सामाजिक जबाबदाऱ्या होत्या. गुप्तरोग, वेश्याव्यवसाय, लैंगिकतेसंबंधीच्या इतर समस्या इत्यादि विषयांवर भाषणे तसेच अभ्यासवर्ग आयोजित केले जात. चित्रपट, जाहिराती तसेच प्रदर्शनांच्या माध्यमांचा वापर करून जनतेचा पाठिंबा मिळवला जाई. या सर्वांची रुग्णांचा डॉक्टरांकडे बघण्याचा दृष्टिकोन गंभीर बनायला मदत झाली. म्हणून, जेव्हा सर्वसाधारण लोकांच्या गुप्तरोगांच्या तपासण्या सुरू झाल्या,

तेव्हा जनतेने विरोध केला नाही. डॉ. स्कॉट यांनी दिलेल्या माहितीनुसार रशियामध्ये हा कायदाच आहे, की जो कोणी पुरुष अथवा स्त्री जाणूनबुजून या रोगांच्या प्रसाराला कारणीभूत ठरेल, त्याला किंवा तिला सहा महिने ते तीन वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा होईल. अर्थात, या कायद्याची अंमलबजावणी करण्याची वेळ फारशी आलीच नाही.

दुसरे महायुद्ध सुरू होण्यापूर्वी, म्हणजे १९४१ मध्ये गरमीविरोधी आंदोलनामुळे हा रोग जवळजवळ संपुष्टात आला होता. १९३५ मध्ये मॉस्कोमधील वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना नमुनादाखल दाखवायलासुद्धा हे रुग्ण सापडणे कठीण झाले. जुन्या रुग्णांमध्ये या रोगाची लक्षणे तीस वर्षानंतरसुद्धा दिसू शकतात. अशा रुग्णांचा उपचार अजूनही चालू आहे.

आपल्या देशांचे वैज्ञानिकही हळूहळू हा निरोगी दृष्टिकोन स्विकारू लागले आहेत. 'अमेरिकन पब्लिक हेल्थ सर्व्हिस'चे अधिकारी डॉ. रोगर ई. हिजरिंग यांनी १९४३ मध्ये न्यू यॉर्कच्या 'ट्यूबरक्युलॅसिस अँड हेल्थ असोसिएशन'समोर जे भाषण केले त्यातून हे दिसते. ते म्हणाले, गुप्तरोगांना संपुष्टात आणण्यासाठी कोणत्याही रहस्यमय शक्तींच्या मदतीची गरज नसते. गरज असते, ती समस्या समजून घेण्याची, आजारांच्या बाबतीत काही आवश्यक गोष्टी तसेच मानवी स्वभाव समजून घेण्याची आणि निश्चितपणे काहीतरी उपाय करता येऊ शकतो, व केला गेला पाहिजे, या विश्वासाची. हे आजार संक्रमित होणारे आहेत, यामध्ये बेअब्रू होण्यासारखे काही नाही. वेश्या गुन्हेगार नाहीत, ती तर एक सामाजिक समस्या आहे. खरे गुन्हेगार या वेश्यांचे शोषण करणारे लोक आहेत.'

'एका दिवसात गरमीचा अचूक इलाज' या प्रकारच्या घोषणांना नको इतके महत्त्व दिले जात असल्याचे सांगून डॉ. हियरिंग सांगतात की एक तर हा विचारच अशास्त्रीय आहे आणि दुसरीकडे या उपचारातील प्रगतीमुळे गुप्तरोगांबद्दलची भीती लोकांच्या मनातून जाते. गुप्तरोगांना काबूत ठेवण्यासाठी ही भीती असणे आवश्यक आहे.

१९४४ मध्ये अमेरिकेच्या जनआरोग्य विभागाने अमेरिकेत परमा या रोगाच्या रुग्णांमध्ये ११ टक्क्यांनी वाढ झाल्याचे सांगितले. याचे कारण बहुधा सल्फा-औषधांनी केल्या जाणाऱ्या फटाफट उपचारांचा प्रचार हेच होते. यामुळे नैतिक संयम कमी होत गेला. रोगांची भीती कमी झाली. याचा परिणाम हा दिसला की उपचारांमध्ये प्रगती होऊनही रोग मात्र वाढला. याचा परिणाम वेश्याव्यवसाय आणि लैंगिक भोगवृत्तीवर काय होईल याचा अंदाज बांधणे अवघड नाही. मोठमोठे डॉक्टर एकीकडे जनतेच्या आरोग्याच्या रक्षणाची हमी देतात, पण दुसरीकडे,



वेश्याव्यवसायाला फक्त यासाठी वाईट मानतात, कारण त्यामुळे गुप्तरोगांचा प्रसार होतो. बरेचसे डॉक्टर तर अनैतिकता आणि व्यभिचाराच्या व्यापक समस्यांवर विचार करणे हे आपले काम मानतच नाहीत. त्यांच्या मते विज्ञानाचा आणि या प्रश्नाचा काही संबंध नाही.

झारकालीन रशियातील व्यभिचारात आणि आपल्या देशांमधील व्यभिचारात फार थोडा फरक आहे. झारशाहीतील सरकार व्यभिचारातील गंभीर वाढ मान्य करीत होते, पण ती न रोखण्याची काळजी घेत होते. आपल्या देशांमध्ये संघटित वेश्याव्यवसाय समाजातील सर्वात खालच्या स्तरातच असल्याचा देखावा केला जातो. आज आपण 'वैज्ञानिक' तर बनलो आहोत, इतपत, की भुवया न उंचावता आपण गरमी व परमा सारख्या गुप्तरोगांबद्दल वाचू-बोलू शकतो. पण अनैतिकतेचा समस्या म्हणून विचार करताना आपण त्यापलिकडे जात नाही. आपल्याकडे मोठमोठे तज्ञ डॉक्टर आहेत, ते गंभीर गोष्टी सांगतात, ऐकतात. पण प्रत्यक्षात त्यांनी काय केले आहे? वाडवडिलांपासून चालत आलेल्या वेश्याव्यवसाय विरोधी आंदोलनालाच डॉक्टरी गप्पांचा मुलामा चढवून ते तोच राग पुन्हा आळवीत आहेत. फरक एवढाच की आपली वडील मंडळी आपल्याला संयमी, सदाचारी बनण्याचा सल्ला देत होती. हे सांगतात, बंधुंनो, सल्फा औषधी आणि पेनिसिलिन वापरा! डॉक्टरांमध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक गोंधळ आहे. त्यातून दुसरे काही निष्पन्न होऊ शकत नाही. नाहीतर व्यभिचाराला वेश्यागृहांपुरते केंद्रित करून आटोक्यात ठेवता येते का, अशा प्रकारच्या हास्यास्पद वादांमध्ये ते गुंतून राहिले नसते.

## महिन्यातून पाच कोटी वेळा

रशियातील वेश्याव्यवसाय विरोधी संघर्षाचे आणखी वर्णन करण्यापूर्वी आपण अमेरिकेतील या संघर्षाबद्दलची नेमकी स्थिती समजून घेऊ. पर्लहार्बरच्या घटनेनंतर अमेरिकेत वेगवेगळ्या ठिकाणी गुप्तरोगांचा नायनाट करण्यासाठी आंदोलने केली गेली. ही आंदोलने रशियामधील आंदोलनांपेक्षा अनेक बाबतीत वेगळी होती. मुख्य फरक होताः अमेरिकन आंदोलनांनी वैद्यकीय समस्यांवर लक्ष केंद्रित केले होते. तर रशियात गुप्तरोगांमागील सामाजिक कारणे संपवण्यावर भर दिला गेला.

सुरुवातीच्या आंदोलनांमध्ये ऑगस्ट, १९४१ मध्ये सुरू झालेले 'सॅक्रामेन्टो सिटी हेल्थ डिपार्टमेंट'चे आंदोलन आहे. त्या काळात गुप्तरोगांचे मुख्य कारण वेश्या आणि व्हिक्टरी गर्ल्स मानल्या गेल्या होत्या. डॉक्टरांनी व पोलिसांनी सुचवलेल्या उपायांची अंमलबजावणी करणे कायद्याने अवघड करून ठेवले होते. म्हणून

आरोग्यविभागाने हा प्रश्न सोडवण्याचा नवा उपाय शोधला. गुप्तरोगांसंबंधी एक प्रयोगशाळा सुरू केली गेली. रोगनिवारणासाठी या आरोग्यकेंद्रामध्ये येण्याची सूचना सर्व पुरुष नागरिक आणि सैनिकांना दिली गेली.

या प्रयोगशाळेचे ध्येय स्पष्ट होते. हे केंद्र संध्याकाळी सात ते सकाळी तीनपर्यंत उघडे ठेवले जाई. याच वेळामध्ये गुप्तरोग लागणीची शक्यता सर्वात जास्त होती. केंद्रात रोग होऊ नये म्हणून औषधे देण्यासाठी सहाय्यक उपस्थित असे. ही प्रयोगशाळा रोगाची लागण झाल्याझाल्या उपचार करून घेण्याच्या दृष्टीने खूपच उपयुक्त होती. दोन पद्धतींनी याचा प्रचार केला गेला. एक तर, सर्व वेश्यांना सूचना दिल्या गेल्या की तुमच्याकडे येणाऱ्या सर्वांना तुम्ही या केंद्रात पाठवावे. यामुळे ते लोक रोगमुक्त राहतील आणि पोलिस तुमच्या मागे लागणार नाहीत. प्रचाराची दुसरी पद्धत होती सर्व डान्सबार, दारूचे अड्डे, बियरबार इ. ठिकाणी केंद्राच्या शेकडो जाहिराती चिकटवणे.

केंद्र सुरू झाल्यापासून पहिल्या चार महिन्यातच जवळजवळ चारहजार लोक उपचारासाठी हजर झाले. यात नागरिक व सैनिक बरोबरीच्या संख्येने होते. पंधरा मिनिटात जर उपचार केंद्रात पोचले, तर उपचार होऊ शकतो, असा दावा होता. उपचार करून घेणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवले जात असे. त्यामुळे नावांची कोणतीही यादी ठेवली गेली नाही. या औषधांनी खरेच गुप्तरोगांपासून बचाव झाला की नाही याचा त्यामुळे कोणताही पुरावा उपलब्ध नाही. ही औषधे उपयुक्त असावीत असा अंदाज आहे.

इतर शहरांमध्ये सुद्धा असेच प्रयोग केले गेले. परिस्थिती बदलली १९४४ मध्ये, जेव्हा मोठ्या प्रमाणात पेनिसिलिन वापरात आले. गरमी व परमाच्या उपचारात यामुळे अभूतपूर्व यश मिळू लागले. गुप्तरोगांवर पूर्ण विजय मिळवण्यासंबंधी आता आशा निर्माण झाली. सैन्यात आणि नौदलात हजारोंच्या संख्येने लोकांवर अनेक प्रयोग करता येणे शक्य होते. याचबरोबर, गुप्तरोगांच्या तपासणीच्या पद्धतींमध्ये सुधारणा केल्या गेल्या. अशा रितीने विस्तृत प्रमाणात एक वैद्यकीय आणि सामाजिक चळवळ सुरू करणे शक्य झाले.

पहिले आंदोलन सुरू झाले अलाबामामध्ये १९४३ साली. एका विक्षिप्त सिनेटर जमीनदाराने एक कायदा मंजूर करून घेतला. या कायद्यानुसार १४ ते ५० वर्षांमधील सर्व नागरिकांना गरमीसाठी आपल्या रक्ताची तपासणी करून घेणे बंधनकारक झाले. दुसरा कायदा होता गरमी झालेल्या लोकांनी आपल्या खाजगी किंवा सरकारी डॉक्टरांकडून उपचार करून घेण्यासंबंधी. सरकारी डॉक्टर फुकट



उपचार करीत असे. हे कायदे मोडणाऱ्यांसाठी १०० डॉलर दंड होता. ज्या सिनेटरने हे कायदे मंजूर करून घेतले, त्याला कल्पनाही नव्हती की या कायद्यांचे रुपांतर शेवटी एका चळवळीत होईल. त्याचे उद्दिष्ट फक्त त्या क्षेत्रातून गुप्तरोगांचा नायनाट करणे, एवढेच होते. शिवाय दरवर्षी ही तपासणी केल्यामुळे, त्याच्या क्षेत्रातल्या निग्रो मजुरांच्या उपचारांवरचा त्याचा खर्च ७५ टक्क्यांनी कमी होणार होता.

आंदोलनाचा मोठा प्रचार केला गेला. मोठ्या संख्येने लोकांचा पाठिंबा मिळू लागला. याप्रकारचे गुप्तरोग विरोधी जनआंदोलन यापूर्वी जगात कुठेही झाले नव्हते. तसेच यापूर्वी एवढ्या मोठ्य प्रमाणावर रक्ततपासणीचा कार्यक्रमही झाला नव्हता. एकेका दिवसात दहाहजार लोकांची रक्ततपासणी होत असे. जागोजागी यासाठी केंद्रे उभारली गेली होती. रेशनकार्डावरच्या पत्त्यांच्या मदतीने जवळजवळ सर्व लोकांची तपासणी होत असे.

अशा प्रकारे, एकूण तीन लाख लोकांची रक्ततपासणी केली गेली. नव्वद टक्के लोक स्वतःहून रक्ततपासणीसाठी हजर राहिले. यातून डॉक्टरांचा अंदाज खरा ठरला. तपासणी झालेल्यांपैकी १३.७% लोक गरमीने ग्रस्त होते. हा युद्धाचा काळ होता. यानंतरच्या काही वर्षांमध्ये काही महत्त्वाचे बदल झाले. पेनिसिलिन आणि अशाच दुसऱ्या औषधांमुळे गुप्तरोगांच्या उपचारात खूप प्रगती झाली. फटाफट उपचारासाठी अमेरिकेत कित्येक केंद्रे उघडली गेली.

युद्ध संपल्यावर मात्र सर्व आशांवर पाणी फिरले. नव्या औषधांचा एवढा प्रसार होऊनही कॅनडा व अमेरिकेत गुप्तरोग्यांची संख्या वाढलीच. काहीजणांचे मत होते, की वाढत्या गुप्तरोगांचे कारण ही औषधेच आहेत. कारण त्यांच्यामुळे खूपच लवकर व सोप्या पद्धतीने उपचार होऊ शकत होते. कॅनडा व अमेरिका या दोन देशांनी पेनिसिलिनचा बेसुमार वापर केला होता. सैन्यात मोठ्या प्रमाणावर नव्या औषधांचे वाटप करूनही १९४५ मध्ये दोन्ही देशांच्या सेनाधिकाऱ्यांना हे मान्य करावे लागले, की गुप्तरोगांचे प्रमाण वाढत आहे.

डिसेंबर १९४५ मध्ये मी सर्जन जनरलच्या वॉशिंग्टनमधील गुप्तरोग विभागाचे प्रमुख अधिकारी लेफ्टनंट कर्नल थॉमस स्टर्नबर्ग यांच्याशी फोनवर चर्चा केली. त्यांनी सांगितलेः मागच्या वर्षीच्या मानाने या वर्षी नोव्हेंबरमध्ये गुप्तरोगांचे प्रमाण दुप्पट झाले आहे. आधी, गुप्तरोगांनी पीडित लोकांची संख्या हजारांमागे ३० होती. ती आता ६० झाली आहे. आमच्या सैनिकांमध्ये सर्वच ठिकाणी गुप्तरोग्यांची संख्या वाढली आहे. फिलिपाईन्स व दक्षिण पॅसिफिकमध्ये तर दरहजार सैनिकांमागे ८० ते

१०० सैनिक रोगग्रस्त आहेत. सर्वात जास्त वाढ युरोपमध्ये झाली आहे – विशेष करून विजयदिनानंतर! युद्ध संपण्यापूर्वी तिथे हजारांमागे ४० रोगी होते, आता १७० आहेत. याप्रकारे, गुप्तरोग्यांच्या संख्येमध्ये ३२५ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

त्यांच्यामते यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. सर्व युद्धांनंतर असे होतेच. सैनिकांजवळ वेळ भरपूर असतो. सर्व वातावरण सैलावलेले असते. आपल्या देशात परतण्याची वाट बघत खोळंबलेले सैनिक कंटाळलेलेही असतात. अशा वेळी ते मनोरंजनाची वेगवेगळी साधने शोधतात. शहरांमधून अशा परिस्थितीमध्ये रोगाची लागण होण्याच्या शक्यता जास्त असतात. रोग होण्याचे सर्वात महत्त्वाचे कारण बेजबाबदार लैंगिक व्यवहार हेच आहे.

कॅनडाच्या आरोग्य संघटनेचे अध्यक्ष डॉ. गॉर्डन वेट्स यांनी अनेक वर्षे गुप्तरोगांविरोधी आंदोलनाचे नेतृत्व केले आहे. त्यांच्या मते, अनेक लोक मानतात, की तपासणी, उपचार इत्यादि सोयी पुरवून गुप्तरोगांना काबूत आणता येईल. पण नैतिकतेचा विचार सोडून गुप्तरोगांचा नायनाट करणे अशक्य आहे.

हे मत सैन्यातील डॉक्टरांपेक्षा वेगळे आहे. सैन्यातील डॉक्टरांच्या मते नैतिकतेच्या गप्पा निरर्थक आहेत. त्यांचे उद्दिष्ट एकच असतेः रोग जास्त लोकांमध्ये पसरू नये. सैनिकी आंदोलनाचे यश एकाच गोष्टीवरून ठरते – सैन्यात 'प्रोफिलॅक्टिकां'चा वापर किती झाला? (प्रोफिलॅक्टिक म्हणजे गुप्तरोग होऊ नये म्हणून वापरायची वस्तू.)

गुप्तरोगांविरुद्धच्या संघर्षात किती यश मिळाले याचा वेगवेगळ्या ठिकाणी सैन्याने वेगवेगळ्या पद्धतींनी आढावा घेतला.

एकतर त्यांनी फुकट वाटल्या गेलेल्या 'प्रोफिलॅक्टिकां'पैकी किती लोकांनी ते घेतले हे पाहिले. यावरून या औषधांच्या मदतीने सैनिकांनी किती वेळा संभोग केला ते समजत असे. हे आकडे अविश्वसनीय आहेत. १९४५ च्या सुरुवातीला अमेरिकन सैनिकांकडून दर महिन्याला पाच कोटी 'प्रोफिलॅक्टिकां'चा वापर होत होता.

तर हे होते सैन्यातील चळवळीच्या यशामागचे रहस्य! अमेरिकन सैन्यातील ऐंशी लाख जवान एका महिन्यात पाच कोटी 'प्रोफिलॅक्टिकां'चा वापर करत होते.

इतिहासात कधीही कोणत्याही देशाने एवढ्या मोठ्या प्रमाणातील निरर्थक लैंगिक उपभोगाबद्दल गर्व केला नव्हता. जरा विचार करा – एका महिन्यात पाच



कोटी वेळा. १९४५ ते १९५२ या दरम्यान जे झाले त्याचा सारांश असाः एक, अमेरिकन सैन्यात, विशेष करून ज्या तुकड्या समुद्रापार गेल्या – त्यांच्यात गुप्तरोगांचे प्रमाण आधीप्रमाणेच खूप जास्त आहे.

दुसरे, पूर्ण पाच वर्षे सतत अमेरिक नागरिकांच्या तपासण्या व उपचार होत राहिले. पण गुप्तरोग कमी झाले नाहीत. २३ मार्च १९५२ च्या अमेरिकन मेडिकल असोसिएशनच्या रिपोर्टमध्ये याचे विस्तृत वर्णन आहे. दोन लाख पन्नास हजारांपेक्षाही अधिक नागरिकांच्या तपासण्या केल्या गेल्या. जे जे गुप्तरोगांनी पीडित होते, त्यांच्यावर लगोलग फुकट उपचार केले गेले. तरी चळवळीच्या शेवटी डॉक्टरांना हेच दिसले, की गरमीच्या रोग्यांची संख्या हजारामागे १०० होतीच.

या अहवालामध्ये परमाचा उल्लेख नाही, पण मिळालेली माहिती अशीच आहे, की परमाच्या रोग्यांची संख्या आणखी जास्त आहे.

स्पष्ट शब्दांत सांगायचे, तर अमेरिकन स्वतःला जगापुढे 'नैतिकते'चे वाहक म्हणून मिरवतात, पण आज गुप्तरोगांची तिथे ज्या प्रमाणात वाढ होत आहे, तशी जगातल्या इतर कोणत्याही सुसंस्कृत देशात कधी झाली नाही.

## अनैतिकतेविरुद्ध पंचवार्षिक योजना

अनैतिकतेविरुद्ध सोविएत युनियनने केलेल्या संघर्षाकडे पुन्हा वळू. १९२९ मध्ये उन्हाळ्यात हा संघर्ष आपल्या अंतिम टप्प्यात पोचला. यासाठी तयार केलेली योजना पूर्णपणे वैज्ञानिक होती, आणि मोठमोठी आठ मंत्रीमंडळे या कामात सहभागी होती.

श्रमविभागाच्या अधिकाऱ्याकडे जबाबदारी होती सर्व एकेकट्या स्त्रियांना व रुग्णालयातून बाहेर पडलेल्यांना काम देण्याची. सामाजिक सुरक्षितता विभागाच्या अधिकाऱ्याकडे देशभर स्त्रियांसाठीची प्रशिक्षण केंद्रे व कारखाने सुरू करण्याचे काम होते. त्याचबरोबर या सर्व स्त्रियांच्या नावासासाठी चांगल्या घरांची व्यवस्थाही त्याने करणे अपेक्षित होते.

सार्वजनिक आरोग्य विभागाने दवाखाने वाढवले. गुप्तरोगतज्ज्ञांना वेगाने प्रशिक्षित करण्यास सुरुवात झाली. परित्यक्ता स्त्रियांसाठी मोठ्या प्रमाणावर मदत देण्याची योजना संघटित केली. तसेच आया व शिशूंसाठी सुरक्षाकेंद्रे उघडली.

न्यायविभागाने या सुमारास सैन्याची पुनर्बांधणी केली होती. त्याचबरोबर सामाजिक जबाबदारीची गंभीर जाणीव असणारे अत्यंत तत्पर असे पोलिसदलही

तयार केले होते. यांच्या मदतीने संघटित व्यभिचाराच्या उरल्या सुरल्या अवशेषांवर अंतिम निर्णायक हल्ला केला. १९२९ सालापूर्वीच्या पाच वर्षांमध्ये जे कोणी अनैतिक धंदे करणारे पकडले गेले नव्हते, व इकडे तिकडे लपून बसले होते, त्यांनी पुन्हा स्त्रियांना आपल्या जाळ्यात ओढायला सुरुवात केली होती. न्यायविभागाच्या मदतीने कौटुंबिक प्रश्नांसाठीच्या विभागाने अशा छुप्या अड्ड्यांना शोधून काढण्यासाठी गुप्तहेर तयार केले. हे अड्डे चालवणाऱ्यांना भारी शिक्षा होईल अशी व्यवस्था केली.

सार्वजनिक निरीक्षण विभागाने सर्वसामान्य जनतेमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम केले. या संघर्षात सहभागी होणे ही प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी व सामाजिक कर्तव्य आहे, असा मोठ्या प्रमाणावर प्रचार करून तरुणांना व्यभिचारात ओढणाऱ्यांविरुद्ध टीकेची झोड उठवली.

शेवटी, व्यापार व अर्थविभागांनी सर्व संस्था–संघटना, दवाखाने, कारखाने, सुरक्षाकेंद्रे यांना जितकी जास्तीत जास्त आर्थिक मदत देता येईल तेवढी देऊ केली.

या प्रकारे, या संघर्षाने आता राष्ट्रव्यापी संघर्षाचे रूप धारण केले.

बेकारी जसजशी संपत गेली, तसतशी स्त्रियांमधली गरिबी संपली. आता गरिबीमुळे स्त्रिया वेश्याव्यवसाय स्विकारतील ही भीती नाहीशी झाली. हां! काही स्त्रिया अशा होत्या ज्यांना अजूनही वाटत होते, की त्यांना दुसरे काम जमणार नाही. प्रश्न उरला होता या स्त्रियांना बदलण्याचा. कारण जोपर्यंत अशा थोड्या स्त्रिया जरी समाजात राहतील, तोपर्यंत त्यांच्याकडे जाणारे पुरुषही राहतील. तसेच या स्त्रिया इतरही तरुण आणि चंचल स्त्रियांना आपल्या जाळ्यात ओढू शकतील.

या स्त्रियांना अटक करणे हा, हा प्रश्न सोडवण्याचा सोपा उपाय होता. पण सोविएत अधिकाऱ्यांनी असे केले नाही. त्यांचा शास्त्रीय नैतिक सिद्धांतावर पूर्ण विश्वास होता. काही विशिष्ट आर्थिक आणि सामाजिक परिस्थितींमुळे वेश्या तयार होतात. त्यासुद्धा माणूस आहेत. तसेच त्या या समाजात गुलाम आहेत, शोषित आहेत. नव्या सकारात्मक सामाजिक परिस्थितीतच त्यांचे पुनर्वसन होऊ शकते. सोविएत मनोवैज्ञानिकांनी दवाखाने–कारखाने चालवण्यात मदत करणाऱ्या नागरिक समितीबरोबर सल्लामसलत करून या केंद्रांमध्ये अजून सुधारणा करण्याचा निर्णय घेतला.

हे पाऊल उचलण्याचे कारण परिस्थितीमध्ये मूलभूत बदल झाले होते. या



दवाखान्यांमधून राहणाऱ्या एक चतुर्थांश स्त्रिया व्यावसायिक वेश्या होत्या, बाकीच्या बिगरव्यावसायिक. १९३४ मध्ये उपचारांनंतर बिगरव्यावसायिक वेश्यांची संख्या २५ टक्केच उरली आणि व्यावसायिकांची ७५ टक्के. बरेच दवाखाने बंद झाले. उरलेल्या रुग्णांमध्ये बऱ्याच जणींचा रोग दुर्धर होता. बऱ्याचजणींमध्ये मनोविकाराच्या स्पष्ट खुणा दिसत. मानसतज्ज्ञांच्या मते गरिबीत फार काळ राहिल्याने या स्त्रिया मनोरुग्ण बनल्या होत्या. या रुग्णांचा उपचार करताना सोविएत शास्त्रज्ञांनी निव्वळ मनोविकारावर आपले सगळे लक्ष केंद्रित केले नाही. त्यांनी स्त्रीच्या भोवतालच्या आर्थिक सामाजिक वातावरणात सुधारणा करण्यास सुरुवात केली. यामुळे या स्त्रियांना एक निरोगी नैतिक जीवन जगणे शक्य झाले.

शास्त्रज्ञांची पद्धत अत्यंत सोपी आणि तर्कशुद्ध होती. १९३४ मध्ये दवाखाने–कारखाने म्हणून जी उपचारकेंद्रे होती, त्यांच्या दिनचर्येमध्ये बदल केले गेले. ही आता खुली केंद्रे राहिली नाहीत. अजूनही स्त्रियांना केंद्रामध्ये उपचार घेण्याची सक्ती नव्हती, पण जर त्या उपचार केंद्रात दाखल झाल्या, तर मात्र त्यांना तिथे दोन वर्षेरहावे लागत असे.

या उपचारकेंद्रांची आधीची दिनचर्या गावातील आरोग्यकेंद्रांच्या दिनचर्येसारखीच होती. पहाटे उठणे, वेळेवर जेवण, विश्रांतीच्या ठराविक वेळा, दिवसा साधारण काम, ठराविक वेळेवर उपचार, करमणूक आणि वाचन, अभ्या, व रात्री लवकर झोपणे! बहुतेक स्त्रियांचा दिनक्रम असाच होता. पण जुन्या व्यावसायिक वेश्यांवर याचा परिणाम उलटा झाला. वर्षानुवर्षे त्यांना सवय होती रात्री आपला दिनक्रम सुरू करण्याची! रात्री लवकर झोपणे त्यांना अवघड वाटत असे. त्यामुळे त्यांच्या मनात या दवाखान्यांविषयी अढी निर्माण झाली होती.

म्हणून दिनक्रम बदलला गेला. आता या केंद्रांचा दिनक्रम संध्याकाळपासून सुरू होऊन पहाटे संपू लागला. झोपून उठण्याची वेळ दुपारची झाली. नंतरची सर्व कामे या वेळांमध्ये बसवली गेली. आता दवाखान्यात आल्यावरही स्त्रियांच्या कामाच्या वेळांमध्ये बदल होईनासा झाला. रात्री जेव्हा त्यांच्या मनात रस्त्यांवर भटकण्याचे विचार येत, तेव्हाच त्यांना इतर अर्थपूर्ण कामे दिली जात. यामुळे, त्यांच्या उपचारात बरीच मदत झाली.

दवाखान्यांमध्ये लवकरच इतरही महत्त्वाच्या सुधारणा केल्या गेल्या. उद्योगविभागाच्या अधिकाऱ्यांनी कारखान्यांची पुनर्रचना केली. कीव शहरातील दवाखान्याला एका महत्त्वाच्या उद्योगाची जबाबदारी दिली गेली. हा उद्योग होता

विजेवर चालणारी वैद्यकीय उपकरणे, यंत्रे बनवण्याचा. सोविएत डॉक्टरांना या उपकरणांची नितांत गरज होती. या कामाचा स्त्रियांवर खूपच चांगला परिणाम झाला. याआधी त्यांच्याकडून कपडे-लत्ते, किंवा इतर बाजारोपयोगी वस्तू बनवून घेतल्या जात. त्या कामांमध्ये त्यांचे मन रमत नव्हते. आता मात्र त्यांना मिळालेले काम अधिक आकर्षक, महत्त्वाचे, देशोपयोगी होते. त्यामुळे स्त्रियांनी अत्यंत मनापासून काम करण्यास सुरुवात केली. विशेषकरून मानसिक आरोग्य ठीक नसलेल्या स्त्रियांना जेव्हा या नव्या कामाचे महत्त्व कळले, तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये आश्चर्यकारक सुधारणा झाली. त्यांना समजले की त्या जे साहित्य आपल्या हातांनी बनवत आहेत, त्याचा उपयोग अनेक लोकांचे आयुष्य वाचवण्यासाठी केला जाणार आहे. त्यांच्या हे सुद्धा लक्षात आले, की हे काम त्यांच्यावर जबरदस्तीने लादलेले नाही. आता त्या राष्ट्रहितासाठी काम करत आहेत.

या प्रयोगाचे यश चकित करणारे होते. इतर शहरांमध्येही मग अशीच व्यवस्था केली गेली. कमकुवत आरोग्य असलेल्या स्त्रियांसाठी मॉस्कोजवळ एक कृषीकेंद्र उघडले गेले. इथे काम होते वेगवेगळ्या प्रकारची पिके घेणे आणि जनावरांच्या सुधारित प्रजाती तयार करणे. रशियाला कृषीविकासासाठी या गोष्टीची खूपच गरज होती. या केंद्रातही स्त्रियांच्या सामाजिक जबाबदारी आणि कर्तव्यावर भर दिला गेला.

या प्रयोगांमुळे स्त्रिया कुशल कामगार बनल्या. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासातही त्या महत्त्वपूर्ण योगदान देऊ लागल्या. आधीच्या निराश स्त्रियांना इतक्या उत्साहाने कामांवर उड्या टाकताना पाहून मनोवैज्ञानिकही उत्साहित होत. कामगार आणि शेतकऱ्यांच्या समित्यांबरोबर चर्चा करून त्यांनी ठरवले, की हे काम अजून वेगाने पुढे न्यायचे.

हेच उद्दिष्ट ठेवून आरोग्य अधिकाऱ्यांनी आपले प्रयत्न दुप्पट वेगाने वाढवले. त्यांचे ध्येय फक्त गुप्तरोग नष्ट करणे एवढेच नव्हते, स्त्रियांचे एकंदरित शारीरिक आरोग्य सुधारणे हेही होते. प्रत्येक दवाखान्याला एक सर्जन दिला गेला होता. गरमीमुळे ज्या स्त्रियांचे नाक, तळपाय खराब होत, त्यांच्यावर शस्त्रक्रिया करून ते नीट करून दिले जात. यामुळे या स्त्रिया समाजात पुन्हा सन्मानाने राहू शकत. विवाह करणे, मुलांना जन्म देणे हेसुद्धा आता त्यांना शक्य होऊ लागले. याबरोबरच मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक पातळीवर काम सुरू केले. या संस्थांमध्ये देशातील चांगले चांगले अभिनेते, कलाकार येऊन आपल्या कला सादर करीत. रुग्णांसाठी रुग्णांनीच चालवलेले वर्तमानपत्र प्रकाशित केले जाई.



हे दवाखाने सर्वसामान्य जीवनाचाच एक भाग होते. आपला भूतकाळ विसरण्याचा सल्ला इथे रुग्णांना दिला जात नसे. उलट प्रत्येक स्त्रीला या संघर्षातील तिची भूमिका आणि तिची व्यक्तिगत जबाबदारी व त्याचे महत्त्व नीट समजावून सांगितले जाई. तिला समजावले जाई की आपल्या भूतकाळावरील तिचा व्यक्तिगत विजय या सामाजिक प्रयोगासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि मानवजातीला सुधारण्याच्या या संघर्षात तिचे स्थान अग्रभागी आहे.

दवाखान्यांना जरी हे यश मिळाले असले, तरी काही सोविएत शास्त्रज्ञ आणि काही स्त्रिया स्वतःसुद्धा अजून साशंक होत्या. समाजात फिरून प्रवेश करताना पुन्हा व्यभिचाराच्या जाळ्यात अडकण्याची भीती त्यांना वाटत होती. शेवटी, सामाजिक पुनर्रचनेची एक योजना तयार केली गेली. थोडक्यात ती खालीलप्रमाणे होतीः

१. समाजात जोपर्यंत रुग्णाच्या राहण्याची पूर्ण सोय होत नाही, तोपर्यंत तिला रुग्णालयातून सोडले जात नसे. तिचा भूतकाळ पूर्णपणे गुप्त ठेवला जाई. फक्त काही सामाजिक कार्यकर्त्यांनाच तिच्याबद्दल माहिती दिली जाई. ते तिच्यासाठी आधीच नोकरी शोधून ठेवत. तिच्या राहण्याची सोय एखाद्या सर्वसाधारण कुटुंबात केली जाई. इथेसुद्धा तिच्यावर बारीक लक्ष ठेवले जाई. तिच्या भूतकाळाबद्दल जराही शंका कुणाला येऊ नये असे विशेष प्रयत्न केले जात.

२. प्रत्येक स्त्रीला दीर्घकाळासाठी मदतीची खात्री देणारा मोजक्या संरक्षकांचा गट असे. कमीतकमी एक संरक्षक एका स्त्रीबरोबर काम करत असे. तिने आपल्या नव्या कामात यश मिळवणे या गोष्टीला खास महत्त्व होते.

३. कोणत्याही रुग्णाच्या बाबतीत जर काही प्रश्न निर्माण झाला, तर तातडीने कुशल आणि अनुभवी सहकाऱ्यांची मदत घेतली जाई. पुढे पुढे तर या पूर्ण बऱ्या झालेल्या रुग्ण स्त्रिया स्वतःच संरक्षक दलांच्या समित्यांमध्ये काम करू लागल्या.

४. विवाह, उद्योगधंदा, वेतन, भाडे इत्यादि कोणत्याही प्रकारच्या समस्यांमधून मार्ग काढण्यासाठी आणि स्त्रियांना अधिकाधिक मदत करण्यासाठी समित्यांनी विशेष कायदे केले.

५. जुन्या रुग्णांनी अजून रुग्णालयांमध्ये उपचार घेत असलेल्या स्त्रियांबरोबर

**1921 मध्ये तिसऱ्या अखिल रशिया प्रादेशिक महिला विभागांच्या प्रमुखांच्या संमेलनामध्ये अलेक्झांड्रा कोलोन्ताई यांनी केलेल्या भाषणातील अंश**

"... पण जर वेश्याव्यवसाय रशियामध्ये सुद्धा एवढा ताकदवान आहे, एवढा पसरला आहे तर मग आपण त्याच्या विरोधात कसे लढणार आहोत?या प्रश्नाचे उत्तर देण्याकरता आपण सर्वप्रथम वेश्याव्यवसायाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचे अधिक तपशीलवार विश्लेषण केले पाहिजे. वेश्याव्यवसाय हे एक विकृतीदर्शक तथ्य (पॅथॉलॉजिकल फिनॉमिना) आहे, म्हणजेच एखादी व्यक्ती स्वभावतःच गुन्हेगार असते तसे, वेश्या प्रवृत्ती हा एखाद्या स्त्रीमधील विकृतींचा परिणाम असतो असे जगापुढे सिद्ध करण्यात बूर्ज्वा विज्ञान आणि त्यांचे तज्ञ यांना धन्यता वाटते. त्यांच्या मते अशी स्त्री कुठेही आणि कशीही राहत असली, तरीही तिची पावले पापाच्या आयुष्याकडे वळलीच असती. मार्क्सवादी आणि अधिक विवेकशील विद्वान, डॉक्टर आणि संख्याशास्त्रज्ञांनी हे स्पष्टपणे दाखवले आहे की "जन्मजात प्रवृत्ती" ही संकल्पना खोटी आहे. वेश्याव्यवसाय हे सर्वात आधी सामाजिक तथ्य आहे, ते स्त्रीची गरजू स्थिती आणि तिचे लग्न आणि कुटुंबामध्ये पुरुषावर असलेल्या आर्थिक अवलंबित्वाशी जवळून जोडलेले आहे. वेश्याव्यवसायाची मुळे अर्थव्यवस्थेमध्ये आहेत. एका बाजूला स्त्री आर्थिकदृष्ट्या कमजोर स्थितीत असते, आणि दुसरीकडे हजारो वर्षे, लैंगिक सुखांच्या बदल्यात पुरुषाकडून भौतिक सुखे मिळवणे – मग ते लग्नबंधनाच्या मर्यादेत असो अथवा बाहेर, या गोष्टीची तिला शिकवण मिळत आली आहे. हे या समस्येचे मूळ आहे. हे वेश्याव्यवसायाचे कारण आहे."

भांडवली देशात पोलिस जो प्रश्न विचारायचे धाडस करू शकत नाहीत, धर्मगुरू विचारू शकत नाहीत आणि शास्त्रज्ञ विचारत नाहीत, तो प्रश्न म्हणजे सामाजिक रोग मुळात अस्तित्वातच का येतात? समाजातील विशिष्ट वर्ग या रोगांमुळे प्रचंड नफा कमावतात, हे या सामाजिक रोगांच्या अस्तित्वामागचे कारण आहे, असे उत्तर सोविएत रशियातील प्रयोगांमधून मिळाले आहे. बहुसंख्य जनतेच्या सार्वत्रिक शोषणामुळेच खूप मोठी लोकसंख्या सामाजिक रोगांना बळी पडते. मग हे सामाजिक रोगसुद्धा नफा कमावण्याचे, पुन्हा जनतेच्या शोषणाचेच साधन बनतात. अशा रितीने हे रोग समाजभर पसरतात. जनतेच्या एकूणच शोषणाचा अंत झाल्यामुळेच सोविएत रशियामध्ये या रोगांच्या मूळ कारणांचाच अंत झाला.

**डी. डी. कोसंबी यांच्या प्रस्तावनेतून**

एल्गार

